म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ला.वा.
दा. क्र. ५२७६

RRMRBK-0205276

18 MAY 1975

25 APR 1976

दा.क्र-५ २७६.

डॉक्टर

("The Physicians" या कादंबरीचा सारांशानुवाद)



मूळ लेखक

हॅझेल लिन

अनुवादक

विष्णु विनायक बोकील

RRMRBK-0205276



१९५५

किंमत दोन रुपये

"THE PHYSICIANS"

A Novel

by

HAZEL LIN

Copyright, 1951 by Hazel Lin. Abridged from the book and Reproduced by permission of the Author and the Publisher The John Day Company, New York.

—: प्रकाशक :—

पंडित अनंत कुलकर्णी,
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६, शनवार, पुणें २.

—: मुद्रक :—

विष्णु गणेश माटे,
'विश्वकर्मा' मुद्रणालय,
टिळक रोड, पुणें २.

लेखक

हॅझेल लिन

अनुवादक

वि. वि. बोकील

न व प्र का श न

एक नवी गुलामगिरी

A New Slavery

या पुस्तकाचा सारांशानुवाद

मू ल्य दो न रु प ये

भाग पहिला

डॉ. वाँगनीं जांभई दिली. आणि प्रशस्त लांकडी पलंगावर पडल्या पडल्या आळोखे पिळोखे दिले. नंतर त्यांनीं उजवा हात लांब करून गादीवर टाकला. एकाएकीं त्यांच्या हृदयांत कळ उठली. कारण आपली पत्नी निवर्तल्यापासून जवळ जवळ गेलें वर्षभर आपण ह्या खोलींत एकटेंच निजत आहोंत, याची अंथरूणाच्या त्या भागाच्या रिकामपणानें त्यांना पुन्हां आठवण करून दिली.

शेजारच्या रिकाम्या उशीकडे पाहून त्यांनीं एक सुस्कारा सोडला, अन् म्हटलें, "बिचारी आन–लान ! आपला पहिला नातू पाह्यला कांहीं थांवली नाहींस. आणि मुलानें अजून देखील तुझी इच्छा पुरी केली नाहीं."

तसें पाहिलें तर वाँग कुंगला आपल्या चार मुलींकडून तीन नातू आणि पांच नाती होत्या. पण किती झालें तरी तीं मुलींचीं मुलें होतीं. वाँग घराण्यांतील नव्हतीं व त्यामुळें ती हिशोबांत घेतां येण्यासारखीं नव्हतीं. एकुलता एक मुलगा वाँग पिन. त्याचें लग्न होऊन सहा वर्षें झालीं होतीं. पण सुनेला, शिन–लिएनला, अजून मूल झालें नव्हतें. त्यामुळें वंशाला अंकुर फुटतो कीं नाहीं यासंबंधीं वाँग कुंगला काळजी वाटत होती.

उठून बसून त्यांनीं घसा खांकरला. घसा खांकरल्याचा त्यांचा आवाज म्हणजे सुनबाईला सेवेला धांवण्याची सूचनाच असे. घरांत नोकरचाकर थोडे होते म्हणून नव्हे, तर वाँग कुंगना सुनेनेंच आपली सरबराई केलेली पसंत असे म्हणून ! त्या घरांत पाऊल टाकल्यापासून ही गोड कामगिरी तिच्याकडेच होती.

हातावर डौलांत ट्रे घेलून घरीत, अंगाला झोंबणाऱ्या सकाळच्या थंडींत, ती अंगणांतून झपाझप चालत गेली, सासऱ्याच्या खोलीसमोर येतांच

कोरीव काम केलेल्या लांकडी दरवाज्यावर तिनें आपल्या बोटांनीं हळूंच टक् टक् केलें.

"ये"–वाँगचें उत्तर आलें. उत्तरासरशीं ती आंत गेली, गल्यावरु हातांतील ट्रे तिनें पलंगाशेजारच्या लाल लाखी रंगाच्या गोल मेजावरु ठेवला. वाँगनीं आपल्या सुनेकडे कौतुकानें पाहिलें. पुन्हां त्यांच्या मनांत येऊन गेले – किती जीव आहे आपला हिच्यावर !

चूळ भरून टाकण्यासाठीं आधीं तिनें त्यांना ऊन पाणी दिलें. प्रेमळ दृष्टीनें सुनेकडे पाहत पाहत नंतर त्यांनीं स्वादिष्ट चहाचे घुटके ध्यायला सुरवात केली. त्यांचें चहापान झाल्यावर तिनें रिकामा कप ट्रेमध्यें ठेवला, किंचित् वाकून सासऱ्याला अभिवादन केलें आणि ती खोलींतून बाहेर पडली.

मालकाच्या सेवेसाठीं नेहमींच डोळ्यांत तेल घालून तयार असलेला जुना नोकर शांग–आन बाहेरच होता. सुनबाईंनीं दार ओढून घेतल्याचा आवाज ऐकतांच त्यानें लगोलग खोलींत पाऊल टाकलें. वाँग–कुंग पलंगाच्या कडेला सरकून बसले होते. त्यांचे पाय अधांतरीं झोके खात होते. शांग–आननें काळ्या सॅटिनच्या सपाता त्यांच्या पायांत चढविल्या.

वयाची पन्नाशी ओलांडलेल्या, आडमाप देहाच्या, दोंदील वाढलेल्या शांग-आननें वाँग कुंगच्या सेवेंत पंधराहून अधिक वर्षें काढलीं होतीं. तेलकट त्वचा, चपटें नाक, दोन डोळ्यांत बरेंच अंतर, असा त्याचा चेहरा सदा हंसतमुख असे. इतर नोकरांप्रमाणें त्याचाही आपल्या मालकावर जीव होता. आणि मालक जरी मधूनच एखादेवेळीं अंगावर खेंकसले तरी त्यांच्या औदार्यामुळें आणि समजुतदारपणामुळें त्याच्या मनांत आदरच असे.

वाँग कुंग यांनीं नुकतीच पन्नाशी ओलांडली होती. पण वय मोजण्याच्या चिनी पद्धतीनुसार त्यांना बावन्न वर्षांचें मानण्यांत येत होतें. दोन्ही कानशिलांवरचा करड्या केसांचा थोडासा भाग सोडला तर त्यांचे केस अजून काळेभोर होते पण त्या करड्या केसांमुळें त्यांच्या देखणेपणांत आणि भव्यपणांत एकप्रकारची भरच पडत असे. ते उंचपुरे असून रुबाबदार दिसत. त्यांचे केस आकर्षक रीतीनें उलटे फिरवलेले असत त्यामुळें त्यांचे भव्य कपाळ उठावदार दिसे.

सासऱ्याच्या खोलींतून बाहेर पडलेली शिन-लिएन पतीला उठविण्यासाठीं आपल्या खोलींत गेली. त्याला उठवीत ती म्हणाली, "उठा, अन् मामंजींना आज सकाळीं काय सांगायचें ठरलंय तें विसरूं नका–"

त्या आठवणीसरशीं वाँग–पिन एकदम जागा झाला. अंथरूणाखालीं त्यानें उडी ठोकली, आणि प्रेमभरानें आपल्या सुंदर पत्नीला अलिंगन दिलें. कालच रात्रीं तिनें मोठ्या विश्वासानें तें गुपित त्याला सांगितलें होतें.

आज न्याहारीच्या वेळीं ही बातमी ऐकून आपले वडील किती खूप होतील. पण त्यांचा हा नातू बुद्धिमत्तेंत अन् महत्त्वाकांक्षेंत आजोबांना शोभेसा निघाला पाहिजे. देवा तसाच होऊं दे ! तो मनांतल्या मनांत म्हणाला.

जेवणघर प्रशस्त आणि हवेशीर होते. त्याच्या पुढच्या बाजूनें चार मोठ्या खिडक्या आणि मध्यें एक दार होतें. याच्या उलट मागची भिंत मात्र उंचावरच्या दोन लहान खिडक्या सोडल्या तर अगदीं अखंड होती. आज या शरद् ऋतूंतील सकाळीं पुढच्या खिडक्यांवाटें स्वच्छ सूर्यप्रकाश आंत येत होता. आणि मागच्या भिंतीच्या खिडक्यांतून वाऱ्याची मंद झुळूक येत होती.

वाँग कुंग मेजाच्या वरच्या बाजूला बसले होते. त्यांचा मुलगा व सून खालच्या बाजूला होती. शांग–मानें 'वाढायला घे' म्हणून आचाऱ्याला आज्ञा केली. बसक्या चेहऱ्याचा, अदमासें चाळीस वर्षें वयाचा बुटका आचारी ट्रे घेऊन लगेंच बाहेर आला. आधीं मोठ्या मालकाकडे व नंतर धाकटचा मालकाकडे पाहून त्यानें सस्मित अभिवादन केलें. नंतर मोठ्या मालकापुढें, धाकटच्या मालकापुढें आणि सगळ्यांत शेवटीं शिन–लिएन पुढें, त्यानें कढत कढत तांदुळाच्या खिरीचा एक एक वाडगा ठेवला. मग सुक्या गोमांसाचें लांबट तुकडे, खाऱ्या शेंगा, कलिंगडाच्या लोणच्याच्या फोडी, अंडीं, अशा चवदार वस्तू आणून टेबलाच्या मधोमध ठेवल्या. शांग–मानें ऊन, ऊन पाव आणून ठेवला.

शिन–लिएननें घाईघाईनें खाऊन घेतलें. नंतर तिची जेव्हां खात्री झाली कीं, वाँग पिन आपलें मघाचचें वचन विसरून गेला आहे तेव्हां त्याच्या

उजव्या पायावर आपला पाय दाबून तिनें त्याला आठवण करून दिली. त्या ढुसणीसरशीं वाँग पिन दचकून ताठ झाला. आणि म्हणाला, " अं-अं-म्हणजे बा–बाबा–, तुम्ही लवकरच आजोबा होणार आहांत– "

वाँग कुंगनीं त्याच्याकडे रोंखून पाहिलें आणि जवळ जवळ ओरडूनच म्हटलं, " काय ? " मग खिरीचें भांडें खालीं ठेवलें आणि सुनेकडे पाहिलें. शिन-लिएननें लाजून मानेनेंच होकार दिला. वाँग कुंगना आपल्या पत्नीची आठवण होऊन ते मुलाला म्हणाले, " तुझी आई आज हयात असती तर ! सबंध आयुष्यभर या क्षणाची ती वाट पहात होती. ! ती हयात होती तेव्हांच जर ही गोष्ट.. "

बोलतां बोलतां त्यांचा गळा दाटून आला. त्यांचे डोळे लाल झाले आणि नोकरांच्या देखत नको या विचारानें ते जाग्यावरून उठले व लगबगीनें बाहेर गेले. वाँग पिननें पत्नीच्या खांद्यावर हलकेच हात ठेवून म्हटलें, " काळजी करूं नकोस. बाबांना अतिशय आनंद झाला आहे. दुसरं कांहीं नाहीं – "

न्याहरीनंतर लवकरच, बाहेरच्या दाराशीं उभा राहून शांग-आन मालकाकडे आलेल्या रोग्यांची व्यवस्था करूं लागला. कांहीं माणसें तर पहांट होण्याच्या खूप आधीं पासूनच ताटकळत उभीं होतीं. डॉक्टर साहेबांची पहिल्या तपासणीची फी रोग्याच्या इंतमामावरून ठरवली जात असे. ती ५० सेंटपासून ५ डॉलरपर्यंत असे. पुन्हां यायचा प्रसंग आला तर निम्मी फी. फी वसूल करण्याचें काम चाललें होतें, तोंवर वाँग कुंग आपल्या प्रशस्त खोलींत एका भव्य मेजावर रेलून बांबूच्या लांबट पाईपमधून धूम्रपान करीत आराम करीत होते.

धूम्रपानाचा आस्वाद घेत असतां मुलानें सांगितलेली ती गोड बातमी ते पुन्हां पुन्हां आठवीत होते. अखेरीस त्यांनीं पाईपवरची राख झटकून टाकली. अशा विशिष्ट तऱ्हेनें कीं शांग-आननें ओळखलें कीं रोग्यांना तपासण्याची मालकांची तयारी आहे आतां ! आपल्या कामाचें महत्व पूर्णपणें जाणणाऱ्या शांग-आननें अधिकार वाणीनें खड्या सुरांत पुकारलें, " चला, पहिला कोण आहे ? "

शेतकऱ्याच्या पोषाखांतील एक तरुण दारांत उभा होता. तो घुटमळला. आपल्या मागें आपल्यापेक्षां मोठीं माणसें उभीं असून आपण सर्वांच्यापुढें आंत जावें या विचारानें तो थोडासा संकोचला. शिवाय डॉक्टरांना भेटण्याची भिती वाटत होती त्याला. अनेक महिने त्यानें टाळाटाळ केली होती. शेवटीं त्याच्या वडिलांनीं आज जबरदस्ती करून त्याला इकडे यायला भाग पाडलें होतें.

शांग-आन मोठ्यानें म्हणाला, " चल, आटप तरुण माणसा ! सबंध सकाळ फुकट घालवायला आम्हीं इथें बसलों नाहींत ! "

" आलों, आलों, अं काका " त्या तरुण माणसानें खजिल होऊन म्हटलें, वांकून अभिवादन केलें आणि अंगणांतून तो जड पावलानें चालत आला. तो खोलींत शिरला. डॉक्टरांनीं वर मान करून त्याच्याकडे पाहिलें. त्यासरशीं घाबरून त्यानें तीन वेळां मान लववली. खुर्चीकडे बोट करून वाँग कुंग म्हणाले, " बैस – "

त्यांनीं रोग्याला आपादमस्तक न्याहाळून पाहिलें. उजव्या हाताचा ड्रावर उघडून त्यांनीं टाओ–ते–शिंग हा ग्रंथ बाहेर काढला आणि त्या तरुण माणसाचें उजवें मनगट त्यावर धरलें. त्यांनीं त्याची नाडी पाहिली. प्रथम हलक्या हातानें. नंतर थोडा जोर देऊन आणि शेवटीं नाड़ी लागणारच नाहीं इतका जोर देऊन. रोग्याच्या डाव्या हाताची नाडीही त्यांनीं याच पद्धतीनें पाहिली. नंतर त्यांनीं त्याला जीभ बाहेर काढायला सांगितलें. सर्व वाजूंनीं त्यांनीं जीभ पाहिली. रोगी डॉक्टरांकडे रोखून, आश्चर्यानें पाहत राहिला.

बराच वेळ स्तब्ध राहून डॉक्टरांनीं म्हटलें, " हिवतापाचा ताप आहे म्हणून तुझा चेहरा फिक्कट दिसत आहे आणि ओठ निळे काळे पडले आहेत. तुला वारंवार थंडी वाजून येते ती उष्ण औषधें घेतलीं तरच थांबवितां येईल–"

हा वेळपर्यंत रोग्यानें एक शब्द उच्चारला नव्हता. डॉक्टरांचें निदान ऐकून त्यानें बावळटपणानें होकारार्थी मान हलविली. वाँग कुंगनीं शाईची वडी चुरडली आणि ती पूड दौतींत टाकून तींत थोडें पाणी मिसळलें. पितळी नळकांडयांतून एक कुंचला घेऊन त्यांनीं शाईंत बुडवला आणि

औषधयोजना कागदावर लिहिली–

१	जपानी व्हारनिश झाडाची मुळी	$\frac{1}{2}$ औंस
२	झाडसालीवरचें शेवाळें	१ औंस
३	सुंठ	$\frac{1}{10}$ औंस
४	दालचिनीचीं सुकीं पानें	१ औंस
५	कांसवाच्या कवचाची पूड	१ औंस
६	तांबडी मिरी	१ औंस
७	ज्येष्ठमध	१ औंस

सूचनाः–पाणी आणि गूळ यांत एक तासभर आटवणें आणि नंतर पिणें.

रोग्यानें कागद हातीं घेतला. अभिवादन केलें आणि तो बाहेर पडला. सकाळभर एकसारखे रोगी येत होते. दुपारच्या सुमारास शांग-आननें पुकारलें, "चोवीस नंबर." हा शेवटचा रोगी होता. तो खूपच आजारी दिसत होता. दोन भावांनीं त्याला आधार दिला होता. तिशी नुकतीच ओलांडलेली. पण कण्हणें सारखें चालूं होतें. त्याचे डोळे खोल गेलेले होते, निस्तेज दिसत होते. गाल लाल लाल झाले होते. डॉक्टरांनीं व्यवस्थित रितीनें त्याची नाडी आणि जीभ पहाण्यास सुरवात केली. नाडी अतिशय मंद चालत असून, जिभेवर बेंसुमार बुरशी चढलेली दिसत होती. हिरड्यांवर व्रण दिसत होतें. रोग्याला सांगून पहाण्यांत अर्थ नाहीं असें पाहून डॉक्टरांनीं त्याच्या बरोबरच्या लोकांना सांगितलें, "तुमच्या भावाला विषमज्वर झाला आहे! हा उष्णतेचा प्रकोप आहे. याला थंडाईचीं औषधें द्यायला पाहिजेत–',

लगेच त्यांनीं औषधयोजना लिहून काढली. तींत सुकलेले सफरचंद' पेअर, सलगम, कलिंगड, आणि पाणकोंबडीचा सुका पाय इत्यादींचा समावेश होता. त्याचबरोबर त्यांनीं मुद्दाम बजावलें, "या आजारांत पथ्य फार महत्त्वाचें असतें. तुमच्या बंधूंना मांस व भाजीपाला देऊं नका. थोडें मीठ टाकून भाताची पेज द्या."

दोघा भावांनीं अभिवादन करून डॉक्टरांचे आभार मानले. धाकट्या भावानें रोग्याचीं पायतणें काढून घेतलीं. थोरल्यानें त्याला उचलून घेतलें आणि बाहेर नेलें.

जेवण झाल्यावर शांग–आननें व्हिजिट्सची यादी डॉक्टरांना आणून दिली. दवाखान्यांत येणें अशक्य असलेले रोगी, आणि चारचौघांत बाहेर येणें योग्य समजलें जात नसल्यानें स्त्री रोगी यांची नांवें त्या यादींत होतीं.

मालकांनीं पाईप आपटून राख झाडल्याचा अंदाज केलेला शांग–आननें ऐकला तेव्हां त्यानें लगबग मागच्या चौकांत जाऊन पुकारलें, अरे, मालकांची तयारी आहे बरं का–"

चार धट्टेकट्टे जवान एका टेबलावर बसून जेवत होते. त्यांनीं पटकन् जेवणाचें आवरतें घेतलें आणि डॉक्टरसाहेबांची वाहून नेण्याची खुर्ची आणण्यासाठीं धांव मारली. प्रत्येकानें आपली ठराविक बाजू उचलून घेतली आणि चौघांनीं मिळून ती लांब बांबूची खुर्ची सराईतपणें दरवाजाजवळ आणून ठेवली. शांग–आननें दरवाजावरील पडदा दूर सारला आणि मालकांना खुर्चीवर आदरानें नेऊन बसविलें.

एका चिठ्ठींत पुढील मजकूर होता – "मॅडॅम तू डॉक्टरांना भेटूं इच्छितें – " शांग–आननें पत्ता सांगितला आणि नोकरांना त्या पत्त्यावर खुर्ची नेण्यांस सांगितलें. मॅडॅम तू पीकिंगच्या श्रीमान् नगराध्यक्षाची पत्नी होती. घराजवळ येतांच नोकरांनीं खुर्ची एका भव्य फाटकांतून आंत नेली. एक चौक ओलांडून दुसऱ्या चौकांत ती त्यांनीं आणून ठेवली. मेअर तूंनीं पुढें येऊन डॉक्टरांचें स्वागत केलें. पण डॉक्टरांच्या समवेत ते बायकांच्या विभागाकडे गेले नाहींत.

वाँग कुंग एका अंधेऱ्या खोलींत शिरले. खोलींत दोन मेणबत्त्यांचा अंधुक उजेड होता. खोलीच्या एका कोपऱ्यांत नाजुक नक्षीकाम केलेला एक लांकडी पलंग होता. त्यावर भरगच्च भरतकामाच्या तांबडया सॅटिनचा चांदवा असलेली एक मच्छरदाणी घट्ट बांधलेली दिसली.

एका तरूण दासीनें एक स्टूल आणून पलंगापुढें ठेवलें त्यावर डॉक्टरसाहेब विराजमान झाले. पडद्याचे पंख अलग झाले. त्यांतून एक गौरवर्णाचा हात बाहेर आला. त्या हाताचीं पांचीं बोटें रत्नखचित आंगठ्यांनीं भूषित केलेलीं होतीं. वाँग कुंगनीं तो हात हलकेच धरला आणि हाताची नाडी आपल्या पद्धतीप्रमाणें कमी जास्त जोर देऊन तीनदां तपासून

पाहिली. तो हात मागें गेला आणि डावा हात बाहेर आला. त्या हाताची नाडी तपासून झाल्यावर बाईनें एक छोटीशीं हस्तीदंती बाहुली डॉक्टरांच्या हातांत दिली. त्या बाहुलीच्या अंगावर दोन ठिकाणीं काळ्या शाईचे दोन ठिपके होते.

हेतू हा कीं, बाईच्या पाठींत दुखत आहे हें डॉक्टरांना समजावें. परंतु नाडीपरीक्षेवरून निदान होत होतें मूत्रपिंडाच्या आजाराचें. म्हणून डॉक्टरांनीं औषधीयोजना लिहून दिली. निरनिराळ्या मुळ्यांचा आणि विशिष्ट प्रकारच्या गवताचा तींत मुख्यत्वेंकरून समावेश केला गेला होता.

डॉक्टर उठून बाहेर चौकांत आले. मेयर त्यांची वाटच पहात उभे होते. डॉक्टरांच्या मुखांतून पत्नीच्या रोगाचे निदान ऐकतांच मेयर फार खूष झाले. त्यांनीं विदागीदाखल डॉक्टरांना एक नोटांचें पुडकें बहाल केलें. सामान्यतः पांच रोग्यांच्या फी पेक्षांही अधिक रक्कम असलेली पाहून डॉक्टरांना समाधान वाटलें.

• •

–लायलॅक आणि पीच यांनीं मोहोरून गेलेलें पीकिंग शहर मे महिन्यांत अतीव सुंदर दिसत असे.

रोज संध्याकाळीं वसंतऋतूचें वैभव उपभोगावें म्हणून पत्नीला घेऊन वाँग पिन घराच्या बागेंत जात असे. टेकण्यासाठीं उशा असलेली वेताची खुर्ची घेऊन मासे असलेल्या कुंडीपाशी जात. शिन–लिएन त्या खुर्चींत मागे रेलून बसे. खुर्चीच्या डाव्या हातावर टेकून वाँग पिन निसर्गाची शोभा आणि पत्नीचा सहवास यांचा आनंद मनमुराद लुटीत असे.

मे सरतां सरतां एके दिवशीं संध्याकाळीं त्यानें पत्नीला शंभराव्या खेपेला म्हटलें, "का ग, बरं वाटतंय ना ?" नित्याप्रमाणें ती लाजून म्हणाली, "अगदीं हे दिवस केव्हां संपताहेत असं झालंय् –"

त्या दिवशीं बरीच रात्र झाल्यावर कळा सहन करणें अशक्य झालें तेव्हां तिनें पतीला सांगितलें. तो ताडकन् उठून उभा राहिला अन् म्हणाला, "घाबरूं नकोस. बाबांना बोलावतों–"

अंगणांतून धांवतच तो गेला आणि वडिलांचे दार ठोठावून म्हणाला, "बाबा, बाबा–, शिन–लिएनच्या पोटांत कळा येऊं लागल्या आहेत–"

वाँग कुंग दाराशीं आले. ते उजवा हात मुलाच्या खांद्यावर ठेवून म्हणाले, "काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. एकदां नव्हे पांच वेळां हा प्रसंग मीं पाहिला आहे. शांग–माला हांक टाक. अशावेळीं काय करायचें असतें तें तिला चांगलें माहीत आहे–"

"तुम्हीच बोलवा तिला–" वाँग पिन वडिलांच्याच खोलींतल्या एका खुर्चींवर मटकन् बसला आणि दीनवाण्या मुद्रेनें त्यांना म्हणाला.

शांग–माची मदतनिसांची फौज जय्यत तयारींत असे. हा वेळपर्यंत शिन–लिएनला जोरांत कळा येऊं लागल्या होत्या. तिचें सर्वांग पिळवटून निघालें होतें. घामानें थबथबलें होतें. भयानें ती व्याकूळ झाली होती. शांग–मानें तिच्या कपाळावरील घाम पुसून म्हटलें, "बाईसाहेब, असं व्हायचंच. घाबरूं नका. चांगला गुटगुटीत मुलगा होईल. साहेब खूष होतील–"

'मुलगा' हीं अक्षरं कानांवर पडतांच शिन-लिएनला जरा समाधान वाटलें. आणि प्रसूतिवेदना क्षणभर थोड्या सुसह्य भासल्या! तिला वाटलें वाँग पिन आपल्या शेजारीं हवा होता. पण पुरुषांना अशावेळीं येण्यास मज्जाव होता.

एक ठेंगणी, ठुसकी, सुईण लवकरच आंत आली. लाई–मा नांवाजलेली सुईण होती. श्रीमंत लोकांच्या घरचीं तिला नेहमीं बोलावणीं येत असत.

खोलीच्या बाहेरच्या बाजूस अस्वस्थ मनानें वाँग पिन येरझारा घालीत होता. त्याचे वडील त्याची समजूत घालण्यासाठीं म्हणत होते, "वेळ लागणारच." अखेरीस त्यांनाहि चिंता वाटूं लागली. ते म्हणाले, "तुझी आई यावेळीं असती तर! तिची गरज आत्तां होती!" नंतर त्यांनीं म्हटलें, "चल, तुझ्या आईच्या स्मरणपट्टिकेपुढें धूप जाळूं. तिच्या आत्म्याला बोलावून घेऊं. तीच शिन–लिएनचें आज रक्षण करील–"

दोघेहि पुढील चौकांत गेले आणि पूर्वजांच्या स्मरणपट्टीका टांगलेल्या दिवाणखान्यांत शिरले. वाँग पिननें तीन वेळां आईच्या स्मरणपट्टिकेपुढें धूप घातला, आणि तीन वेळां वंदन केलें. हा विधि होत असतां दोघांपैकीं

एकानेंहि एक अक्षर उच्चारलें नाहीं.

परत येत असतां, रात्रींच्या शांत वातावरणांत 'टच्हां टच्हां,' असा लहान मुलाच्या रडण्याचा आवाज त्यांच्या कानांवर आला !

"बाळ–बाळ–" म्हणून वाँग पिन ओरडला. वायकोच्या खोलींत घुसण्याच्या बेतांत तो होता. पण वडिलांनीं त्याला आवरून धरलें. दोघेहि वाट पाहात बाहेर उभे राहिले.

आणखी एक तास तसाच गेला. आंतून कोणी बाहेर आलें नाहीं, कीं कसलाच आवाजहि ऐकूं आला नाहीं. वाँग पिनचा धीर खचून गेला. त्यांच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

त्याचे वडील मागील चौकाच्या जवळ जाऊन उभे राहिले आणि म्हणाले, " जिन हुआ, इकडे ये पाहूं जरा –"

काय झालें तें समजण्यासाठीं उत्सुक असलेली ती तरुण मोलकरीण धांवतच पुढें आली आणि मान लववून म्हणाली, " काय, धनी ? "

" आंत जा आणि शांग–माला विचारून ये. म्हणावं आंत चाललंय् तरी काय ? "

तसें पाहिलें तर जिन–हुआ म्हणजे मूर्तिमंत उत्सुकता. पण तिचें अजून लग्न झालेलें नव्हतें. आणि बाळंतपणाचा देखावा अविवाहित मुलींनीं डोळ्यांनीं पाहूं नये अशी समजूत. म्हणून ती घोटाळत तिथेंच उभी राहिली.

" लवकर–" असें डॉक्टरांनीं दरडावल्यावर तिनें नियम ठेवले गुंडाळून आणि ती तीरासारखी धांवतच सुटली !

तिनें कंदील लावून घेतला आणि भयभीत मनानें तीन पायऱ्या चढून ती बाळंतीणीच्या खोलीकडे गेली. कापऱ्या हातानें तिनें खोलीचें लांकडी दार ढकललें. दाराची फळी किरकिरली. खोलींत पुरेसा उजेड नव्हता. त्या मिणमिणत्या प्रकाशांत आपली मालकीण पलंगावर रक्ताच्या थारोळ्यांत निपचित्, पांढरी फटफटीत अशी पडलेली तिला दिसली. आणि शांग–मा आणि लाय–मा गुडघे टेकून खुळ्यासारख्या स्वत:शींच कांहींतरी पुटपुटत मागें पुढें डुलत असलेल्या तिला दिसल्या. खोलीच्या मध्यभागीं एक गोल तांबडें लाखी रंगाचें टब ठेवलेलें होतें. त्यांत कागदाचे बोळे भरलेले होते

ऱ्या बोळयांतून दोन छोटे हात पाय बाहेर डोकावत होते. आणि जोर-जोरानें हलत होते.

जिन हुआ किंचाळतच बाहेर पळाली. तिचें ओरडणें ऐकून वाँग कुंग आणि वाँग पिन बाळंतिणीच्या खोलीकडे धांवत गेले.

शिन-लिएनचा कारभार आटोपला होता. वाँग पिन बिछान्याकडे धांवला. आणि पत्नीच्या मृत देहाला कवटाळूं लागला !

वाँग कुंगनें अश्रु आवरून धरले. तरी पण थोडया वेळानें आपल्याला रडूं कोसळणार हें त्यांना समजत होतें. जेमतेम दोनच वर्षांपूर्वी असल्याच दारूण प्रसंगांतून त्यांना जावें लागलें होतें. मुलाचें आत्तांचें दुःख त्यांनाहि त्यावेळीं सहन करावें लागलें होतें. बिछान्याजवळ हुंदके देत असलेल्या मुलाचें दुःख पाहून त्यांना त्याची करूणा आली !

पण आजोबा या नात्यानें आपलें नातवंड मुलगा कीं मुलगी हें समजून घेणें त्यांना विशेष अगत्याचें होतें. रीतभात गुंडाळून ठेवून ते टबाकडे धांवत गेले. डाव्या हाताच्या दोन बोटांनीं रक्तांत भिजलेले बोळे त्यांनीं बाजूला सारले. एक दृष्टिक्षेप– त्यांची भीति साधार ठरली. वंशाचा आधार, मुलगा नव्हता तिथें ! हृदय पिळवटून टाकणारे मुलाचे हुंदके ऐकूं येत होते तरी ते खोलींतून बाहेर पडले. नातू मिळावा म्हणून त्यांनीं देवाची प्रार्थना केली होती. बायकोच्या स्मरणपट्टिकेपुढें धूप जाळला होता. ते सारे व्यर्थ ठरलें होतें. निराशेमुळें त्यांना देवांचा, बायकोचा, सगळ्यांचा अतिशय राग आला. एक पोरटी घराण्यांत जन्माला आली होती ! आणि जन्मताच आईच्या मुळावर आली होती ! हूं: !

आईविना पडलेल्या जीवाची आठवण होऊन शांग-माचें हृदय भरून आलें. तिनें त्या अर्भकाला हलकेंच उचलून घेतलें आणि त्याला न्हाऊं माखूं घालून कपडयांत गुंडाळण्यासाठीं आपल्या खोलींत नेलें.

वाँग पिननें तीन दिवस अन्नपाणी घेतलें नाहीं. एकटा आपल्या खोलींत पडून राहिला. कोणीहि आपल्या खोलींत येऊं नये म्हणून त्यानें दाराला आंतून कडी लावून घेतली.

चौथ्या दिवशीं वडिलांच्या तोंडचें पाणी पळालें. दाराला धक्के मारून

ते म्हणाले, " दार उघड बाळ, मला आंत येऊं दे. "

तरीहि मुलगा ऐकत नाहीं असें पाहून त्यांनीं शांग–आन आणि चार नोकर यांच्या मदतीनें दार उचकटून काढलें. वाँग पिन निपचित पडलेला होता ! मुलाची दीन अवस्था पाहून त्यांचें धाबें दणाणून गेलें. ते जवळ जवळ धांवतच नोकरांच्या खोल्यांकडे गेले आणि शांग–माला हांक मारून म्हणाले, " कोंबडीचा ऊन ऊन रस्सा एका भांड्यांत आण– "

शांग–आननें आणून दिलेला रस्सा पुढें करून त्यांनीं मुलाला म्हटलें, " माझ्यासाठीं तरी ह्यांतलं थोडसं घे, बाळ. " चांदीच्या चमच्यानें शांग–आननें वाँग पिनचा जबडा उचकटून धरला, आणि वडिलांनीं त्याच्या तोंडांत गरम रस्सा सोडला. अशक्तपणानं खोल गेलेल्या सुरांत वाँग पिन म्हणाला, " मला जगावंसं वाटत नाहीं. मला मरूं द्या– " आणि पुन्हां तो शोक करूं लागला.

शांग–आन स्वत:शींच पुटपुटला, " काय पितृद्रोही पोर आहे ! मोठ्यानें तरी बोलूं नकोस बाबा ! मृतात्म्यांच्या कानांवर हें गेले तर नसती पीडा ! "

थोडेसें पोटांत गेल्यवर वाँग पिनला अंमळ हुशारी वाटली. त्या दिवशीं संध्याकाळीं तो आपल्या खोलींत थोडेसें जेवला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्यानें सगळ्यांना चकित करून सोडलें. दाढी वगैरे उरकून, कपडे करून तो सकाळींच जेवण घरांत वडिलांच्या समोर नाश्ता करण्यासाठीं येऊन बसला.

वाढपी निघून गेल्यावर पितापुत्र एकटेच तेथें होते. वाँग पिनचें खाण्याकडे विशेष लक्ष नव्हतें. हातांतल्या काड्यांशीं तो खेळत होता. मध्येंच एकदम त्यानें वडिलांकडे पाहून आजीजीच्या स्वरांत म्हटलें, " बाबा, माझ्यावर दया करा. आणि माझं शेवटचं मागणं ऐका. मला माहित आहे कीं देवानें जेवढी आपली आयुर्मर्यादा ठरवून दिली आहे, तेवढा काल आईवडिलांच्या कृपेनें प्राप्त झालेल्या देहाची आपण काळजी घेतली पाहिजे. नाहींतर पुढील जन्मांत त्याचे झाडे द्यावे लागतील. काल रात्रीं मला जगण्याची इच्छा उरली नव्हती. एखादें वीष घेऊन सुटका करून घ्यावी

असं मला वाटत होतं. पण आत्महत्त्या केली तर अठरा नरकांतून हिंडावें लागेल हें लक्षांत येऊन मी घाबरलों. नरकांत मला शिन–लिएन कशी दिसेल ? ती पवित्र होती. चांगली होती. ती स्वर्गांतच असणार. या सगळ्याचा विचार करून मी ठरवलं आहे कीं, भिक्षु व्हावं हें उत्तम."

वाँग कुंगच्या हातांतील पेजेचें भांडें गळून पडलें. तोंडाचा आ करून तें मुलाकडे पाहातच राहिले.

वाँग पिन तळमळून पुन्हां म्हणाला, "बाबा, करा नं मला या संसारांतून मुक्त ! माझी फार फार इच्छा आहे कीं पश्चिमेकडल्या डोंगरांतल्या विहारांत जावं. तिथें रहावं. तसं करणं स्वर्गाच्या किंचित् जवळ जाण्यासारखं होईल. आणि – आणि शिन–लिएनच्याही जवळ गेल्यासारखं मला वाटेल ! "

आपल्या मुलाला वाँग कुंग चांगले ओळखत होते. आत्महत्त्येपेक्षां भिक्षु होण्याचा उपाय त्यांनाहि त्यांतल्या त्यांत बरा वाटला. बराच वेळ गेल्यावर ते म्हणाले, " तुझी फारच इच्छा असेल तर माझी ना नाहीं. पण विहारांतलं आयुष्य सुखानं जावं म्हणून मी पैसे देईन ते तुला घेतले पाहिजेत. "

वाँग पिननें एक दीर्घ सुस्कारा सोडला. त्याचें मन शांत झालें. आतां परमेश्वरी कृपेची याचना करायला तो मोकळा होता.

पहांटेच पितापुत्र विहाराकडे जाण्यास निघाले. शेजाऱ्यांना उगीच बडबडायला जागा राहूं नये या विचारानें ते उभयता दोन निराळ्या रिक्षांतून गेले. वाँग पिननें ऐश्वर्य मागें ठेवून साधीं निळ्या रंगाची कफनी आणि साधे काळ्या रंगाचे कापडी बूट एवढीच वेषभूषा केली होती.

डोंगराच्या पायथ्याशीं रिक्षा जाऊन उभ्या राहिल्या. वाँग पिन खालीं उतरला. तीन वेळां वडिलांच्या पायां पडला. मायेनें आजवर संगोपन केल्याबद्दल त्यानें त्यांचे आभार मानले आणि म्हातारपणीं त्यांना सोडून जात असल्याबद्दल क्षमा मागितली. नंतर कपडयांचें लहानसें गाठोडें उजव्या बगलेंत मारून तो विहाराच्या प्रवेशद्वाराकडे जाण्यासाठीं डोंगर चढूं लागला !

छोटी बेबी एक वर्षाची झाली ! अजून तिचें नांवहि ठेवलें नव्हतें. शांग–माला वाईट वाटलें. सकाळीं ती आपल्या नवऱ्याला म्हणाली, " देवाच्या दयेनें छोट्या बाईसाहेब एक वर्षाच्या झाल्या. पण अजून त्यांचं नांवहि ठेवलं नाहीं. आजोबा तर नातीला अजिबात विसरल्यासारखे दिसतात ! आपण त्यांना विचारूं या. तुम्हांला धीर होईल कां ?"

त्याप्रमाणें डॉक्टरसाहेबांच्या पुढ्यांत सकाळचें खाण्याचें देऊन झाल्यावर शांग–आन अदबीनें म्हणाला, " धनी, एक वर्ष झालं – माझी बायको आपल्या नातीचं पाहत आली आहे; छोट्याबाईंचं नांव ठेवायला पाहिजे आतां –"

वाँग कुंग टेबलाजवळून उठण्याच्याच बेतांत होते. सुनेचं वर्षश्राद्ध आणि मुलाचें विहारांत प्रयाण या दोन गोष्टींची आठवण होतांच त्यांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. आपले पिंगट डोळे उचलून त्यांनीं शांग–आनवर रोखले आणि चिडून म्हटलें, " काय लागेल तें नांव ठेवा तिचं. थांब, सिआओ–शेनचे ठेव. सिआओ–शेन म्हणजे धुळीचा कण ! नाहींतरी तिची काय अधिक लायकी आहे त्यापेक्षां ? नालायक कार्टी ! जन्माला आली अन् आम्हांला दुःखांत लोटून दिलं. तुम्हीं दोघांनीं तिला माया लावली आहेत. तुम्हींच तिचं संगोपन केलं आहेत. तुम्हांलाच असूं द्या ती– "

अशा रीतीनें शांग-माची नात शांग-टेह याच्या सहवासांत, नोकरांच्या खोल्यांतून एकमेकांशीं खेळत सिआओ-शेन वाढूं लागली. वर्षांमागून वर्षं गेलीं. आपल्या आईच्या आणि आजीच्या प्रेमांत हा वाटेकरी आला अशी समजूत करून घेऊन टेह मधून मधून तिच्याशीं भांडे. ती त्याचें थोबाड बोचकारून काढी. तो तिच्या वेणीचे शेपटे ओढी. पण बहुतेक वेळीं ते आनंदानें एकमेकांशीं खेळत.

सिआओ-शेन पांच वर्षांची असतां एके दिवशीं शांग-मा आपल्या पतीजवळ जाऊन म्हणाली, " मला तुम्हांला कांहीं सांगायचें आहे. आपली छोटी बच्ची आतां नोकरांच्या संगतींत वाढणें बरोबर नाहीं. मालकांच्या रक्तमांसाची ती आहे. त्यांच्याच देखरेखेखालीं तिनं राह्यला

पाहिजे. शिवाय मी पुष्कळ दिवस पाहतेय मालकांना एकटें एकटें वाटतंय ! म्हणून मला वाटतें, आतां नातीला जवळ करायला ते तयार होतील. ''

शांग-आननें मान डोलावून म्हटलें, '' तुझें म्हणणें बरोबर आहे. पण त्यांच्याशीं बोलायचें तर योग्य वेळेची वाट पाहावी लागेल मला. अलिकडे त्यांचा स्वभाव फार चिरचिरा होत चालला आहे. ''

कांहीं दिवसानंतर एके दिवशीं दिवाणखान्यांत दुपारची वामकुक्षी करीत डॉक्टर पडले असतांना शांग-आन त्यांच्याजवळ गेला, आदरानें त्यानें मान लववली आणि वाघ मागं लागल्यासारखा भरभर तो बोलत सुटला.

'' धनी, आतां आपली नात पांच वर्षांची झाली आहे. आपण एकदां त्यांच्यावर नजर टाका. देवाच्या दयेनं त्यांना रूप आहे. बुद्धि आहे. परवांच माझ्या नातवाचें आणि त्यांचें भांडण जुंपलें. माझा नातू रागानें म्हणाला, 'माझी आहे आजी ती. तुझी नाहींच मुळीं.' हें ऐकल्यावर छोट्या बाईसाहेबांना फार वाईट वाटलें. रडून रडून डोळे सुजवून घेतले. माफ करा मला. पण मी एक सांगूं कां– ? '' थोडा वेळ थांबून तो म्हणाला, '' बाईंना इथें घराच्या पुढल्या भागांत आणावं आणि इथेंच त्यांना राहूं द्यावें – ''

त्याला आश्चर्यच वाटलें. कारण मालकांनीं त्याच्याकडे करूण नजरेनें पहात थकलेल्या आवाजांत म्हटलें, '' बरोबर आहे तुझें. तिला इथंच राहिलं पाहिजे. तुझ्या बायकोला उद्यां तिला इथें घेऊन यायला सांग. बरं पण, माझी खुर्ची ताबडतोब घेऊन यायला सांग पाहूं – ''

दुसऱ्या दिवशीं सकाळीं न्याहरी झाल्यानंतर सिआओ-शेननें आजोबांना नमस्कार केला आणि चौकांत ती इतस्ततः हिंडू फिरूं लागली. नवीनच अंगण तिला खेळायला मिळालें. दगडी पायऱ्या चढून जाऊन ती हिरव्या चिनीमातीच्या भांड्यांतले मासे पाहूं लागली.

थोड्याच वेळांत शांग-मा बाहेर आली. पाण्याची बादली भरून तिनें तिच्या हातांत दिली आणि चौकांत वाढणाऱ्या फुलझाडांना पाणी घालण्यास तिला सांगितलें. झाडांना पाणी घालीत असतांना सिआओ-शेननें कुणाचा तरी विव्हळण्याचा आवाज ऐकला. आजोबांच्या दवाखान्यांतून तो येत होता.

घाबरून जाऊन तिनें शांग-माच्या झग्याची बाही घट्ट धरली अन् ओरडून म्हटलें, " इथें नको. मला नाहीं इथें राह्यचें. टेह म्हणत होता कीं आजोबा वाईट आहेत. लोकांना त्रास देणें त्यांना आवडतें. मी ऐकलें आहे लोक ओरडत तें आमच्या कानांवर आलें होतें – "

" नाहीं बरं, " शांग–मा म्हणाली, " तुमचे आजोबा लोकांना त्रास देत नाहींत. ते उलट त्यांना बरं वाटायला मदत करतात. "

एक विलक्षण विचार तिच्या मनांत डोकावून गेला. ती म्हणाली, " हें पहा, आपण आंत जाऊं अन् आजोबा काय करीत आहेत तें पाहूं, हं ! "

" नको–नको ! " सिआओ–शेन ओरडून म्हणाली, " मला नाहीं आंत जायचं. मला भीति वाटतें ! "

" पण माझ्या सोनुकल्या, मी आहे ना बरोबर – "

तिनें त्या भेदरलेल्या पोरीला ओढीतच आपल्या बरोबर चालविलें. म्हातारी तशी स्वतः घाबरतच होती. पण आंत काय चाललें होतें तें पाहण्याची तिलाहि इच्छा होती. दारावरचा लाल सॅटीनचा जाड पडदा तिनें बाजूस सारला आणि आंत डोकावून म्हटलें, " धनी, आपल्या नातबाईंना दवाखाना पाह्यची इच्छा झाली आहे – "

" ये आंत– " डॉक्टरसाहेब प्रसन्नपणानें म्हणाले.

शांग-मानें सिआओ-शेनला आंत ढकललें. नातीनें सगळीकडे ओझरती नजर टाकली. शेल्फवर ठेवलेलीं पुस्तकें आणि चिनीमातीच्या बरण्या तिला खोलीभर दिसून आल्या. हें सर्व पाहून झाल्यावर तिची दृष्टि आजोबांवर. खिळून राहिली. त्यांच्या मुद्रेंतला प्रेमळपणा पाहून तिची भीति दूर पळाली.

सरते शेवटीं मघाशीं विव्हळत असलेल्या मनुष्याकडे तिची दृष्टि गेली. डावा पाय समोरच्या स्टुलावर ठेवून तो एका खुर्चीवर बसला होता सहानुभूतीनें चकाकणारे सिआओ-शेनचे विशाल डोळें पाहून तो तिला म्हणाला, " छोट्या बाईसाहेब, आतां खलास. वरं झालं दुखणं. मला उभं राहवत देखील नव्हतं, इतका माझा पाय दुखत होता. पण डॉक्टरसाहेबांनीं तो आतां बरा केलाय्. "

अवघडलेल्या स्थितींतून त्यानें उठून उभें राहण्याचा प्रयत्न केला. डॉक्टरांनीं त्याची अडचण ओळखून त्याचा हात धरला आणि त्याला फाटकापर्यंत पोहोचविलें.

डॉक्टर परत आले तेव्हां शांग-मा समंजसपणें निघून गेल्याचें आणि आपली नात एकटीच तिथें उभी असल्याचें त्यांना आढळून आलें. टेबलाजवळ जाऊन ते वसले आणि म्हणाले, " काय ? सिआओ-शेन, कसं काय आवडलं आमचं हपीस ? "

तिनें मान हलवून म्हटलें, " फार, फार आवडलं, आजोबा ! मी रोज इथें आलें तर चालेल ? "

" कां नाहीं ? जरूर ये–", आनंदानें त्यांनीं प्रत्युत्तर केलें.

नंतर तीं जेवायला बसलीं, तेव्हां आपली भाताची ताटली तिनें उचलली आणि त्यांच्याजवळ येऊन त्यांना बिलगून ती म्हणाली, " मी तुमच्याजवळ वसूं, आजोबा ? टेबलाच्या त्या टोंकाला फार लांब पडतें."

आनंदानें त्यांनीं म्हटलें, "ये कीं. बैस इथें जवळ. अन् मला सोबत कर हं. "

रोजच्या त्यांच्या बोलण्या चालण्यावरून वाँग कुंगनीं ताडलें कीं पोर फार हुशार आहे. समाधान वाटलें त्यांना ! तिच्या शिक्षणाचा विचार त्यांच्या मनांत घोळत होताच. एक खाजगी शिक्षक पाहण्याचें त्यांनीं ठरविलें. पण त्यांना वेळ नसल्यामुळें त्यांनीं शांग–आनवर ती कामगिरी सोंपवली. नित्याच्या संवयींनुसार शांग–आननें हें कोडें बायकोपुढें टाकून म्हटलें, " धनीसाहेबांचा आपल्यावर फार विश्वास बरं कां. आपण त्यांच्या नातीला आजवर वाढविलें. आतां तिच्या शिक्षणाची काळजी वाहण्याचीहि कामगिरी त्यांनीं आपल्यावरच सोंपवली आहे."

शांग-मा हंसून म्हणाली, " म्हणजे, तुम्हीच तिला शिकवावें असें तर त्यांना म्हणायचं नाहीं ना ? मग बोलायलाच नको ! तुम्हांला दहा अक्षरें येत असतील तर शपथ ! "

" ए–तूं माझी चेष्टा करते आहेस अं ! ध्यानांत ठेव मला दहाच काय पण आणखी कितीतरीं अक्षरें चांगलीं येतात, समजलें ? पण आपण कांहीं

मास्तर नाहीं ! मला जाऊन एखादा मास्तर हुडकून आणला पाहिजे."

वास्तविक त्याला माहित होतें कीं, या कोड्याचें उत्तर आपली बायको झटकन् देईल त्यामुळें जेव्हां ती म्हणाली कीं, "मला माहीत आहे एक चांगला माणूस. आपण आपल्या मुलांना पाठवायचीं पत्र ज्याच्याकडून लिहून घेतों तो चांगलं शिकवील तिला." तेव्हां त्याला मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं.

शिकवणीचा पहिला दिवस उजाडला. सिआओ-शेन अत्यंत आतुर झाली होती. सकाळचें खाणें धडपणानें खाण्याचें देखील तिला सुचलें नाहीं. गडबडीनें ती टेबलाजवळून उठली आणि शांग-माकडे धांवत जाऊन म्हणाली, "नाय, नाय ! कुठें आहेत माझे मास्तर ?"

"अजून आले नाहींत ते" शांग-मानें उत्तर केलें, "पहिला पगार उडवून झाला म्हणजे मग येतील बहुतेक. महिन्याचा पगार आगाऊ देण्याची त्या काळची पद्धत होती.

बऱ्याच वेळानें एक किरकोळ देहाचा मनुष्य मधल्या चौकांत आला. त्याला शांग-आननें दिवाणखान्यांत नेऊन बसविलें. शांग-मानें सिआओ-शेनला हाताला धरून त्यांच्या पाठोपाठ नेलें.

शिक्षकांनीं निळ्या रंगाचें गाठोडें सोडलें आणि त्यांतून एक पातळ कागदी पुठ्ठ्याचें पुस्तक बाहेर काढून सिआओ-शेनला दाखविलें. पहिलें पुस्तक होतें तें. एका अक्षरावर त्यांनीं बोट ठेवलें. माणसाची आकृति त्या अक्षरापुढें काढली होती. ते म्हणाले, "जेन-"

तिनें तो शब्द उच्चारला. नंतर पुढच्या दोन शब्दांवर त्यांनीं बोट ठेवून म्हटलें-"ह्सो" हाताचें चित्र पुढें काढलें होतें. "शिआओ" पायाचें चित्र.

नंतर त्यांनीं ते शब्द लिहिलेला एक कागद तिच्यापुढें ठेवला आणि ब्रशानें तशींच अक्षरें काढायला तिला सांगितलें.

दुपारीं डॉक्टरांनीं आपलें काम संपविलें तेव्हां ती धांवतच आंत त्यांच्याकडे गेली आणि म्हणाली, "आजोबा, मला वाचतां यायला लागलें. अन् लिहायला सुद्धां !" आणि ती आनंदानें नाचत सुटली.

त्यांच्या तोंडून शब्दहि बाहेर पडण्याची वाट न पाहतां तिनें आजोबांचा

एक ब्रश उचलून घेतला आणि प्रिस्क्रीपशन लिहून देण्याच्या एका कोऱ्या कागदावर नुकतींच शिकलेलीं अक्षरें काढून दाखविलीं. वेडीवांकडीं होतीं तीं – पण सुवाच्य होतीं.

वाँग कुंग संतुष्ट होऊन म्हणाले, " तुझ्या छोट्या डोक्यांत जितकं मावेल तितकं शिकवीन मी हं ! वाँग घराण्यांत आहेस तोंवर लागेल तितकं शीक – "

सिआओ-शेननें आपलें डोकें शांग-माच्या मांडीवर ठेवलें, अन् विवळून म्हटलें, " नाय,-नाय. माझं डोकं फार दुखतंय् ग ! "

म्हतारीनें पोरीच्या कपाळावर हात ठेवून पाहिलें. अंगार पेटल्यासारखें कपाळ तापलें होतें. झटकन् तिनें तिला बिछान्यावर झोंपविलें आणि पायांत बळ आणून होईल तितक्या त्वरेनें ती अंगणांतून चालत गेली. शांग-आनला हांक मारून म्हणाली, " धनी कुठें आहेत ? आपल्या छोट्या बाईसाहेबांना बरं वाटत नाहीं. "

डॉक्टर नित्याच्या व्हिजिट्स्साठीं बाहेर गेले होते. शांग-आनला ते यावेळीं नक्की कुठें असतील हें सांगणें शक्य नव्हतें. तरीपण आपलें अज्ञान झांकण्याच्या हेतूनें तो म्हणाला, " यायची वेळ झालीच त्यांची ! "

आपल्या हाडकुळ्या हाताचीं बोटें मोडून शांग-मा धांवतच परत गेली. उकाड्याचे दिवस होते तरी तिनें सगळ्या खिडक्या लावून घेतल्या. आणि मुलीच्या अंगावर जाड रजईचें पांघरुण घातलें. पुन्हां ती बाहेर गेली. त्याचवेळीं मोठें फाटक उघडलें गेलें आणि डॉक्टरांची चौघांनीं वाहून आणलेली खुर्ची आंत आली. खुर्ची जमिनीला टेकतांच डॉक्टर बाहेर आले, आणि म्हणाले, " सिआओ-शेन कुठें आहे ? "

" धनीसाहेब, त्यांना बरं वाटत नाहीं. पाह्यला चला–", शांग-मा सद्गदित कंठानें म्हणाली.

डॉक्टरांनीं आपला लांब झगा उचलून धरला आणि लगबगीनें ते झोंपण्याच्या खोलीकडे निघाले. सिआओ-शेन गुंगींत पडली होती. डोळे मिटले होते. पण तिला स्वस्थ झोंप लागली नव्हती. त्यांनीं तिचें उजवें मनगट धरलें आणि नाडी पाहण्याचा प्रयत्न केला. डाव्या मनगटाचीहि नाडी

पाहून झाल्यावर ते म्हणाले, " माझ्या सोन्या, तोंड उघड पाहूं जरा. "

क्षणभर तिनें डोळे उघडून पाहिले. " आजोबा " म्हणून हलकेंच म्हटलें, आणि ताबडतोब डोळे मिटून घेतले. वाँग कुंगनीं शांग-माकडे पाहून विषादपूर्ण आवाजांत म्हटलें, " कांहीं समजत नाहीं. तिला काय होतंय् तें मला सांगतां येत नाहीं. अतिमायेनें माझे डॉक्टरीचें ज्ञान हिच्या बाबतीत निरुपयोगी ठरतंय्. ली कायला बोलवून घ्यायला सांगा कुणाल तरी. "

ली काय हे त्यांचे समव्यवसायी होते. त्यांचीहि प्रॅक्टीस चांगली होती. पण ते दोघेहि एकमेकांचे प्रतिस्पर्धी नसून चांगले स्नेही होते. अधून मधून वाँग कुंग त्यांच्या कुटुंबियांना औषधपाणी करीत असत. म्हणून यावेळीं मदतीसाठीं वाँग-कुंगनीं त्यांना पाचारण केलें.

ली कायनीं मुलीची प्रकृति पाहिली आणि दाढीवरून हात फिरवीत म्हटलें " बरीच आजारी आहे पोर. पोटांत बिघाड आहे. त्यामुळें विकार निर्माण झाला आहे. आजपासून उकळलेलें मिठाचे पाणी आणि माती याशिवाय कांहींहि खायला द्यायचें नाहीं.

सिआओ-शेनजवळ बसून राह्यला मिळावें म्हणून वाँग कुंगनीं आपल्या साऱ्या व्हिजिट्स् रद्द केल्या. तिची शुश्रूषा करण्याचा त्यांचा विचार होता तीन दिवस तापानें पोरगी नुसती तडफडत होती. नंतर हळूंहळूं तिचा ताप उतरला. पण तिला सारखे रेच होऊं लागले. शांग-मा सारखी तिच्याजवळ बसून होती. अंग साफ करणें, धुणें, हें जवळ जवळ एक सारखें तिला करावें लागे. पहिल्यांदा रक्त पडलें, ती निराशेनें कपाळावर हात मारून म्हणाली, "सोन्या, किती दिवस झाले. अन्नाचा कणहि तुझ्या पोटांत गेला नाहीं. अन् आतां तर रक्त पडायला लागलं अन् आंव ! "

डॉक्टरांना हें समजतांच ते खूपच घाबरले. आणि निराश होऊन म्हणाले, " अमांश झाला आहे तिला. " सिआओ-शेन जास्त खराब दिसूं लागली. एके दिवशीं शांग-आन खोलींत आलेला दिसतांच शांग-मा धांवतच त्याच्याजवळ गेली आणि स्फुंदत म्हणाली, " पोर वांचण्याचं लक्षण दिसत नाहीं हो ! थोड्या दिवसाची सोबती आहे ती- "

वांग कुंगच्या मतें हे शब्द आपल्या नातीनें ऐकायला नको होते. म्हणून ते जागचे उठून उभे राहिले, आणि त्यांनीं काडकन शांग-माच्या मुस्काटांत मारली. तिची उन्मादावस्था आटोक्यांत आणण्यासाठीं त्यांनीं हा प्रहार केला खरा, परंतु नंतर त्यांचा स्वत:वरचाच ताबा सुटला. आणि बिछान्याच्या शेजारीं बसून ते ढळढळां रडूं लागले.

मालकाचें अवसान गळलें आहे हें पाहून तो स्थूल नोकर पुढें आला आणि त्यांना हाताला धरून त्यानें खुर्चीवर बसविलें. नम्रपणानें मान लववून तो म्हणाला, " धनी, बोलतों. कसूर माफ करा. पण मला वाटतं-" थोडा वेळ घोटाळला, पण लगेच घाईघाईनें पुढें म्हणाला, " मला वाटतं, छोट्या बाईसाहेबांना गोऱ्या डॉक्टरांच्या इस्पितळांत घेऊन जावं. पाहावं त्यांना कांहीं यांतील जमलं तर–"

संतापानें वर मान करून वाँग कुंग ओरडले, " परक्यांच्या इस्पितळांत ? अन् माझी नात ? शक्य नाहीं. मरायचंच असेल तिला तर इथेंच मरूं दे–"

सिआओ–शेन अशक्तपणामुळें बोलूं शकत नव्हती. पण तिचा मेंदू तल्लख होता. तिच्या ओठांवर भेगा पडल्या होत्या. तोंड कोरडें पडलें होतें. आणि जीभ टाळूला चिकटली होती. त्या तिघांमध्यें शांग–आन काय तो स्थिर चित्त होता. निर्वाणीचा प्रयत्न करून पाहण्याचें त्यानें ठरविलें. बिछान्याजवळ जाऊन तो हलकेच म्हणाला, " बाई– खूप जगायचं आहे नं आपल्याला ? मग त्याकरितां परक्यांच्या इस्पितळांत जावं लागलं तर तुम्हांला आवडेल नं ? "

तिनें निस्त्राणपणें मान हलवली. त्यासरशीं शांग–आन ओरडून म्हणाला " पाहा ! त्यांची इच्छा आहे. त्या जायला राजी आहेत. त्यांच्या आयुष्याचा हा प्रश्न आहे. तुम्हांला मोडतां घालतां येणार नाहीं. ! "

वाँग कुंगनीं नातीचा रोडावलेला हात हलकेच हातांत धरून म्हटलें, " बबड्या, खरंच तुला त्या परक्यांच्या इस्पितळांत जावसं वाटतं ? "

त्यांच्याकडे पाहात ती क्षीण आवाजांत पुटपुटली, " होय ! "

नोकरांनीं ताबडतोड स्वयंपाकघराचें दार उचकटून काढलें. त्यावर गुलाबी रंगाची रेशमी दुलई शांग–मानें अंथरली. वाँग–कुंगनीं पोरीला हलकेच

उचलून त्यावर ठेवली, आणि तिच्या अंगावर दुसरी एक रेशमी दुलई घातली. शांग–आन सगळ्यांच्या पुढें निघाला. चार नोकरांनीं हा तात्पुरता स्ट्रेचर उचलून धरला, अशा रितीनें अनेक बोळकांड्यांतून जात जात ते अखेरीस त्या परकी इस्पितळाजवळ येऊन ठेपले.

एक अमेरिकन नर्स त्यांना पाहून पुढें आली. तिनें पांढराशुभ्र परीट घडीचा गणवेष अंगावर घातला होता. पण तिच्या कपड्यांचा पांढरा रंग पाहून शांग–आनचें रक्तच गोठलें. एखाद्याला पोंचवायला निघाल्यासारखी ही बाई अशुभ रंगाचे कपडे घालून नसती आली तर त्याच्या मतें बरें झालें असतें. कारण त्याच्या दृष्टीनें पांढरा रंग सुतकाचा निदर्शक. आजारी मनुष्य जिवंत आहे तोंवर तांबड्या रंगाचा पोषाख हाच शुभ ! अवसान झाल्यावर पांढरा ठीक आहे ! पुढें येऊन नर्सनें स्मित करून म्हटलें, " हीच कां तुमची छोटी छोकरी ? "

त्या परधर्मीय बाईला चिनी भाषा येत आहे, हें पाहून त्याला हायसें वाटलें. आतां तो धीटपणानें म्हणाला, " माझी नाहीं. पण आम्ही नवरा-बायको तिला आमच्या पोटच्या गोळ्यापेक्षां जास्त मानतों. कसेंहि करा पण तिला वांचवा हो ! "

सिआओ–शेनला घालण्यासाठीं रोग्याचे कपडे आणायला नर्स गेली. थोड्याच वेळांत ती परत आली. ती येण्याच्या आंत शांग–आन तिथून घाईं घाईनें निघून गेला होता. नर्सला आश्चर्यच वाटलें. पण तिचा छोटा रोगी अत्यवस्थ होता. आश्चर्य करीत बसण्याची ती वेळ नव्हती. तिनें झटकन् पुढें होऊन सिआओ–शेनचे तांबडे रेशमी कपडे काढले. तिला स्वच्छ आंघोळ घातली. पांढऱ्या रंगाचा सुती सैल झगा नंतर तिच्या अंगावर चढवला.

थोड्याच वेळांत एक उंचापुरा, दाढी वाढलेला, गोरा मनुष्य तिच्या खोलींत आला. तिच्या कॉटजवळ जाऊन त्यानें आपल्या शुभ्र कोटाच्या खिशांतून एक यंत्र बाहेर काढलें. आणि मुलीच्या छातीला तें लावून तो ऐकूं लागला. त्यानें मान हलवली. नर्सनें 'समजलें' अशा अर्थानें आपली मान तुकवली. दोघेंहि तेथून गेलीं. पण थोड्याच वेळानें फिकट पिवळ्या

गाचें पातळ द्रव्य असलेली एक मोठी बाटली घेऊन तीं परत आलीं. ती बाटली त्यांनीं एका उंच काठीला बांधली. नंतर त्यांनीं मुलीच्या दंडाला भोक पाडल्यासारखें केलें. आणि त्या छिद्रावाटें बाटलींतलें औषध हळुहळू दंडांत जाईलसें केलें. भोंवतालचे रोगी भीतीनें आ करून पाहत राहिले.

रोज डॉक्टर येत आणि नर्सच्या मदतीनें काठीला टांगून ठेवलेलें बाटलींतलें औषध तिच्या दंडांत नीट जात आहेसें पाहात. जलाभावामुळें शुष्क झालेल्या त्या मुलीच्या शरीरावर त्या औषधाचा अनुकूल परिणाम झाला. तिला बरें वाटूं लागलें. अमांश थांबल्यावर तिची प्रकृति झपाट्यानें सुधारूं लागली. थोडयाच आठवडयांच्या अवधीनंतर शांग–आनला बोलावून घेण्यांत आलें. तिची स्थिति पुष्कळच सुधारलेली पाहून त्यानें मोठ्या विजयानंदानें तिला घरीं नेलें.

एक वर्षभर सिआओ–शेनचें शिक्षण झाल्यावर आजोबांनीं ठरविलें कीं आतां एका शिक्षकानें भागणार नाहीं. आणखी शिक्षक पाह्यला पाहिजेत. पुन्हां त्यांनीं शांग–आनला बोलावून घेतलें आणि म्हटलें, "मुलासारखं तिला शिकवावं असं मला वाटूं लागलंय्! तिला झेपेल तितकं मी शिकवणार आहे."

शांग–आननें मस्तक लववून म्हटलें, "धनी, बाईसाहेबांच्या गुरुजींनीं त्यांच्या हुषारीची माझ्याजवळ खूप स्तुति केली आहे. परवांच माझ्या मनांत आलं होतं कीं त्यांना त्या फिरंगी लोकांच्या शाळेंत घालावें. तिथं त्याचं शिक्षण खूप होईल."

मालकांचा चेहरा लालबुंद झाला. त्यांच्या कपाळावरील शिरा ताठ झाल्या. ते रागानें म्हणाले, "परक्यांचा कुत्रा आहेस तूं. त्यांच्यावर तूं इतका का फिदा आहेस रे? तुझ्या ध्यानांत कसं येत नाहीं? या परक्यांनीं शेंकडों वर्षं आपल्या देशावर आक्रमण चालविलं आहे. आपल्या देशांत त्यांनीं लूट मांडली आहे. आपल्या किनाऱ्याकडे जरा पहा. प्रत्येक बंदरांत कत्तल, लूट आणि लढाई यांचा नुसता हैदोस त्यांनीं घातला आहे. पोर्तुगीज लोक पहिल्यांदा आले तेव्हांपासून–"

बोलतां बोलतां त्यांना धाप लागली, त्यांच्या तोंडून अक्षर बाहेर पडेना.

शांग-आन स्तिमित होऊन उभा राहिला. काय बोलावें हेंच प्रथम त्याला सुचेना. थोडया वेळानें त्यानें विषण्णपणानें मान हालवून म्हटलें, " खरंय धनी. हे परकी लोक फार निर्दय आहेत. पण अमेरिकन लोकांनीं काय केलंय ? त्यांनीं कांहीं आपला देश बळकावला नाहीं. आणि त्यांनींच आपल्या छोटचा बाईसाहेबांना जीवदान दिलं, नाहीं कां ? "

अंमळ शांत होऊन वाँग कुंग म्हणाले, " होय ! त्यांनींच तिला वाचविलें. कसें, कोण जाणे ! "

आपला मुद्दा पुढें ढकलण्याची हीच वेळ आहे, असें जाणून शांग-आन लगबगीनें म्हणाला, " मग बाईसाहेबांना अमेरिकन लोकांच्या शाळेंत घाडायला काय हरकत आहे ? "

" नाहीं. " वाँग कुंग त्वेषानें ओरडले. त्यांच्या या निर्णयांत बदल होणें शक्य नाहीं हें जाणून शांग-आननें मस्तक नम्र केलें आणि तेथून काढता पाय घेतला. पण त्याला वाईट वाटलें.

पण खूप विचार केल्यावर वाँग कुंगना ती सूचना विचारार्ह वाटूं लागली. त्यांत तथ्य आहे असें त्यांनाहि पटूं लागलें. शेवटीं सिओआ-शेनला अमेरिकन मिशननें चालविलेल्या शाळेंत घालण्याचें त्यांनीं निश्चित केलें.

मेथडिस्ट मिशननें चालविलेल्या मुचेन कन्या शाळेंत सिआओ-शेनला पांचवीच्या वर्गांत दाखल करण्यांत आलें. शाळेच्या नवीन वातावरणांत ती लवकरच रमून गेली. धारणाशक्ति, पाठांतर शक्ति मूळचीच चांगली असल्यामुळें तिला चांगले गुण मिळत गेले. संध्याकाळचा एकच तास तिला घरीं दिलेल्या सगळया अभ्यासाला पुरत असे.

शाळेच्या रोजच्या कार्यक्रमांत प्रातःकाळीं चर्चमध्यें सगळयांनीं प्रार्थनेला जमण्याचा प्रघात होता. हिवाळयांतल्या एकें दिवशीं सकाळीं शाळेंतल्या मिस बियर नांवाच्या शिक्षिकेनें उपदेशाचा पाठ घेतला. मातीच्या कणांतून माणसांच्या देहाची निर्मिती होत असते असें त्या सांगत असल्याचें सिआओ-शेननें जाणलें. तिला मोठी गंमत वाटली ! तिच्या मनांत आलें कीं– तिच्या आजोबांनीं खूप दिवसांपूर्वी, म्हणजे तिच्या नामकरणाच्या

वेळीं, हेंच म्हटलें होतें. धुळीच्या कणाशीं तिची तुलना केली होती. ती मनांत म्हणाली, " पुन्हा केव्हां तरी आजोबा भेटले कीं त्यांना सांगेन मिस बियरबाईंचंहि अगदीं तुमच्यासारखंच मत आहे. "

प्रार्थना संपल्यावर बाहेर पडतांना कुणीतरी तिच्या हातांत एक चिठ्ठी आणून दिली. प्रिन्सिपॉल बाईंचें तें बोलावणें होतें. तिला भेटायला बोलावलें होतें त्यांनीं. अशी वरून ऑफिसांतून भेटायला चिठ्ठी येणें म्हणजे आपत्तीच असें तिला इतर मुलींकडून समजलें होतें. म्हणून ती घाबरली. आणखी दुसऱ्या चार मुलींनाही पण तिच्यासारख्या चिठ्ठ्या मिळाल्या.

सिआओ–शेन समोर उभी राहिलेली पाहतांच प्रिन्सिपॉलबाई, मिस हाऊटन, यांचा चेहरा सात्त्विक संतापानें लाल झाला. त्या म्हणाल्या, " सिआओ–शेन, प्रार्थनेच्या वेळीं तुला डोळे उघडतांना मीं पाहिलं. "

कोणतीहि मुलगी आजवर त्यांना उलट उत्तर करायला धजली नव्हती, पण सिआओ–शेन न राहवून म्हणाली, " तुम्हांला कसं समजलं ? "

" प्रत्यक्ष माझ्या या डोळ्यांनीं मीं पाहिलंय् ! " रागानें निळ्या पडून त्या पुढें म्हणाल्या, " का डोळे उघडलेस तूं ? "

मृदु स्वरानें सिआओ–शेननें उत्तर केलें, " तुमचे डोळे उघडे आहेत कीं काय हें पाहण्यासाठीं मी आपले डोळे उघडले. "

काय बोलावें तें न सुचून मिस हाऊटन तरातरा खोलींतून बाहेर गेल्या. आणि मेट्रनला मिसेस डॅनना– घेऊन आल्या. " मिसेस डॅन, या मुलीला नेऊन तिच्या खोलींत कोंडून ठेवा ! " त्यांनीं हुकूम सोडला.

खालीं मान घालून मुकाट्यानें सिआओ-शेन वसतिगृहाकडे चालूं लागली. वाटेंत मिसेस डॅन प्रेमळपणानें म्हणाली, " घाबरूं नकोस हं. बाईंचा राग फार वेळ टिकत नाहीं. "

सिआओ-शेन स्मित करून म्हणाली, " पण कशाबद्दल मला ही शिक्षा आहे हेंच मला समजत नाहीं. त्यांनीं सुद्धां डोळे उघडले होते. "

शेवटचा तास झाल्यावर डॅनबाई खोलींत आल्या आणि म्हणाल्या, " ऊठ आतां. कपडे कर. हाऊटनबाईंनीं तुला क्षमा केली आहे. यापुढें लक्षांत ठेव. त्या कांहींहि म्हणाल्या, तरी उलट उत्तर करायचं नाहीं. राहील लक्षांत ? "

रात्रीं बिछान्यावर झोंपण्याच्या वेळीं तिच्या मैत्रीण माय-डिन हलकेंच कुजबुजली, " काय ग, बाईंनीं तुला कशासाठीं शिक्षा केली होती ? "

गालांतल्या गालांत हंसून सिआओ-शेन उत्तरली, " प्रार्थनेच्या वेळीं मी डोळे मिटून घेतले नव्हते म्हणून – "

" अस्सं होय ? " माय-डिन शांत होऊन म्हणाली, " आम्हांला वाटलं कीं शुंग-कुआंग सारखं तूंहि एकाद्या मुलाला पत्र वगैरे धाडलंस कीं काय ? आम्हांला कळलं तेव्हांपासून आम्ही कुणी तिच्याशीं बोलत नाहीं."

सिआओ-शेन म्हणाली, " त्याची चिंता नको. माझ्या आजोबांनीं मला चांगलं वळण लावलंय् ! "

● ●

महिन्याचा अखेरचा शनिवार म्हणजे आनंदाची पर्वणी. कारण त्या दिवशीं त्यांना घरीं जाण्याची परवानगी मिळत असे. आदल्या दिवशीं रात्रौ सिआओ-शेनचा डोळ्याला डोळा लागला नव्हता. जेवण झाल्यावर घरीं जाण्यासाठीं मुली आपआपलीं बोचकीं बांधूं लागल्या. सिआओ-शेननें आपले मळके कपडे एका तांबडया फडक्यांत गुंडाळून घेतले आणि व्हरांडयांत जाऊन ती वाट पाहत उभी राहिली.

नेहमींप्रमाणें शांग-मानें प्रथम प्रवेश मिळवला. धांवतच ती आंत आली आणि म्हणाली, " माझा सोन्याचा तुकडा तो ! चल ! फाटकाजवळ आपली खुर्ची वाट पाहात उभी आहे."

वर्षाच्या प्रथमदिनीं एखादें मूल जसें आनंदानें बचैन होतें, तशी वाँग-कुंगची अवस्था आज झाली होती. जेवण झाल्यावर पाईप तोंडांत धरून ते दिवाणखान्यांत जाऊन बसले. आणि त्यांनीं दार अर्धवट उघडून ठेवलें. हेतू हा कीं नात आल्याबरोबर लगेच दृष्टीस पडावी. फाटक उघडण्याचा आवाज कानीं पडतांच त्यांचें भान हरपलें. आपण कोण आहोंत याची त्यांना विस्मृति पडली. ते धांवतच घराबाहेर गेले. नोकर लोकांनीं त्यांना पाहतांच तेथून पोबारा केला.

" पाहूं, पाहूं ! माझ्या छकुल्या ! " ते म्हणूं लागले, " किती वाळलीस ग ! भरपूर जेवायला दिलं नाहीं त्यांनीं तुला ? द्यायला पाहिजे. टोपली

भरून पैसे मोजले आहेत मी तुझ्यासाठीं."

तिनें सोप्याजवळ एक स्टूल आणलें. आणि त्यावर चढून आजोबांचा पाईप पेटवून दिला.

"बोल ! काय, काय झालं या महिन्यांत ?" त्यांनीं म्हटलें.

"किती किती मी वाट पहात होतें, तुम्हांला सांगण्यासाठीं, आजोबा !"

सगळें ऐकून झाल्यावर त्यांनीं घसा खाकरून म्हटलें, "लक्षांत ठेव, पोरी, तूं चिनी आहेस. अन् त्यांतल्या त्यांत वाँग घराण्यांतली आहेस. परकियांपासून चांगलं तेवढं शिकून घे. बाकीचं विसरून जा. अन् लक्षांत ठेव, आपली संस्कृति त्यांच्या संस्कृतीपेक्षां फार, फार जुनी आहे. आणि त्यांना आपल्यापासून घेतां येण्याजोगं खूपच आहे."

– उन्हाळ्याचे दिवस होते. संध्याकाळीं उष्मा फार होत होता. म्हणून स्वयंपाक्यानें चौकाच्या मध्यभागीं जेवणाचें टेबल ठेवलें.

व्हिजिट्स् उरकून वाँग कुंग परत आले आणि कपडे बदलण्यासाठीं तडक आपल्या खोलीकडे गेले. पांढरा रेशमी पट्टा असलेली एक लिननची पातळ विजार ठेवून बाकीचे सर्व कपडे त्यांनीं काढून टाकले. थकलेले पाय रेशमी सपातांत अडकवून, एक ताडाचा पंखा त्यांनीं उचलून घेतला, आणि ते बाहेर आले. आणि त्यांनीं आपला उघडा देह वेताच्या खुर्चींत लोटून दिला.

सिआओ-शेन त्यांच्या शेजारीं येऊन उभी राहिली. नात दृष्टीस पडतांच त्यांचे सारे श्रम निमाले. प्रेमानें आणि अभिमानानें तिच्याकडे पाहून त्यांनीं स्मित केले. एकाएकीं त्यांना दिसून आलें कीं गेल्या आठ वर्षांच्या अवधींत आपली नात पार बदलून गेली आहे. शाळेंत जाण्यापूर्वीचें तिचें बाळसें आतां झडून गेलें होतें. आतां ती एक सुंदर तरुणी दिसूं लागली होती.

आजोबांना वारा घालीत तीहि पण त्यांच्याकडे गौरवाच्या दृष्टीनें पहात होती. गेल्या वर्षांपासून त्यांनीं दाढी ठेवली होती. करडा रंग होता तिचा. पण ती दाढी तिला अजून नवखी नवखी वाटत होती. साठी उलटली तरी वाँग–कुंग ताठ होते. उंचपुरे आणि रुबाबदार !

त्यांच्या खुर्चीच्या हातावर ती टेकली. तिचा हात आपल्या हातांत धरून

ते म्हणाले, " बरं ! आतां शाळा संपली. पुढें काय करायचें ठरविलं आहेस तूं ? मास्तरीण होण्याचा बेत आहे कां ? "

ती हंसून उत्तरली, " मास्तरीण ? डॉक्टर व्हावंसं वाटतं मला – "

वांग कुंगचे डोळे विस्फारित झाले. ते ओरडले, " काय ? डॉक्टर ? वेडी आहेस झालं. बायका डॉक्टर झाल्याचं कधीं कुणी ऐकलंय तरी कां ? "

" पण आजोबा, होतात बायका डॉक्टर! 'हिशिमेहो' मेडिकल कॉलेजांत बायकां सुद्धां शिकताहेत. मला माहीत आहे."

" म्हणजे परक्यांचें इस्पितळ ! परकी लोकांची वैद्यकीय विद्या शिकायची असं तुझं म्हणणं आहे ? तुझ्या अशा करण्यानें माझे व्यवसाय बन्धु हंसतील मला – "

त्याच्या कपाळावरील शिरा ताठ झालेल्या पाहून ती घाबरली आणि त्यांना शांत करण्यासाठीं म्हणाली, " जाऊं दे मेलं. आत्तांच त्याचं एवढं वादंग पाहिजे कशाला ? "

जेवण संपेपर्यंत चकार शब्द कुणी काढला नाहीं.

दुसऱ्या दिवशीं शांग–माला विश्वासांत घेऊन ती म्हणाली, " नाय्, नाय्, मला किनई डॉक्टर व्हायचंय् ! लोकांना बरं करायचंय्–पण आजोबा म्हणतात 'नाहीं.' परवानगीच देत नाहींत."

शांग-मा म्हणाली, " बाईसाहेब, मला वाटतं, तुम्ही खूप शिकलांत. झालं तेवढं पुरं झालं. माझं ऐकणार असाल तर आतां घरचं पाहा जरा. स्वयंपाक-पाणी, शिवणं-टिपणं. बायकांच्या जातीला नवरा, मुलंबाळं, घरदार या शिवाय आणखी काय पाहिजे हो ? यांत सगळं आलं बरं – "

आपले आजोबा आणि नाय्–नाय् दोघांच्याहि जुन्या बुरसटलेल्या कल्पना ऐकून सिआओ–शेनला फारच वाईट वाटलें. शांग–आनची तिला आठवण झाली.

आजोबा कामांत गुंतलेले पाहून एके दिवशीं सकाळीं तिनं शांग-आनला खुणेनें दिवाणखान्यांत बोलाविलें आणि त्याला म्हटलें, " आपल्या घरांत नवीन आणि उदारमताचे असे तुम्हीच काय ते आहांत म्हणून माझें मनोगत तुम्हांलाच बरोबर समजेल. "

आनंदानें फुलून तो म्हणाला, " आभारी आहें, मी तुमचा. बाईसाहेब, तुमची सेवा चाकरी करून तुम्हांला संतुष्ट ठेवण्यासाठींच आम्ही नोकर माणसं आहोंत. "

तिनें आर्जवी सुरांत म्हटलें, " मला डॉक्टर व्हायची हौस आहे. अन् आजोबांजवळ माझ्यासाठीं तूं शब्द टाकला पाहिजेस."

दोन वेळां त्यानें आवंढा गिळला. त्याचे डोळे ताठरल्यासारखे झाले. शून्य दृष्टीनें तो समोर पाहूं लागला. होय ! आपल्यापरीनें आपल्या पुरोगामी तत्त्वांचा त्याला अभिमान होता. खरंय् ! पण ही कल्पना ! छेः ! अगदींच क्रांतिकारक ! नाक मुरडून त्यानें बळेंच हंसल्यासारखें केलें आणि म्हटलें, " छोट्या बाईसाहेब, तुमचा हा भयंकर विचार मीं मालकांच्या कानांवर घालावा असं तुम्हांला खरंच वाटतं कां ? तुम्हांला त्या परकीयांच्या इस्पितळांत धाडावँ असें म्हणालो, त्याचवेळीं या घरांतून धक्के खाऊन रस्त्यावर जाण्याची पाळी माझ्यावर येऊन बेतली होती. त्यावेळीं तुमच्या जीवन मरणाचा प्रश्न होता म्हणून त्याला मीं डरलों नाहीं. मालकांना मी चांगला ओळखतो. मीं विचारण्यापूर्वीच त्यांचें ' नाहीं ' हें उत्तर ठरलेलें ! त्यांचा तापट स्वभाव तुम्हांलाहि माहीत आहे. बाईसाहेब, हा विचार कृपा करून सोडून द्या. मला सुखानें चार घांस गिळूं द्या. "

त्यानें तिच्याकडे तिरक्या नजरेनें पाहिलें. तिच्या गुलाबी गालांवरून ओघळणारा एक मोठा अश्रु त्याला दिसला. तत्क्षणीं तो विरघळला आणि म्हणाला, " बाईसाहेब, तुम्हांला माहीतच आहे. आम्ही नवरा-बायको तुमच्यासाठीं काय वाटेल तें दिव्य करूं- "

त्या दिवसानंतर मालकाशीं याबाबतींत बोलणें काढण्यासाठीं तो अनुकूल वेळेची वाट पाहूं लागला.

● ◎

छोट्या बाईसाहेबांनीं अंगावर टाकलेल्या कामगिरीचें गांभीर्य जाणून शांग-आन कष्टी झाला. बेचैन झाला. त्यानें खूप विचार करून पाहिला. पण काय करावें तें त्याला समजेना. विषय काढायला योग्य अशी संधीहि येईना. पण एके दिवशीं तशी वेळ आली. डॉक्टरसाहेब पेअर फळाचे

सरबत बनवीत होते. सरबत ते स्वतः तयार करीत. हे दिवस हंगामाचे होते. या दिवसांत तें करून ठेवलें म्हणजे थंडीच्या दिवसांत पोरांच्या किरकोळ खोकल्यावर देण्यासाठीं त्याचा चांगला उपयोग होई. शांग-आन खोलींत शिरला त्यावेळीं स्वतःशींच गुणगुणत फळांच्या साली काढणें, लगदा वाटणें, पिळून रस काढणें असें त्यांचें काम चालूं होतें.

"धनी–" शांग–आननें मस्तक नम्र करून म्हटलें. घसा साफ केला. पण पुढें बोलायला जीभ रेटेना.

"काय ? बोल ना." उल्हसित मुद्रेनें ते म्हणाले.

"नाहीं. म्हटलं, आपल्या छोट्या बाईसाहेब फार हुशार आहेत. आपल्या ध्यानांत आलें असेलच म्हणा– नुसत्या चलाख नाहींत त्या, तर त्यांच्या मनाची उडीहि फार उंच आहे. त्यांना – म्हणजे – त्यांना डॉक्टर व्हावंसं वाटत आहे !"

घाईनें इतके बोलून तुफान वादळाची तो वाट पहात उभा राहिला. मनांतल्या मनांत तो म्हणाला, "बाईसाहेब, माझी ही अगतिक अवस्था जर तुम्हांला समजली तर तुम्ही माझी कींवच कराल. तुमच्याकरितां म्हणून बरें. नाहींतर तुमच्या आजोबांचा राग तुफान वादळालाहि लाजवणारा आहे."

पण वादळ झालेंच नाहीं. वाँग कुंग शांतपणानें म्हणाले, "होय. ती डॉक्टर होईलहि कदाचित्. तिला आवरून धरणें मला जमणार नाहीं. डॉक्टर होण्यासाठींच ती जन्माला आली असली पाहिजे, अशी माझी खात्री झाली आहे. देवाच्याच मनांत असेल तर मनुष्यानें आडवें जाण्यांत अर्थ नाहीं."

शांग-आनचा स्वतःच्या कानांवर विश्वासच बसेना. तो पुतळ्यासारखा स्तब्ध उभा राहिला. त्याची ती अवघड स्थिति पाहून वाँग-कुंगनीं आश्चर्यानें त्याच्याकडे पाहिलें. त्याच्या त्या उघड्या तोंडाकडे आणि विस्फारलेल्या डोळ्यांकडे पाहून ते हंसले आणि म्हणाले, "कायरे ऐकूं नाहीं कां आलें ? जा आणि ऐकलंस तें तुझ्या बाईसाहेबांना जाऊन सांग."

"हो हो, सांगतो धनी–" शांग-आन आनंदानें ओरडून म्हणाला आणि आपले दोंद सांभाळीत अंगणांतून धांवत निघाला.

सिआओ-शेन आणि शांग-मा यांनीं त्याची हांक ऐकली, तशी त्या दोघीजणीं दारापाशीं आल्या. पण त्याच्या तोंडून शब्द फुटेना. नुसता मान चोळीत तो त्यांच्यापुढें उभा राहिला. त्याचा फिकट चेहरा घामानें तुकतुकत होता.

" काय म्हणाले ? " अधीर होऊन सिआओ-शेन म्हणाली.

" तुम्ही डॉक्टर होणार असं ते म्हणाले. "

• • •

भाग दुसरा

हिशिअे–हो मेडिकल कॉलेज पीकिंग शहराच्या अगदीं मध्यभागीं होतें. त्या कॉलेजच्या भोंवतालचा भाग पाहिला तर एखाद्या छोट्याशा अमेरिकन शहरासारखाच दिसला असता. वसतिगृहाचा भाग सोडला तर कॉलेजच्या वाकीच्या इमारती एका चौकोनी मैदानावर बांधलेल्या होत्या. त्या आवारा-भोंवतीं गार वेलींनीं आच्छादलेली विटांची भिंत होती. आवाराचें फाटक लोखंडाचें भव्य नक्षीदार होतें.

रजिस्ट्रारच्या ऑफिसांत नांव घालायला जाण्यासाठीं पहिल्या संगमरवरी पायरीवर पाय ठेवतांना सिआओ-शेनची छाती धडधडत होती. त्या प्रशस्त खोलींत गेल्यावर एक पोक्त अमेरिकन बाई तिला समोर दिसली. त्या बाईनें प्रश्न केला, "नांव काय तुझं ?"

सिआओ-शेननें नांव सांगितल्यावर त्या बाईनें तिचें कार्ड बारकाईनें न्याहाळून पाहिलें. नंतर तिनें वर मान करून पाहिलें आणि म्हटलें, "म्हणजे तूं आपल्या गांवांतल्या नामांकित डॉक्टरांची नात म्हणायचीस एकूण ! होय, नं ?"

सिआओ-शेननें स्मितपूर्वक मान डोलावली. पाश्चात्यांच्या मेडिकल कॉलेजमधले लोक देखील आपल्या आजोबांना ओळखतात हें पाहून तिला अभिमान वाटला.

पहिल्या दिवशीं तिनें लवकर उठून निळ्या रंगाचा आंखुड सुती झगा परिधान केला. मग त्यावर एक पांढरा कोट अंगांत घातला आणि आरशांत पाहिलें. आपल्या प्रतिबिंबाला उद्देशून ती म्हणाली, "हं पांढऱ्या पोषाखांत मला तूं आवडतेस –"

मोलकरणीनें अंडीं आणि ऊनऊन पाव आणून ठेवला. पण खाण्याची तिला

वासनाच राहिली नव्हती. नवाच्या ठोक्याबरोबर ती चौकाच्या उत्तरेकडील मुख्यवर्गांत शिरली. ती जाग्यावर जाऊन बसली नाहीं तोंच एकदम दार उघडलें गेलें आणि त्यांतून एक स्थूल अमेरिकन प्रोफेसर आले. प्रसन्न मुद्रेनें एकवार स्मित करून त्यांनीं वर्गाला उद्देशून म्हटलें, "मुलांनो आणि मुलींनो, मी तुमचें अभिनंदन करतों. या वर्गांत दोन मुलीहि आलेल्या दिसत आहेत."

विद्यार्थ्यांच्या हास्याची खसखस अंमळ शांत झाल्यावर ते पुढें म्हणाले, "या पवित्र व्यवसायाचें शिक्षण घेण्यासाठीं निवडलीं गेलेलीं तुम्ही मुलं, मुली चीन देशांतली अगदीं निवडक मंडळी आहांत. या देशांतल्या उच्चतम अशा समाजांतली प्रातिनिधिक तरूण मंडळी आहांत. हा पेशा अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण मानवी जीव वांचविण्याचें श्रेष्ठ कार्य करण्याची संधि या ठिकाणीं मिळते."

सिआओ-शेन या पहिल्या व्याख्यानानें भारली गेली. आदल्या रात्रीं आजोबांनीं केलेल्या उपदेशाची तिला आठवण झाली. ते म्हणाले होते, "डॉक्टरांचें चारित्र्य शुद्ध, ज्ञान बहुविध आणि अंत:करण विशाल पाहिजे."

सुरवातीचें व्याख्यान झाल्यावर, तिसऱ्या मजल्यावरील शवछेदन गृहाकडे (Anatomy Class) जाण्याची विद्यार्थ्यांना सूचना देण्यांत आली. पांढऱ्या रंगाच्या त्या मोठ्या वर्गांत पंधरा टेबलें मांडलेलीं होतीं. प्रत्येक टेबलावर मेणकापडानें आच्छादलेलें एक शव पसरून ठेवलें होतें. ग्लिसरीन आणि फेनॉलचा दर्प खोलींत दाटला होता. प्राध्यापकांनीं विद्यार्थ्यांना बोलावून कोणी कोणत्या टेबलाजवळ काम करावयाचें तें सांगितलें. सिआओ-शेनला लांबच्या कोपऱ्यांतलें एक टेबल मिळालें. मार्क या नांवाचा विद्यार्थी तिच्या बरोबरीनें काम करील असें प्राध्यापकांनीं म्हटलेलें तिच्या कानांवर आलें. एक तरुण तिच्याजवळ आला आणि सभ्यपणानें मान लववून तो तिला म्हणाला, "तुम्ही आणि मी दोघांनीं याच टेबलावर काम करायचं असं दिसतंय –" आणि असें म्हणतां म्हणतां त्यानें हलकेंच मेणकापड बाजूला सारलें.

तिच्यासाठीं त्यानें एक स्टूल जाऊन आणलें. शवाच्या डाव्या अंगाला ती

बसली आणि उजव्या अंगाला तो बसला. पांढरे कोट परिधान केलेल्या द्वय्यम शिक्षकांनीं त्यांना छापील सूचनांचे कागद आणून दिले. सिआओ-शेननें पहिलें पान उलटून पाहिलें. मांडीचा छेद घेऊन तिच्या पुढल्या भागांतल्या रक्तवाहिन्या वगैरे उघड्या करून दाखविण्याची सूचना त्या पानावर छापली होती. वाचून तिच्या हाताचीं बोटें थरथरूं लागलीं.

मार्कनें आपलीं छेदनाचीं हत्यारें बाहेर काढलीं आणि सराईताप्रमाणें तो प्रेत फाडूं लागला. आपलीं हत्यारें कातडयाच्या पिशवींतून काढण्यासाठीं सिआओ-शेन धडपडूं लागली. वर मान करून त्यानें तिच्याकडे पाहिलें आणि खटचाळपणानें हंसून तो म्हणाला, "काय झालें ? भ्यालांत कीं काय ? "

या त्याच्या शब्दानें ती ताबडतोब भानावर आली. छापील सूचना पुढें ठेवून तदनुसार तिनें प्रथम थोडीशी कातडी काढली. नंतर मांस आणि शेवटीं मांडींतली रोहिणी, नर्व्ह आणि नीला उघड्या केल्या.

दिवसभर काम करून ती अगदीं कंटाळून गेली. खोलींत प्रवेश केल्याबरोबर अनॅटमीचें पुस्तक तिनें खुर्चीवर भिरकावलें, अंगांतला शुभ्र कोट काढला आणि ती हात धुवायला नहाणी घरांत धांवतच गेली. हाताचीं बोटें, त्यावरील नखें, तिनें पुनः पुन्हां घासून धुतली. परंतु प्रेताचा वास कांहीं जाईना. त्यानंतर जेवण म्हणजे संकटच. तोंडांत घांस घालायला हात तोंडाजवळ नेला कीं घपकन् ती प्रेताची घाण येई. तिची भूक मेलीच होती. जेवायचें तसेंच टाकून ती उठली.

● ●

रात्रीं अंथरूणावर पडल्यावर अंधारांत तिला त्या प्रेताशिवाय दुसरें कांहीं दिसेचना. तो देह दिसायला किती ओंगळ दिसत होता. आणि भरीला भर म्हणून त्याच्या गळ्याजवळ एक मोठी चीर पडली होती.

माणसांची माहिती करून घेण्याची तिला नेहमींच उत्सुकता लागून राहिलेली असे. त्याच उत्सुकतेनें आज परत येण्याच्या वेळीं वाटेंत ती पहारेकऱ्याला भेटली होती. त्या प्रेताचा मागचा इतिहास तिला जाणण्याची आतुरता लागली होती.

पहारेकऱ्यानें तिला सांगितलें कीं तो एक न्हावी होता. जुगारांत पैसे

गमावून बसल्यामुळें त्यानें आत्महत्येचा मार्ग पत्करला होता. आतां अनॅटमीचा पाठ करण्याचें सोडून ती त्या न्हाव्याच्या दुर्दैवाचाच सहानुभूतीनें विचार करीत बिछान्यावर पडून राहिली.

अनॅटमीचे पहिले सहा आठवडे म्हणजे भयंकर दिव्य वाटलें तिला. छेदन-वर्गांत शिरतांना तिला जें भय वाटायचें तें ती दूर करूं शकली नव्हती. रोज संध्याकाळीं वर्ग संपल्यावर ती स्वतःशींच विचार करी. "छेः किती निर्दय काम हें ! पाश्चात्यांचें वैद्यकीयशास्त्र मला पेलेल कां ? "

पण तिची ही साशंकवृत्ति एके दिवशीं एकाएकीं नाहींशी झाली. त्या दिवशीं अनॅटमीच्या प्राध्यापकांनीं जाहीर केलें कीं, "पुढच्या सोमवारीं अनॅटमीची पहिली चांचणी होईल आणि ती तोंडी, लेखी आणि प्रयोगात्मक अशी तीन भागांत घेतली जाईल."

रोज रात्रीं मानेवर खडा ठेवून तिनें अभ्यास केला होता म्हणून लेखी आणि तोंडी परीक्षेची तिला खात्री वाटत होती. पण प्रयोगाच्या परीक्षेच्या बाबतींत मात्र तिच्या मनांत गडद अंधार पसरला होता. दुपारच्या छेदनाच्या वेळीं तिनें मार्कला म्हटलें, "तुम्ही आज रात्रीं याल कां ? तुमच्या देखरेखी-खालीं मी छेदनाचा सराव करीन म्हणतें ! "

मार्क हा शांघायहून आलेला एक अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होता. उंचा-पुरा, चांगला पिळदार शरीराचा, असेल सुमारें बावीस वर्षांचा. रेशमासारखे मऊ असलेले काळेभोर केस उलटे विंचरण्याची त्याची पद्धत होती. त्यामुळें त्याचें कपाळ भव्य दिसत असे. काळ्या डोळ्यांनीं त्याच्या देखणेपणांत भरच टाकली होती. पहिल्या भेटींतच सिआओ-शेन त्याला आवडली होती. पण तिचा शांत आणि बुजरा स्वभाव पाहून तो तिच्या वाटेस गेला नव्हता. तीच मुलगी आतां मदतीसाठीं विनंति करीत होती !

● ●

रात्रीं तें शवच्छेदनगृह एखाद्या थडग्यासारखें त्यांना भासलें. टेबलांमागून टेबलें ओलांडून कोपऱ्यांतल्या आपल्या टेबलाजवळ तीं दोघें येऊन पोहोंचलीं. मार्कनें बॅटरीच्या मदतीनें प्रेतावर प्रकाश टाकला. गेल्या सहा आठवड्यांत आज पहिल्यांदा तिनें मनाचा निर्धार केला, कीं कांहींहि होवो शवाचा

अभ्यास लक्ष लावून करायचा. तो पूर्वी न्हावी होता हें ती विसरली आणि मोठ्या तत्परतेनें तिनें प्रेत फाडून पहायला आरंभ केला. कौशल्यानें आणि आवेशानें ती आपलें काम करण्यांत गढून गेली. शेवटीं मार्कनें तिला हलकेंच खोलीकडे परत जाण्याची वेळ झाल्याची आठवण करून दिली.

वाटेनें जातांना तिच्या मनांत आलें कीं म्हाताऱ्या बायकांच्या भुता-खेतांच्या गोष्टी म्हणजे मनाचे खेळ आहेत झाले ! मार्कबद्दल तिला दुहेरी कृतज्ञता वाटूं लागली. त्यानें तिचा निरोप घेतला त्यावेळीं तिनें इतक्या दिवसांत पहिल्यांदाच त्याच्याकडे बारकाईनें न्याहाळून पाहिलें आणि तो खूपच देखणा असल्याची तिला अकस्मात जाणीव झाली.

दुसऱ्या दिवशींची अनॅटमीची परीक्षा एकंदरींत कठीण होती. जवळ जवळ एक तृतियांश विद्यार्थी तींत अयशस्वी झाले. पण मार्क आणि सिआओ-शेंन यांना सर्वांत जास्त गुण मिळाले. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या तयारीमुळें तिच्या मनांतील भावनांचा गोंधळ पूर्णपणें नाहींसा झाला. तिच्या अनेक शंका वितळल्या.

● ●

लवकरच वाँग कुंगचा सत्तरावा वाढदिवस येऊन ठेपला. अर्थात् त्या निमित्त मोठा समारंभ होणार हें ठरल्यासारखेंच होतें.

दुर्दैवानें ज्या दिवशीं वाढदिवस येत होता त्याच्या दुसऱ्याच दिवशीं सिआओ-शेनची सर्वांत महत्त्वाची परीक्षा होती. आजोबांच्या वाढदिवसाच्या समारंभाला आपल्याला घरीं गेलें पाहिजे हें तिलाहि समजत होतें. पण तिचा अभ्यास अजून संपला नव्हता. नंतर तिला दिसून आलें कीं जमेल. सांगाड्याची रचना हा परीक्षेचा विषय होता. हाडांचें गाठोडें बांधून घरीं नेतां आलें असतें आणि रात्रीं त्याचा अभ्यास करतां आला असता ! सकाळीं लवकरच उठून तिनें दोनशें सोळा हाडें आपल्या सुटकेसमध्यें बांधून घेतलीं. अनॅटमीची टिपणवही बरोबर घेतली आणि रिक्षा करून ती घरीं येऊन दाखल झाली.

घरांत उत्सवाचें उत्साहपूर्ण वातावरण पसरलेलें तिला आढळून आलें. आत्या, काका, मामा झाडून सगळी आप्त मंडळी उत्तमोत्तम कपडे घालून

गोळा झाली होती. तिनें सभ्यपणानें त्यांना अभिवादन केलें आणि आजोबांच्याकडे झेप घेतली.

तिला पाहतां क्षणींच त्यांची मुद्रा अत्यानंदानें उजळून निघाली. " चिरायू व्हा, आजोबा ! आणखी खूप खूप वर्षें तुम्हांला आमच्यांत राहिलें पाहिजे. " भक्तिभावानें आणि विनम्रपणानें हात जोडून ती म्हणाली.

त्यांनीं तिला हाताला धरून उठवलें आणि म्हटलें, " बाळे, इथें माझ्या-जवळ बैस पाहूं – "

शांग–मा दारांत उभी राहून तिच्याकडे पहात होती. छोट्याबाई-साहेबांचें ते साधेसुधे कपडे पाहून ती मनांत अगदींच खजील झाली. सिआओ–शेनचें आपल्याकडे लक्ष जावें म्हणून ती सारखी खुणवीत होती. शेवटीं तिनें नुकताच केलेल्या चहाचा कप भरून आणला आणि तो वांग–कुंगच्या हातांत देत हलकेंच तिनें तिच्या कानांत सांगितलें, " बाईसाहेब माझ्याबरोबर येऊन आधीं कपडे बदला. वडिलधाऱ्या माणसांना नमस्कार करण्याची वेळ झाली आहे –"

सिआओ–शेन लगेच आपल्या खोलीकडे निघाली. तिच्या पाठोपाठ शांग–माहि निघाली. साऱ्या वाटेनें ती रागानें बोलत होती, " कित्ती, कित्ती तुम्हीं मला खालीं पहायला लावलेंत ! एवढ्याशा होतां, तेव्हांपासून मी तुम्हांला लहानाचं मोठं केलं. कित्ती चांगलं वळण लावलं तुम्हांला ! आणि त्याचं असं चीज करतां ? एकदां नजर तरी टाकून पाहा आपल्या अंगावरच्या कपड्यांकडे ? कसा सोन्यासारखा दिवस आणि त्या दिवशीं हे घाणेरडे सुती कपडे घालून येतां ? कसं तुम्हांला समजत नाहीं ? सगळे लोक मला काय म्हणतील ? म्हणतील कीं, या थेरडीनं मुलीला चांगलं वळण लावलं नाहीं. "

सिआओ–शेनला तिचा बिलकूल राग आला नाहीं. उपदेशाचा मारा संपल्यावर ती हंसून म्हणाली, जाऊं दे ग, नाय ! " इतकं कांहीं मनाला लावून घेऊं नकोस. माझे बहुतेक सगळे रेशमी कपडे घरींच ठेवून गेलें होतें मीं. अन् कॉलेजांतून येतांना बदलून येईन म्हटलं तर वेळच मिळाला नाहीं ग ! बरं आतां मला हवी तशी सजव ! तुला पसंत पडेल तो पोषाख घालीन मी. मग तर झालं ?"

केस विंचरून झाल्यावर आणि तोंडाला पावडर लावल्यावर शांग-मानें पसंत केलेला रेशमी पोषाख तिनं चढविला, तेव्हां खरोखरीच ती अतिशय सुंदर दिसूं लागली.

नंतर वृद्धांना वंदन करण्याची वेळ आली. मुली, जांवई क्रमाक्रमानें, जोडीजोडीनें येऊन वाँग कुंगना नमस्कार करून बाजूला झाले. नंतर वयाप्रमाणें इतर नाती आणि सिआओ-शेन यांची पाळी आली. कुटुंबांतील निरनिराळीं माणसें नमस्कार करून पुढें जात असतांना डॉक्टरांचे डोळे अश्रूंनीं पाणावले. त्यांचें हृदय जड झालें. मृत पत्नीची आणि मुलाची त्यांना तीव्रतेनें आठवण झाली.

पाहुणे मंडळी बोलत बोलत चहापान करीत होती. कलिंगडाच्या बिया सोलून खात होती. तेवढ्यांत एकदम मोठमोठ्या किंकाळ्या फोडीत शांग-मा धांवत तिथें आली. ती काय म्हणत होती हें कुणालाच कळेना. सिआओ-शेन लांब उभी राहून कुणाशीं तरी बोलत होती. त्यामुळें हा गोंधळ तिच्या कानांपर्यंत गेला नाहीं. तिच्या एका आत्यानें जाऊन तिला म्हटलें, "चल लवकर शांग-माला कांहीं तरी होतंय्!"

सिआओ-शेन लगबगीनें पुढें झाली आणि शांग-माचा हात धरून तिला दिवाणखान्यांतून बाहेर घेऊन गेली.

शब्द बाहेर पडण्याइतपत शांत झाल्यावर शांग-मा मोठ्यानें ओरडली "खून! खून! त्या परक्यांच्या शाळेंत जाऊन हें शिकलांत तुम्ही? कुणाला तरी मारून त्याचीं हाडं घेऊन आलां आहांत. हाय रे दैवा!"

सिआओ-शेन म्हणाली, "नाय, नाय, शांत हो. माझं ऐकून घे. तीं हाडं मी कॉलेजांतून आणलीं आहेत. उद्यां माझी परीक्षा आहे. त्यासाठीं मला त्यांचा अभ्यास करायचा आहे."

अखेरीस म्हातारी एकदांची शांत झाली. तरी पण स्फुंदत स्फुंदत ती म्हणाली, "माझ्या म्हाताऱ्याला सगळं, सगळं मी सांगणार आहे. तुम्हांला कॉलेजांत धाडण्यांत मुळांत त्यांचाच हात होता."

समारंभ आटोपण्याच्या सुमाराला सिआओ-शेन अस्वस्थ झाली. आपल्या खोलींत परत जाऊन सांगाड्याचा अभ्यास करण्याकडे तिचें सारें लक्ष लागलें

होते. सबंध दिवस तिच्या मनांत परीक्षेचा विषय ठाण देऊन राहिला होता. पण मेजवानी कांहीं संपेना. पाहुणे फिरून फिरून ग्लास भरीत होते–पीत होते–आणि कांहीं जणांना तर चांगलीच चढली होती.

अखेरीस एकदांची संपली मेजवानी. शेवटचा पाहुणा घराबाहेर पडतांना पाहून तिनें सुटकेचा श्वास सोडला. आजोबांचा निरोप घेण्यासाठीं ती त्यांच्याजवळ गेली.

पण ते म्हणाले, "थांब जरा. सबंध दिवसांत मी तुला डोळे भरून पाहिलं देखील नाहीं."

ती म्हणाली, "आजोबा, उशीर झालाय्. आतां झोंपा नं तुम्ही !"

कष्टी मुद्रा करून ते म्हणाले, "पोरी, दोन महिन्यांनीं तुला आज पाहतों आहें मी, विसरलीस ? मी सुद्धां खूप अभ्यास केला होता. चांगलं आठवतंय मला बरं कां ! पण थोडा वेळ थांब. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचंय्."

यावर ती तिथेंच थांबली. दोघंहि एका लहानशा टेबलाजवळ जाऊन बसलीं. शांग-माचें आपल्या मालकिणीच्या प्रत्येक हालचालीकडे बारीक लक्ष होतें. तिनें दोन बिन कानाचे कप आणि चहाची किटली ट्रेवरून आंत आणली आणि टेबलावर ठेवली. वाँग-कुंगनीं आपल्या निळ्या रेशमी झग्याच्या बाह्या मागें सारून चहा कपांत ओतून घेतला.

"बोल, आतां !" ते म्हणाले, "सध्यां कसला अभ्यास चाललाय ?"

"आजोबा," ती सांगूं लागली, "अभ्यास करण्यांत मला किती मजा वाटते म्हणून सांगूं ! हल्लीं शरीररचना शास्त्र, शरीरक्रिया शास्त्र अन् जीवरसायन शास्त्र, अँनॉटमी, फिजिऑलजी अन् बायोकेमिस्ट्रि चालूं आहे. स्नायूंचें आकुंचन, हृदयक्रिया, शिरांचं स्फंदन वगैरे मागेंच संपलंय."

"पोरी" तिचे आजोबा म्हणाले, "माझ्या ऑफिसांत वैद्यकशास्त्रांवरचे अनेक प्रमाणभूत ग्रंथ आहेत. तूं चीन देशाची कन्या आहेस हें विसरूं नकोस. आपल्या देशांतील वैद्यकीय वाङ्मयाची तुला खडान् खडा माहिती करून घेतली पाहिजे."

"हो" तिनें मान डोलावून म्हटलें.

तिच्या मनाला पटलें कीं, पुढें केव्हांतरी आजोबांनीं जमविलेलीं पुस्तकें तिला वाचून काढायलाच हवींत. नवीन संशोधनाच्या प्रकाशांत पारखून घ्यायला हवीत, अशी पुष्कळच माहिती त्या ग्रंथांत असली पाहिजे.

खोलींत गेल्यावर आपली सुटकेस उघडून आंतील दोनशें सोळा हाडें तिनें बाहेर काढलीं. बिछान्यावर त्यांचा ढीग करून त्यांचें ती निरीक्षण करूं लागली. कंदिलाच्या अंधुक प्रकाशांत डोक्याची कवटी हातांत धरून तिच्यांतलीं निरनिराळीं छिद्रें पाहण्यांत ती गर्क झाली आणि तोंडानें घोकूं लागली. " पृष्ठरज्जु.... "

दुसऱ्या दिवशीं कॉलेजांत गेली तेव्हां ती अगदीं गळून गेली होती. थोडेसें कांहीं खाण्याचा तिनें प्रयत्न केला पण चहाच्या घोटाशिवाय दुसरें कांहींच घशाखालीं उतरेना. ती तशीच उठली आणि थोड्याच वेळानें वर्गांत येऊन दाखल झाली.

" अनॅटमीची लेखी आणि तोंडी परीक्षा तिनें हंसत खेळत दिली. पण प्रश्न होता प्रयोगाचा.. त्यालाच ती डरत होती. परीक्षकांच्या निरनिराळ्या खोल्यांत जाण्यासाठीं सर्व विद्यार्थ्यांना व्हरांड्यांत ओळीनें उभें करण्यांत आलें. धडधडणाऱ्या हृदयानें तिनें डॉ. पॅन यांच्या खोलींत प्रवेश केला. कांहीं हाडें आंत असलेली एक पेटी त्यांनीं तिच्या हातांत ठेवली आणि सांगितलें, " मिस वाँग या हाडांचीं नांवें सांगून तीं बरोबर मांडून दाखवा– "

क्षणभर तिनें त्यांच्यावरून दृष्टि फिरवली. तिच्या तात्काळ ध्यानांत आलें कीं घोटयाचीं हाडें आहेत हीं. तिनें भराभरा नांवें सांगायला प्रारंभ केला.

परंतु तिला नक्की स्मरत होतें कीं घोटयाचीं हाडें फक्त सातच असतात. आणि त्या पेटींत तर आणखी एक आठवा तुकडा दिसत होता. तो कुठून आला ? दिसायला अगदीं चमत्कारिक होता. आणि छेः ! कांहीं केल्या तो तिला ओळखतां येईना ! ती घाबरली. तिच्या कपाळावर घर्मबिंदु चमकूं लागले. आणि तिचे हात थरथर कापूं लागलें. तिच्या मनाचा गोंधळ उडाला. तिच्या मनांत आलें, काल आपण घरीं जायला नको होतं मुळींच.

मोठ्या आशेनं तिनें परीक्षकांच्या तोंडाकडे पाहिलें; पण त्यांची मुद्रा

निर्विकार होती. तिनें डोळे मिटून घेतले. एवींतेवीं त्या चमत्कारिक हाडाची कांहींच ओळख पटत नाहीं तर त्याप्रमाणें कबूल करून मोकळें व्हावें असें तिच्या मनानें घेतलें. तिनें सरळ डॉ. पॅनच्या नजरेस नजर भिडवून म्हटलें, " हा तुकडा मला ओळखतां येत नाहीं. "

" ठीक आहे, ते बाकीचे जुळवून लावा. –" त्यांनीं म्हटलें.

तें काम तिनें झटपट करून दाखविलें, न चुकतां, अगदीं सराईताप्रमाणें. तिचें झाल्यावर डॉ. पॅन म्हणाले, " शाबास, मिस वाँग –"

तरी पण ती अस्वस्थच होती. ती म्हणाली, " पण हा आठवा तुकडा कांहीं मला ओळखतां येत नाहीं –"

डॉ. पॅन स्मितपूर्वक म्हणाले, " यांत आश्चर्य नाहीं ? ते माणसाचं हाड नाहींच मुळीं. बनवाबनवी करूं पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना गोंधळांत टाकण्या-साठींच त्यांत ठेवलंय तें. "

● ●

– दुसऱ्या वर्षाच्या शेवटीं उन्हाळ्याच्या सुट्टींत ती घरीं आली तीं अगदीं थकून गेलेली. मन आणि शरीर दोन्हीहि त्याच अवस्थेंत. पहिल्या दिवशीं सकाळीं बिछान्यावर पडल्या पडल्या तिनें डोळे उघडून पाहिलें आणि लगेंच पुन्हां डोळे मिटून घेतले. आळसानें तिनें पुन्हां आपला देह पांढऱ्या स्वच्छ मच्छरदाणीनें वेढलेल्या त्या प्रशस्त लांकडी पलंगावर ताणून दिला. गारगार चटईवर तिनें आपला गाल टेकला आणि विचार म्हणून कसलाच न करतां मेंदूला संपूर्ण विश्रांति देण्याचें ठरविलें. शांग–मा मोठी विचारी. तिनें खिडक्यांचे पडदे केव्हांच ओढून घेतले होते. त्यामुळें सिआओ–शेन अखेर जेव्हां बिछान्यावरून उठली तेव्हां बाहेर जवळ जवळ अकरा वाजण्याचा सुमार झाला होता, याची तिला दादहि नव्हती.

सकाळचें तिनें थोडेसें खाऊन घेतलें. तोंपर्यंत आजोबांचीं सगळीं कामें उरकलेलीं होतीं. शेवटचा रोगी खोलींतून बाहेर पडतांना तिला दिसला आणि लगेंच तिनें प्रवेश केला.

तिला पहातां क्षणींच आजोबांची मुद्रा प्रसन्न झाली. त्यांच्या मनांत आलें कीं, पोर, दिवसें दिवस अधिकाधिक सुंदर दिसूं लागली आहे. पण

तिला उद्देशून ते मोठ्यानें म्हणाले, "काय ग, किती फिकट दिसतेस ! कॉलेजांत खूप ताबडून घेतात वाटतं. पण लक्षांत असूं दे कीं मर मर मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं. चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे. उगीच नाहीं ! "

"होय आजोबा ! " ती पुढें म्हणाली, खूपच अभ्यास करावा लागला. आमच्या वर्गांतलीं निम्मी मुलं नापास झालीं. फार वाईट वाटलं मला. बिचाऱ्यांनीं आमच्या इतकीच मेहनत केली होती."

क्षणभर विचार करून ते म्हणाले, "कुजक्या लांकडावर कोरीव काम होत नाहीं. नापास झाले ते डॉक्टरी विद्येसाठीं नव्हतेच असं म्हणावं लागेल. त्यांनीं दुसरा व्यवसाय करावा. पण तूं पास झालीस हें ऐकून फार आनंद वाटला. तुझ्या वडिलांनीं डॉक्टर व्हावं असं मला मनापासून वाटत होतं. ती माझी इच्छा तूं शेवटाला नेलीस."

आजोबांच्या तोंडून आपली स्तुति ऐकली कीं तिला लाजल्यासारखें होई. आत्तांहि लज्जेनें तिचे गाल आरक्त झाले. विषय बदलण्यासाठीं तिनें शेल्फवर ठेवलेल्या निळ्या कापडी बांधणीच्या एका अवजड ग्रंथाकडे त्यांचें लक्ष वेधलें. त्याच्यावर 'ने-चिंग' या अक्षरांची एक चिठ्ठी डकवली होती. "आजोबा, आपण आज चिनी वैद्यकाचा अभ्यास करूं या कां ? " ती म्हणाली.

"कां नाहीं ? तुझी इच्छा असेल तर जरूर." असें म्हणून त्यांनीं तें पुस्तक काढलें आणि तिच्या हातांत दिलें.

अनुक्रमणिकेवरून तिनें बोट फिरवलें– आरोग्यासंबंधीं कांहीं विचार. नाडी, रोग्याची चर्या, यकृत्, शीर, श्वास, चव..

अठ्ठ्याहत्तराव्या पृष्ठावर नाडीसंबंधीं खुलासा केला होता. ती वाचूं लागली –

"जेव्हां कसलाच विकार जडलेला नसतो तेव्हां श्वासोच्छ्वास संथपणानें होत असतो. अंगठा मनगटाच्या मागच्या बाजूला आणि तीन बोटें नाडीच्या तीन भागांवर अशीं ठेवावीं म्हणजे नाडीपरीक्षा चालूं झाली असें म्हणतां येईल. नाडी परीक्षेला सर्वांत उत्तम वेळ म्हणजे सूर्योदयाची. वैद्यानें

शांत असावें. वैद्याच्या श्वसनाचा एक श्वास आणि एक उच्छ्वास हें नाडीचे ठोके मोजण्याचें माप असतें. नाडी चांगली चालत असली तर एका श्वासोछ्वासांत तिचे चार ठोके पडतात. डाव्या हाताची नाडी उजव्या हातानें तपासावी. उजव्या हाताच्या नाडीला डावा हात लावावा. त्याच्या तिन्ही बोटांना नाडीचे निरनिराळें ठोके लागतात. नाडी कमींत कमी तीन वेळां पाहावी. एकदां हलक्या हातानें. नंतर थोडा दाब देऊन. त्यानंतर आणखी थोडा जास्त देऊन – "वैद्यानें आपले कमींत कमींचे नऊ श्वासोच्छ्वास होईतों नाडी तपासावी. प्रत्येक विभागांत दोन नाडया असतात, म्हणजे प्रत्येक मनगटांत सहा. दोन्ही मनगटांच्या बारा नाडया मिळून बारा वेगवेगळीं इंद्रियें दर्शवितात. उजवें मनगट फुप्फुसें, कोठा, प्लीहा–जठर, तीन दाहस्थानें आणि प्राण-द्वारें दर्शवतें. डावें, हृदय, आंत्र मार्ग, यकृत, पित्त, मूत्रपिंड, मूत्राशय दाखवतें."

"आजोबा," सिआओ-शेन म्हणाली, "हीं तुमचीं चिनी पुस्तकें वाचण्यांत मी ही उन्हाळ्याची सुट्टी घालविण्याचें ठरवलें आहे."

गंभीरपणानें तिच्याकडे पाहून वाँग-कुंग म्हणाले, "या पुस्तकांपासून शिकण्यासारखें खूपच आहे. अनेक प्रसिद्ध वैद्यराजांचे अनुभव त्यांत लिहून ठेवलेले आहेत.

"संध्याकाळीं काय करायचं ठरवलं आहेस," म्हणून जेवण्याच्या वेळीं त्यांनीं तिला प्रश्न केला.

तिनें विलंब न करतां उत्तर केलें, "स्वर्ग मंदिरांत (Temple of Heaven) जावं म्हणतें मी."

शहराच्या दक्षिणेकडल्या उपनगरांत एक उद्यान आहे. त्या उद्यानांत स्वर्ग मंदिर आहे. त्याचें मुख्य आकर्षण म्हणजे उंचच उंच असा पांढरा संगमरवरी चबुतरा. चारी बाजूंनीं पायऱ्या चढून जातां येईल अशा तीन विस्तीर्ण गच्च्या आहेत त्याला. सगळ्यांत उंच असलेल्या गच्चीवरून डोक्या-वरील आकाशाखेरीज कांहीं दिसत नाहीं.

उद्यानाच्या फाटकाजवळ त्यांनीं रिक्षा सोडून दिल्या. दुतर्फा डोलणाऱ्या

फुलझाडांमधून जाणारी अरुंद वाट होती, त्या वाटेनें ती रमत गमत चालत गेलीं. संथपणानें पायऱ्या चढून चबुतऱ्यावर गेली, आणि सर्वांत उंच असलेल्या गच्चीवर जाऊन शांतपणानें उभी राहिली.

वाँग कुंग म्हणाले, "याच जागेवरून आपले सम्राट दरवर्षीं देवाला कृतज्ञतेचें अभिवादन करीत. याच ठिकाणीं अनेक माणसांनीं परमेश्वरापासून आशिर्वाद घेतले. लाओ-त्सेनें लिहून ठेवलें आहे कीं, ईश्वरी सत्तेचा संचार सर्वत्र होत असतो. अशी एकहि जागा नाहीं – वर आकाशांत किंवा खालीं पाण्याच्या तळाशीं – कीं जिथें नीतिनियमांची सत्ता नाहीं. सूर्य, चंद्र तारे सर्वजण ईश्वरी प्रेरणेनें संचार करीत असतात. त्याच महान् शक्तीनें ऋतु आणि दिवस रात्र आंखून दिलेले आहेत."

आजोबांच्याकडे एक विचारपूर्णदृष्टि टाकून सिआओ-शेन म्हणाली, "तुमची सुद्धां देवावर श्रद्धा दिसते. फरक इतकाच कीं, ख्रिश्चन लोकांच्या कल्पनेपेक्षां तुमची देवासंबंधींची कल्पना निराळी आहे."

"होय, पोरी माझा देवावर विश्वास आहे. लाओ-त्सेच्या मतें मनुष्यप्राणी स्वभावतः सज्जनच असतो. जन्मतःच देवानें दिलेली बुद्धि बिघडूं न देतां त्यानें उपयोगांत आणली तर त्याला मनुष्यनिर्मित बाह्य नियंत्रणांची कांहींच आवश्यकता नाहीं. मात्र त्यानें टाओला (दैवी मार्गाला) सोडतां कामा नये. भरमसाट बंधनांनीं माणसाचा विकास खुंटून जातो. टाओचा मार्ग हाच मार्ग योग्य होय. जीवनावर श्रद्धा ठेवावी आणि त्याच्याशीं जमवून घ्यावं. निष्कारण धडपडण्यापेक्षां शांतपणानें, सन्मानानें आणि समाधानानें जीवन घालवावं."

"मनुष्य, निसर्ग आणि परमेश्वर हीं एकरूप आहेत. आपल्या आटोक्याबाहेरच्या गोष्टी मिळविण्यासाठीं मनुष्य धडपडला नाहीं, आपण कोण आहोंत हें जाणून जगण्यांत समाधान मानून राहिला आणि त्या सर्वव्यापी तत्त्वाची जी स्वतंत्रता तीच आपली मानून राहिला तर तो सुखी होईल. ज्या माणसाला हें उदात्त तत्त्व आचरणांत आणण्याचें उमगलें तो आपली इच्छा दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादणार नाहीं, स्वतःच्या मतांचा अवास्तव गर्व करणार नाहीं किंवा आपलंच घोडं पुढें दामटण्याचा प्रयत्न करणार नाहीं,

त्याचे डोळे उघडे होतात आणि त्याचं ज्ञान वाढत राहतं."

हें ऐकून सिआओ-शेन म्हणाली, "आजोबा, किती गोष्टी माहीत आहेत तुम्हांला ! आतां तुम्हींच मला यापुढें मार्गदर्शन केलं पाहिजे. राहून राहून माझ्या मनांत येतं कीं फारच मोठ्या, जबाबदारीचा पेशा मी पत्करला आहे. आणि पुढें केव्हां तरी मानवी जीवन माझ्यावर सोपवलें जाईल हा विचार मनांत येऊन भीति वाटते."

तिचा हात धरून ते उद्यानाच्या फाटकाकडे जाण्यास निघाले. वाटेंत तें म्हणाले, "भिऊ नकोस, पोरी ! तूं डॉक्टर व्हावं अशी देवाचीच इच्छा दिसते. त्यानेंच तुला या कामासाठीं निवडलं आहे."

● ●

–तिसऱ्या वर्षाच्या सुरवातीलाच सिआओ-शेनच्या हातांत रोगी देण्यांत आला. तिचा हा पहिलाच प्रसंग. हॉस्पिटलच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या ऑफिसांत ती आली तेव्हां तिनें नोटीस बोर्डावर नजर टाकली. विद्यार्थ्यांचीं नांवें आणि त्यांच्या केसेस (रोगी) त्यावर लिहिलेलीं तिला आढळून आलीं. नांवाच्या यादीवरून मार्कनें बोट फिरदलें.

"हं. हें इथें. सिआओ-शेन. केस नं. ५६११० वॉर्ड एच् १" तो म्हणाला.

संध्याकाळीं सातच्या सुमारास आपला पहिला रोगी पहायला जाण्यासाठीं ती तयार झाली. लांबच लांब व्हरांड्यांतून एका ठिकाणीं डाव्या बाजूला वळल्यावर ती एच् वॉर्डशीं येऊन दाखल झाली. एच् १ नंबर असलेल्या खोलीच्या दारासमोर ती उभी राहिली. दाराशींच पांढरा पोषाख केलेली एक नर्स तिला दिसली. तिला आपला केस नंबर सिआओ-शेननें दाखवला. त्यासरशीं तिला लगेंच वॉर्डांत प्रवेश मिळाला. वॉर्ड मोठा होता. दोन्ही बाजूला खाटा मांडलेल्या होत्या. तिचा रोगी डाव्या हाताला तीन नंबरच्या खाटेवर होता. शुभ्र मच्छरदाणीनें ती खाट सर्व बाजूनीं झांकली होती. धडधडत्या हृदयावर हात ठेवून सिआओ-शेननें एक दीर्घ श्वास घेतला आणि 'माफ करा हं' म्हणून म्हणत मच्छरदाणी बाजूस केली.

काळसर वर्णाचा एक म्हातारा खाटेवर पडलेला तिला दिसला. तिला पाहतांच आपल्या तोंडाचें बोळकें उघडून तो हंसला. एक रोडपणा सोडला

तर त्याला कांहीं विशेष आजार असावा असें तिला वाटलें नाहीं. मात्र त्याच्या कातडीचा रंग तिला थोडा चमत्कारिक भासला. सभ्यपणानें तिनें त्याला विचारलें, " हं कसं काय वाटतं काका ! तुमची माहिती गोळा करण्यासाठीं मी आलेंय् ! काय होतंय तुम्हाला ? "

" मला कांहीं होत नाहीं, मुली. " त्यानें उत्तर केलें.

" मग तुम्ही इथें कशाला आलांत ? " तिनें विचारलें.

" कितीतरी महिने लोटले, मी आजारीच आहे. पण मला काय होतंय तेंच कोणाला सांगतां येत नाहीं. माझ्या मुलानं या इस्पितळाची कीर्ति ऐकली आणि मला इथें आणलं. माझ्या मनांत नव्हतं. मरायचंच तर घरांतच मरायला मला बरं वाटेल. पण पोरांचं न ऐकून कसें भागेल ? आज इतके महिने तेच मला खायला घालताहेत ना ? "

आर्जवी सुरांत ती म्हणाली, " मग सांगा बरं, तुम्हांला काय, काय होतं तें – "

" मी आपला शेतकरी गडी. उभी हयात घालवली कष्टाचीं कामं उपसण्यांत. " तो सांगूं लागला, " सहा पोरं आणि तीन पोरी लहानाच्या मोठ्या केल्या. माझी म्हातारी गुलामासारखी राबली. सगळ्यांत धाकट्या पोरीला जन्म दिला आणि बिचारीनें डोळे मिटले ते कायमचेच. ती गेल्या-पासून मला पहिल्यासारखं वाटेना. चांगला खादाड होतों हो पूर्वी ! वेळेला दहा भाकऱ्या म्हणजे कांहींच नाहीं. अन् आतां दोन किंवा तीन म्हणजे अती झालं. चेहरा रोडावलेला दिसतो. आणि पोट नगाऱ्यासारखं झालं. दुखतं, खुपतं म्हणाल तर कुठ्ठं कांहीं नाहीं. पण अशक्तपणा फार वाटतो. नात्याचीं माणसें आणि मित्रमंडळी म्हणतात कीं माझा रंगहि बदललाय् अलीकडे."

सिआओ-गेन आपल्या वहींत लिहूं लागली, " न कळत येणारी अशक्तता. कावीळ, वजनांत घट. त्याबरोबर पोट फुगत जाणें. "

त्यानंतर तिनें त्याला बारकाईनें तपासलें आणि वहींत पुढील नोंद केली–

" प्रमाणवद्ध वाढ. पण आता क्षीण, कातडी कावीळ झालेल्या माणसाच्यासारखी, हृदय, फुप्फुसें ठीक. पोटांत उजव्या हाताला वरच्या

बाजूस कठीणपणा."

लिहितां लिहितां रोगाचें निदान तिला स्पष्ट कळून चुकलें. चिंतायुक्त दृष्टीनें तिनें त्याच्याकडे पाहिलें. पण तो गृहस्थ हा वेळपर्यंत तोंडाचें बोळकें उघडें ठेवून गाढ झोंपी गेला होता. हलकेंच तिनें त्याच्या अंगावर पांघरूण घातलें. पायाचा आवाज न करतां वॉर्डबाहेर प्रयाण केलें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नऊ वाजतां तिसऱ्या वर्षाचा प्रत्येक विद्यार्थी रोग्याचा अहवाल हातांत धरून डॉक्टरांच्या बरोबर वॉर्डांत फेरी मारून यायला सज्ज होता. एकमेकांशीं बोलत आपआपले अहवाल परस्परांशीं ताडून पहात ते उभे होते. इतक्यांत प्रोफेसर डनलॅप तिथें येऊन दाखल झाले.

ह्यातावर हात चोळीत ते म्हणाले, "हं –, मुलामुलींनो, आपण आतां फेरी मारायला निघूं या." विद्यार्थ्यांकडे पाहून त्यांनीं स्मित केलें आणि सगळ्यांच्या पुढें ते चालूं लागले.

रोग्याच्या खाटेजवळ थांबावें. विद्यार्थ्याला त्या रोग्याची माहिती विचारावी. काय आढळून आलें ? रोगाचें निदान काय ? असें करीत करीत ते सगळ्या वॉर्डांतून हिंडूं लागले. मार्कनें 'टायफॉईड' म्हणून आपल्या केसचें निदान केल्याचें सांगितलें.

सिआओ-शेननें आपल्या रोग्याची सारी हकीकत व्यवस्थित रीतीनें निवेदन केली. तिची माहिती ऐकून घेतल्यावर पसंतीदर्शक स्मित करून ते म्हणाले, "ठीक. छान ! तूं काय निदान करशील ?"

चुकेल कीं काय या भीतीनें दबकत दबकत, तिनें उत्तर केलें, "यकृताचा कॅन्सर."

"अगदीं बरोबर," प्रोफेसर डनलॅप म्हणाले. अजून त्यांच्या तोंडावरचे हास्य मावळलें नव्हतें. तिला अतिशय वाईट वाटलें. आपला पहिलाच रोगी निश्चित दगावणार. इतरांना सोडून तशीच ती माघारी वळली. त्यानंतर ती त्याला पुन्हां एकदांच पाहणार होती. आपल्या डॉक्टर बरोबर मरणोत्तर शव परीक्षेच्या टेबलावर.

यानंतर थोड्याच दिवसांनीं संध्याकाळच्या सुमारास तिनें आजोबांना

फोन केला. या कॉलेजांत आल्यापासून घरीं फोन करण्याची ही दुसरीच खेप.

टेलिफोनमधून ती म्हणाली, " आजोबा, हा पेशा मला खरोखरच आवडेल कीं नाहीं कोण जाणें ! सारखी काळजी. अन् काळजाला घरं किती वेळां पडतील याचा नेमच नाहीं. "

" काय झालं, बाळ ? " त्यांनीं सचिंत होऊन प्रश्न केला.

" माझा पहिलाच रोगी. आणि तोहि बिचारा यकृताच्या कॅन्सरनें आज तिन्ही सांजेच्या वेळीं दगावला. " तिनें दुःखावेगानें म्हटलें.

" पोरी, " ते म्हणाले, " तूं आपल्या रोग्याची खरोखरी इतकी काळजी वाहतेस हें ऐकून मला फार आनंद वाटतो. चांगल्या वैद्याचं हेंच लक्षण आहे. पण त्याबरोबरच लक्षांत ठेव, चांगल्या वैद्यानं आपलं डोकं शांत ठेवलं पाहिजे. चित्त विचलित होऊं देतां कामा नये. जर चित्ताची अधिक चलबिचल झाली तर निदान करण्याची शक्ति कमी झाल्यावांचून राहणार नाहीं. "

फोनमधून येणारा त्यांचा आवाज ती ऐकूं लागली. " आणि मृत्यू म्हणजेच जीवनाची अखेर असं मानण्याची प्रवृत्ति तुला प्रयत्नपूर्वक सोडून द्यायला पाहिजे. कारण असं मानणं चुकीचं आहे ! मृत्यू टाळणं अशक्य आहे. आणि मृत्यूमुळें या जगांत आपल्या जिव्हाळ्याच्या माणसांची ताटातूट होते हें खरं. पण हें जरी सगळं खरं असलं तरी आपल्या मनाला बजावून ठेव कीं, तो एक या आपल्याला माहिती असलेल्या जन्मांतून दुसऱ्या जन्मांत शिरण्याचा मार्ग आहे. मेलेल्यांची काळजी करण्यांत शक्तीचा अन् वेळेचा दुरुपयोग करणं डॉक्टर या नात्यानं तुला परवडणार नाहीं. जिवंत असलेल्यांची काळजी करण्यासाठीं तुला आपली शक्ति टिकवून धरायला पाहिजे झोंप आतां म्हणजे उद्यां तुला बरें वाटेल. "

● ●

– डिझेल तेलावर चालणारी ती जुनी पुराणी बस चवथ्या वर्षाचे विद्यार्थी घेऊन रिक्षांच्या गोंधळांतून, पादचाऱ्यांच्या गर्दीतून वाट काढीत शहराच्या पूर्वेकडल्या तटाजवळ असलेल्या एका करडया रंगाच्या इमारतीच्या दिशेनें छाक, छूक आवाज करीत धांवत होती. त्या इमारतीचें प्रवेशद्वार भक्कम आणि लोखंडी होतें. आणि तिच्या सगळ्या खिडक्यांना गज होते.

विद्यार्थ्यांना त्या वेडयांच्या इस्पितळांत नेण्यांत आलें. मनुष्याच्या जीवनांत केवढा भयंकर गोंधळ माजणें शक्य आहे, ह्याचें त्यांना प्रत्यक्ष त्या ठिकाणीं ज्ञान करून द्यावयाचें होतें. लांबच लांब असलेल्या व्हरांड्याच्या दोन्ही बाजूंस स्वतंत्र खोल्या होत्या. खोल्या संपल्या नंतर एक विस्तीर्ण वॉर्ड सुरूं होत होता.

मुख्य वॉर्डांत प्रो. वै यांनीं विद्यार्थ्यांना जमा केलें आणि प्रत्येकाकडे एक एक केस सोपवून दिली.

कामावर असलेल्या नोकरानें सिआओ-शेनला व्हरांड्याच्या उजव्या बाजूला असलेल्या एका खोलीशीं नेलें. दरवाजा उघडतां क्षणींच ती आंत जावें कीं नाहीं या शंकेनें बाहेरच घुटमळली. आंत बिछान्यावर पसरलेला मनुष्य प्रेतासारखा निश्चल होता. ती भ्याली हें ओळखून नोकरानें म्हटलें, "खुशाल आंत जा, बाई! त्याच्यापासून कसलाच धोका नाहीं. गरज लागलीच तर मी इथेंच उभा आहे."

तो रोगी तिशी मधला दिसत होता. पोटावर हात ठेवून, आढ्याकडे डोळे लावून, तो अगदीं स्तब्ध पडलेला होता. मधून मधून होणारी पापण्यांची हालचाल नसती आणि श्वासोश्वास चालू नसता तर तो मेला असेंच कुणालाहि वाटलें असतें.

थोडा वेळ तिनें त्याला नीट निरखून पाहिलें. नंतर ती खणखणीत आवाजांत म्हणाली, "तुमचें नांव काय, सांगाल कां महाराज?"

त्या माणसानें ओठ हलविण्याचाहि प्रयत्न केला नाहीं. आपल्याकडे कुणी आलें आहे याची त्याला दादहि नसावी असें दिसलें.

पुन्हां तिनें प्रयत्न केला. तरीहि उत्तर आलें नाहीं. आपणाशीं बोलायलाहि रोगी तयार नाहीं ह्या विचारानें ती किंचित् त्रासल्यासारखी झाली. तिनें आपल्या वहींत पुढील नोंद केली, – "मागची कांहीं माहिती नाहीं. रोगी बोलतच नाहीं."

नंतर तिनें त्याची शारीरिक तपासणी केली. उजेडाचा त्याच्या डोळ्यांच्या बाहुल्यांवर काय परिणाम होतो तें पाहिलें. या निमित्तानें तिला अगदीं जवळून पाहतां आलें. आणि तो चांगला देखणा आहे हें पाहून तिला फार

आश्चर्य वाटलें. डोळ्यांच्या बाहुल्या ती तपाशीत असतांना मधेंच त्याचे डोळे किंचित् हलल्यासारखे दिसले. आणि ओठांवर पुसट हंसूंहि पण दिसून आलें.

नंतर तिनें छाती, पोट, हातापायांचीं बोटें, इत्यादि नेहमींप्रमाणें तपासून पाहिलीं. त्याचे अवयव शिसासारखे जड आणि निश्चल भासले. पण स्नायु मधेंच झटकन् आखडत. आपण काय लिहून घेतलें तें तिनें पुन्हां एकदां वाचून पाहिलें. तिच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी उभी राहिली. तिनें लिहिलें, " निदान – दुभंगलेलें व्यक्तित्व ...."

चार वाजतां प्रोफेसर वैंनीं व्हरांड्याच्या उत्तर बाजूला असलेल्या एका हॉलमध्यें चर्चेसाठीं सर्व विद्यार्थ्यांना एकत्र बोलवून घेतलें. उंच स्टुलांवर विद्यार्थ्यांनीं आसन ठोकलें आणि प्रो. वै प्रत्येकाला प्रश्न विचारीत त्यांच्यामधून हिंडूं लागले.

तिची पाळी आली तेव्हां सिआओ-शेन उठून उभी राहिली आणि म्हणाली, "माझ्या रोग्याला बोलतां येत नाहीं म्हणून मला त्याची मागची कांहींच माहिती गोळा करतां आली नाहीं."

" शक्य आहे." डॉ. वै म्हणाले " पण तुम्हाला काय काय आढळून आलं तें वाचा ना–" शारीरिक तपासणींत काय आढळलं तें तिनें वाचून दाखविलं आणि धारिष्ट करून रोगाचें निदान सांगितलें, " – दुभंगलेलें व्यक्तित्व . ."

प्रोफेसर वै म्हणाले, " छान ! निदान बरोबर आहे. " हे शब्द कानावर पडतांच तिला फार आनंद झाला. प्रोफेसर साहेब विद्यार्थ्यांना उद्देशून लगेच म्हणाले, " ही एक चांगली संधि चालून आली आहे. उद्यां या रोग्याला सोडियम अॅमीटलचा एक डोज देतां येईल. पहा मग तो कसा बोलायला लागेल तें. "

दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या इस्पितळाकडे बस धडधडत जात असतांना तिचा ऊर भरून आला होता. कांहीं विद्यार्थी तेथील रोग्यांची नक्कल करून मोठमोठ्यानें हंसत होते. माणसाच्या दुःख भोगासंबंधींची त्यांची ही सहानुभूतिशून्य वृत्ति पाहून सिआओ-शेनला रडूं कोसळण्याच्या बेतांत आलें. काल पाहिलेल्या रोग्याचे भावनाप्रधान डोळे, तिला आठवले. तिच्या

मनांत आलें कीं त्या माणसाचीं जर यांनीं अशी चेष्टा केली तर त्याला धक्काच बसेल आणि तो कधींच बरा होणार नाही.

प्रोफेसर वैनीं सोडियम ॲमीटलची पिचकारी भरून आणण्याला सांगितलें. इंजेक्शनची लांब सुई पाहतांच सिआओ-शेन ला हृदयास धडधड लागलें. इतर विद्यार्थ्यांच्या समवेत रोग्याच्या खोलीकडे जाताना आपलें हृदय जड झाल्यासारखें तिला वाटलें. दाराला बाहेरून कुलूप होतें. रखवालदारानें तें उघडून दिलें. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्वच्छ दाढी केलेला एक देखणा मनुष्य स्टुलावर बसून राहिलेला त्यांना दिसला. त्यांना पाहतांच उठून त्यानं अभिवादन करीत म्हटलें, "या नं, आंत या कीं–" त्यानें आपली नजर सगळीकडे फिरवली. सिआओ-शेन दृष्टीस पडतांच तो प्रसन्नपणानें हंसला.

सगळे थक्क झाले. प्रोफेसर गोंधळून गेले. त्यांनीं घाईघाईनें सगळ्यांना बाहेर जाण्याची खूण केली.

"अहो–" रोग्यानें सिआओ-शेनला हांक मारली. जणूं कांहीं कांहींच ऐकलें नाहीं अशी बतावणी करून ती मुकाटचानें तिथून बाहेर सटकली. तिची छाती धडधडत होती.

त्या तरुण माणसाचा सुरेख चेहरा आठवून तिचा चेहरा लाजेनें लालबुंद झाला. प्रोफेसर वैनीं हातानें खुणावून विद्यार्थ्यांना खालीं बसण्यास सांगितलें आणि म्हटलें, "या रोगांत सोडियम ॲमीटलचा किती उपयोग होतो तें तुम्हांला दाखवण्याची संधि हुकली. पण त्यापेक्षां महत्त्वाची एक गोष्ट तुम्हांला सांगतों ती ध्यानांत ठेवा. हा रोग एखाद्या धक्क्यानें बरा होऊं शकतो. तो धक्का मग कशाचा कां असेना. विजेचा धक्का, इन्शुलिन किंवा मानसिक धक्का– म्हणजे कुटुंबांतील माणसाचा मृत्यु– " बोलतां बोलतां ते क्षणभर थबकले. नंतर हंसून त्यांनीं वाक्य पुरें केलें, " किंवा प्रथमदर्शनी प्रेम ह्यांचा देखील यावर चांगला परिणाम होऊं शकतो. "

प्रोफेसर वैनीं अविचारीपणानें हा अखेरचा मुद्दा पुढें मांडावा याचा मार्कला अतिशय राग आला. एक दुष्ट शंका त्याच्या मनांत थैमान घालूं लागली. कशाची तरी त्याला भीति वाटूं लागली. दोन झाडें वादळानें

उन्मळून पडावीं आणि पाण्याच्या लोंढ्याबरोबर एकमेकांपासून दूरदूर वहात जावीं, पुन्हां एकत्र येण्याचा संभव मावळत जावा त्याप्रमाणें त्याला सिआओ–शेन आणि स्वत: यांच्या बाबतींत अनेकदां वाटूं लागलें होतें. त्यानें तिच्याकडे कानाडोळा करून पाहिलें. तिचे गाल तांबूस झालेले त्याला दिसले. प्रोफेसर तिच्या जवळ जाऊन म्हणाले, " मिस् वाँग, तुमचा रोगी आतां बोलूं शकतो आहे. तेव्हां त्याची माहिती गोळा करायला तुम्हांला हरकत नाहीं. "

तिनें आपला शुभ्र कोट नीटनेटका केला, स्टेथॉस्कोप हातांत घट्ट धरला. आणि पुन्हां रोग्याच्या खोलींत पाऊल टाकलें.

रोगी काँटवर बसला आहे असें पाहून ती स्टुलावर बसली. दोघांनाहि चोरट्यासारखें झालें. आपल्या खिशांतून तिनें वही बाहेर काढली, आणि त्याची नजर आपल्यावर खिळून राहिली आहे याची पूर्ण जाणीव होती तरी हंसल्यासारखें करून ती त्याला म्हणाली, " आपलं नांव काय ? "

" लिआंग काय "

" वय ? "

" एकोणतीस "

" धंदा ? "

" शिक्षक. "

" बरं, तुमच्या आजाराची थोडी माहिती सांगतां कां ? "

" माफ करा. माझ्या आईला जाऊन विचारा. मी आजारी कसा झालों हें मला मुळींच माहीत नाहीं. ५० पायमीन, हुतुंग हा तिचा पत्ता. "

आणि इतके झाल्यावर रोग्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. सिआओ-शेनच्या हृदयांत कालवल्यासारखें झालें. सहानुभूतीपर कांहींतरी बोलावें असें तिला वाटलें देखील, पण तिला धीर झाला नाहीं. उठून उभी राहिली आणि ती म्हणाली, " तुम्हांला कांहीं सांगतां येत नसेल, तर मला आतां जावं लागेल. "

कायचा चेहरा उतरल्या सारखा झाला. मृदुस्वरांत तो तिला म्हणाला, " मला फार एकटं–एकटं वाटतं. काल तुमचें तोंड पाहिल्याबरोबर माझ्या डोक्यांतला गोंधळ वितळून गेला. आजवर कोणत्याहि डॉक्टरला हें करतां

आलं नाहीं. परत आल्यावर मला भेटाल ? तुम्ही भेटावं असं मला फार फार वाटतें. ''

"हो येईन कीं, '' ती म्हणाली. "पण आधीं मला तुमच्या आईची गांठ घेतली पाहिजे. ''

संध्याकाळीं जेवण झाल्याबरोबर तिनें लगेच रिक्षा बोलावून घेतली. तिनें आपला पांढरा कोट काढून ठेवला. त्या ऐवजीं मखमलीचा काळा झगा परिधान केला. लवकरच एका टुमदार घरापुढें जाऊन रिक्षा थांबली. सिआओ–शेन चार लांकडी पायऱ्या चढून गेली आणि दार ठोठावूं लांगली. एका सडपातळ पोक्त बाईनें दार उघडलें.

सिआओ–शेननें अभिवादन करून म्हटलें, "माझें नांव वाँग, तुमच्या चिरंजीवांचा निरोप सांगायला आलेय्. ''

मिसेस लिआंग प्रति नमस्कार करून म्हणाल्या, " आंत या ना –" नंतर आंत गल्यावर त्या म्हणाल्या, " तुम्हांला आधीं चहा देत नाहीं, याबद्दल क्षमा करा मला. पण याचं कारण मुलाचा निरोप ऐकायला मी फार अधीर झालें आहे. काय झालंय त्याला. सांगा – सांगा, लवकर, ''

उल्हसित मुद्रेनें सिआओ–शेन म्हणाली, " आनंदाची बातमी आहे. तुमचे चिरंजीव बरे होतील. मी मेडिकल कॉलेजांतली विद्यार्थिनी आहे, आणि ते सध्यां माझे रोगी आहेत. त्यांनींच मला तुमचा पत्ता दिला आणि तुम्हांला सांगायला सांगितलं. काल एक चमत्कार घडून आला. त्यांना एकाएकी बोलतां येऊं लागलं. ''

ती पोक्त स्त्री हातानें तोंड झांकून घेऊन रडूं लागली. आनंदाश्रु तिच्या गालांवर ओघळूं लागले. नंतर तिनें सिआओ–शेनचे हात घट्ट धरून म्हटलें, " देव तुमचं भलं करो. कित्ती आनंदाची बातमी आणलीत तुम्ही ! पुन्हां सांगा पाहूं. म्हणजे हें स्वप्न नाहीं याची मला खात्री वाटेल. ''

" बाईसाहेब, तुमचे चिरंजीव खरोखरीच बरे होतील. नक्कीच. '' सिआओ–शेन पुन्हां म्हणाली.

" देव तुमचं कल्याण करील.'' मिसेस लिआंग म्हणाल्या, " आतां थोडा चहा घेतलाच पाहिजे हं. ''

झटून ह्या स्वयंपाकघराकडे गेल्या तहा होईपर्यंतच्या दरम्यान लिआंगने प्रश्न केला, " कांहीं प्रश्न विचारूं का तुमच्या चिरंजीवांच्यासंबंधी ?"

" विचारा कीं. मला माहीत असलेलं सगळं सांगेन."

" त्यांचं बालपण, शिक्षण, आजारी केव्हां पडलें ते ? कसे ? सगळं सांगा. "

मिसेस लिआंग सांगूं लागल्या, " आमचं लग्न एका मध्यस्थामार्फत झालं. लग्नाच्या दिवसापर्यंत आम्ही परस्परांना पाहिलंसुद्धां नव्हतं. ते होते एकोणीस वर्षाचे अन् मी सोळाची. आम्ही फार सुखांत दिवस घालविले. लवकरच आम्हांला मुलगी झाली. ती जन्माला आली तेव्हां सासूबाईंनीं तोंड वाकडें करून मला आशीर्वाद दिला. पण दुसरी मुलगी जन्माला आली तेव्हां त्यांनीं ' हें चालायचं नाहीं ' म्हणून मला खडसावलें. तिसरी मुलगी जन्माला आली तेव्हां बाहेरच उभ्या राहून त्यांनीं दररोज माझ्यावर शिव्याशापांची लाखोली वाहण्यास आरंभ केला. कायच्या वेळीं मी गर्भार राहिलें तेव्हां प्रत्येक आठवड्याला बुद्धाची प्रार्थना करायला जाऊं लागलें. तो जन्माला आला तेव्हां काय आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी. मुलगा दिसायला देखणा होता. सासूबाई खूष झाल्या. यांनाहि फार आनंद झाला.

" शाळेंत तो फार हुशार होता. पटो युनिव्हर्सिटींत तो दाखल झाला. तत्त्वज्ञान विषय ध्यायचं त्यानं ठरवलं. वडिलांनीं त्याला इंजिनियरिंग घेण्याची गळ घातली. पण त्या विषयाची त्याला बिलकूल गोडी नव्हती. कॉलेजच्या दुसऱ्या वर्षीं त्याचे वडील वारले. कायला फार दुःख झालें. आपण वडिलांची निराशा केली असें त्याच्या मनानें घेतलें.

" यानंतर कां कोण जाणे तो पूर्वीचा राहिला नाहीं. त्याचें चित्त स्थिर राहिलें नाहीं. पण अभ्यास करण्याची त्याला आवड होती. ऑनर्स घेऊन तो परीक्षा पास झाला. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांनीं त्याला आपला दुय्यम म्हणून तिथेंच ठेवून घेतलं. हें काम त्याला मनापासून आवडत असे. पण दुसऱ्या उन्हाळ्यांत परीक्षा झाल्यावर तो घरीं परत आला तेव्हां फार थकल्यासारखा दिसला. कांहीं दिवस हवापालट म्हणून त्याला डोंगर भागांत

नेण्याचं मीं ठरवलं. निद्रिस्त बुद्धाच्या देवळांत दोन खोल्याहि भाड्यानं ठरवून ठेवल्या.

" पहिल्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही खूप लांब फिरून आलों अन् वाटेंत जेवणासाठीं एका लहानशा खेड्यांत थांबलों. परत येतांना तो अक्षर बोलला नाहीं. तो दमलेला होता हें मला माहीत होतें म्हणून मला त्याच्या अबोलपणाचं त्यावेळीं विशेष कांहीं वाटलं नाहीं. दुसऱ्या दिवशीं मी लवकर उठलें आणि देवळांतल्या पुजाऱ्यांनीं दिलेल्या लहान शेगडीवर त्याच्या आवडीचं खाणं मीं तयार केलं. डुक्कराच्या भाजलेल्या मांसाचं पुरण घातलेले तिळाचे खुसखुशींत वडे केले. सगळं तयार झाल्यावर त्याला हांक मारली. म्हटलं, " काय, तुझ्या आवडीचं केलं आहे. खायला ये. "

" पण त्याचं उत्तर आलं नाहीं. मी पुन्हां हांका मारल्या. तरी कांहीं नाहीं. शेवटीं त्याच्या खोलींत गेलें मी. बिछान्यावर पडून निश्चलपणानें तो आढ्याकडे टक लावून पहात होता. त्यानं उत्तर दिलं नाहीं किंवा त्याची चर्याही बदलली नाहीं.

" मला भीति वाटली. मी डॉक्टरांना बोलावून घेतलं. त्यांनीं तपासून पाहिलं आणि संशयित मुद्रेनं मान हालवली. नंतर त्यांनीं कायच्या दंडांत कांहींतरी टोचलं. त्यासरशीं त्याच्या पापण्यांची हालचाल सुरू झाली. इकडे तिकडे पाहिलं त्यानं, अन् घोगऱ्या आवाजांत म्हटलं, " आई मला फार दमल्यासारखं वाटतंय्. मला जरा शांतपणानं पडूं दे. "

" डॉक्टर निघून गेल्यावर त्यानं डोळे मिटून घेतले. अन् तो पुन्हां झोपीं गेला. "

त्या डोळे कोरडे करण्यासाठीं मध्येंच थांबल्या. सहानुभूतीनें सिआओ-शेन म्हणाली, " तुम्हांला जर फार त्रास होत असेल तर सगळं सांगितलं नाहीं तरी चालेल हं. "

" छेः छेः ! तुम्हांला सगळं समजलंच पाहिजे. पुन्हां त्या डॉक्टरांना मी बोलावून घेतलं. त्यांनीं सांगितलं कीं रुग्णालयांत नेलं पाहिजे त्याला. नाहीं तर तो उपाशी मरेल. तुम्हांला तो भेटला त्या इस्पितळांत त्यांनीं कायला त्याच दिवशीं नेऊन पोहोंचविलं. "

नंतर त्या आवेगानें म्हणाल्या, केव्हां भेटेल तो मला ? पुढचा बुधवार भेटण्याचा वार आहे. पण आतां मला इतका धीर धरवत नाहीं हो. ”

“ मी रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांना जाऊन भेटतें आणि बुधवारच्या आधीं भेटण्याची परवानगी तुम्हांला मिळवून देतां आली तर पाहातें. ठीक आहे. मी येईन पुन्हां. ” असें म्हणून सिआओ–शेननें त्यांना नमस्कार केला व तिथून प्रयाण केलें.

● ●

– एके दिवशीं संध्याकाळीं ती वसतिगृहांत शिरते न शिरते तोंच तिच्या आजोबांचा फोन आल्याचा तिला तांतडीचा निरोप समजला. घाबरून तिनें लगेंच फोन घेतला. थोडया वेळानें त्यांचा आवाज तिला ऐकूं येऊं लागला.

धापा टाकीत तिनें म्हटलें, “ आजोबा, तुमची प्रकृति ठीक आहे नं ?”

“ छान आहे, ” त्यांनीं उत्तर केलें. पण त्यांचा आवाज नेहमींचा भासला नाहीं. जरा खांकरून ते पुढें म्हणाले, “ आज रात्रीं घरीं ये. मला तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे. ” त्यांच्या बोलण्यांत तुटकपणा दिसून येत होता.

“ पण आजोबा, उशीर किती झालाय ! टेलिफोनवरून नाहीं का सांगतां यायचं ? ”

“ घरींच यायला पाहिजे तुला. आणि तेंही आज रात्रींच. थोडयाशा कठोरपणानें त्यांनीं म्हटलें.

ती खोलींत धांवत गेली. पांढरा गणवेष उतरून ठेवून तिनें हिरव्या रंगाचा पोषाख चढविला. कानांत डूल अडकवले. आजोबांच्या घराजवळ तिची रिक्षा थांबली तेव्हां शांग–मा धांवतच तिला सामोरी गेली.

आपल्या हातून चूक तरी काय झाली हें सिआओ–शेनला अजून कोडेंच असल्यामुळें ती म्हणाली, “ नाय, नाय – , लवकर सांग. आजोबांनीं रागवावं असें माझ्याकडून काय झालं आहे ? ”

“ बिचाऱ्या ! नाहीं समजलं ? कुणी तरी तुमच्या वर्गांतल्या विद्यार्थ्यानं फोनवरून त्यांना सांगितलं कीं तुम्ही एका वेडयाच्या गांठीं–भेटी घेत असतां. ”

"अस्सं होय ?" सिआओ-शेन म्हणाली, "एवढंच ना ?" तिनें ओळखलें कीं हें काम मार्कचेंच. शांग-माशीं बोलण्यांत फार वेळ न घालवतां ती तडक आजोबांच्या खोलीशीं जाऊन दारावर टिचक्या मारूं लागली.

तिला पाहतां क्षणींच त्यांचा राग मावळला. "बैस, बाळ !" ते म्हणाले, "तुझ्याशीं आत्तांच बोलणं आवश्यक होतं. अलिकडे मला तुझी फार काळजी वाटूं लागली आहे. मला असं समजलंय कीं वेडयांच्या इस्पितळांतून बाहेर पडलेल्या एका माणसाला तूं वारंवार भेटायला जाऊं लागली आहेस. कशासाठीं ? अजून तो तुझ्या देखरेखीखालीं आहे कां ?"

तिनें शांतपणानें त्यांच्याकडे पाहून म्हटलें, "नाहीं आजोबा ! तुमची कुणीतरी दिशाभूल केली आहे. तुम्ही म्हणतां ते गृहस्थ सज्जन असून युनिव्हर्सिटींत प्रोफेसर आहेत. मध्यंतरी त्यांची प्रकृति मज्जातंतूंच्या थकव्यानं फार बिघडली होती हें खरंय अन् त्यावेळीं मी त्यांची डॉक्टर होतें. पण आतां ते चांगले सुधारले आहेत."

"बाळ, तुझं हें वय असं आहे कीं, मनांत कांहीं हेतू न धरतां तुला कोणी तरुण मनुष्य भेटेल हें शक्य नाहीं. तुला मी चांगलं शिक्षण दिलं आहे. आणि तूं वाँग घराण्यांत रहावंस अशी माझी इच्छा आहे. तूं पत्करलेला पेशा फार उच्च आहे आणि त्यासाठींच आपलं सगळं आयुष्य तूं वेचलं पाहिजेस.

ती त्यांच्याकडे लीनपणानें पहात होती, पण आंतून तिला राग येत होता.

ती म्हणाली, "आजोबा ही मैत्री सोडायला मला कृपा करून सांगूं नका. तुम्हाला माहीतच आहे कीं, माझ्या वयाचा एकहि मित्र मला आजवर कधीं मिळाला नाहीं. त्यामुळें काय भेटेपर्यंत आपण केवढचा मोठ्या समाधानाला मुकलों आहोंत हें मला समजलं नव्हतं. आम्हांला मित्र म्हणून राहूं द्या. ते फार चांगले आहेत. ध्येयवादी आहेत. तुमची त्यांची ओळख झाली म्हणजे तुम्हांलाहि ते आवडतील. तुम्हांला भेटायला मी त्यांना घेऊन येणार आहे."

तिच्यावर अधिक रागावणें शक्य नव्हतें म्हणून ते म्हणाले, "या विषयावर आत्तां मला जास्त कांहीं बोलायचं नाहीं. त्याच्यासंबंधीं आणखी माहिती

तुझ्याकडून मला ऐकूं दे, आणि तुमची मैत्री टिकून राहिली तर मग कांहीं दिवसांनीं त्यालामाझ्याकडे भेटायला घेऊन ये. माझं पुन्हां तुला हेंच सांगणं आहे कीं, तूं वाँग घराण्यांतली आहेस हें विसरूं नकोस, म्हणजे झालं. ''

शेवटचें हॉस्पिटलमधेंच राहण्याचें वर्ष तिला फार जड गेलें. रोजचा अभ्यास तर होताच. शिवाय नित्याचें काम रोजच्या रोज झालेंच पाहिजे होतें. भरींत भर म्हणजे आठवड्याचे सातहि दिवस आणि दिवसाचे चोवीस तास तिला सतत जागरूक रहावें लागे. कारण केव्हां बोलावणें येईल याचा नेम नसे. त्यांतून वेळ काढून अधून मधून ती कायला भेटून येत असे.

मार्क मात्र अलीकडे बेचैन होता. आपला पराभव झाला हें त्याला दिसत होतें. पण तें कबूल करायला त्याचें मन तयार नव्हतें.

एके दिवशीं संध्याकाळीं वर्गांतून परत येत असतांना तिच्या डोक्यांत एका रोग्याची हकीकत घोळत होती. एक तरूण चिनी गृहस्थ मानवी अवशेष शोधायला मंगोलियाला गेला होता. तिथें त्याला ॲंक्टिनॉमिकॉसिस झाला. बरेच महिने अतिशय हाल सोसून तो अखेर वारला.

विचारांत ती गर्क असतांना मार्कनें तिला हटकलें, '' कसला विचार चाललाय् ? '' त्यानें विचारलें.

'' ॲंक्टिनॉमिकॉसिसनें दगावलेल्या त्या तरुण माणसाचा विचार करतेंय्. त्याच्या कुटुंबाची मला फार दया येतेय्. ''

तिच्याशीं बोलतांना अलीकडे मार्कचा समतोलपणा जात असे, तो फटकन् म्हणाला, '' तुझं काय झालंय् कीं प्रत्येक गोष्टींत तूं अलीकडे भावनावश होऊं लागली आहेस –''

चिडून तिनें प्रत्युत्तर केलें, '' आणि तुमचं काय झालंय्, माहिती आहे ? मानवी दुःखाची तुम्हांला कदरच वाटेनाशी झाली आहे. तुम्हांला माहिती असेलच कीं समजुतदार डॉक्टरांच्या नुसत्या सहानुभूतीनं बरें होतील असे अनेक रोग आहेत. ''

'' माहीत आहे. तुला म्हणायचंय् मज्जातंतूची विकृति झालेली. '' तो म्हणाला.

आतां तिचा चेहरा रागानें लाल झाला. ती संतापानें म्हणाली, '' मज्जा-

तंतू ? वेळ मारून न्यायला डॉक्टरांच्या कोशांत हा चांगला शब्द आहे नाहीं ? काय रोग आहे याचं निदान झालं नाहीं म्हणजे 'मज्जातंतूंचा बिघाड' असं ठोकून द्यावं. मी रोग्याचा रोगाचा मागचा इतिहास, त्याची परिस्थिति, त्याच्या संवयी, हें पाहण्याचा प्रयत्न करतें अन् माझं ऐका मार्क, डॉक्टर म्हणून आपल्याला हेंच करायला पाहिजे."

तिचें म्हणणें खोडून काढणें त्याला अशक्य वाटलें तेव्हां तो सरळ वसतिगृहाकडे निघून गेला.

❸ ❸

दुसऱ्या दिवशीं वॉर्डांतून फेरी मारण्याच्या वेळीं प्रोफेसर डीन यांनीं इस्पितळांतल्या सर्व डॉक्टरांना एका महत्त्वाच्या केससंबंधीं विचार विनिमय करण्यासाठीं बोलावून घेतलें.

सुन-चिहनें त्या केसची शारीरिक तपासणी आणि मागील इतिहासाचा अहवाल सादर केला.

रोगी म्हणजे चोवीस वर्षांची एक बाई होती. सोळाव्या वर्षीं तिचें लग्न झालें. पण आत्तां इतक्या वर्षांनंतर प्रथमच ती पोटीशीं राहिली होती. ओकाऱ्या एक सारख्या चालूं होत्या. इस्पितळांत आणली तेव्हां ती रोड झालेली होती. तिला कावीळ झाल्यासारखी दिसत होती. आणि तिच्या अंगांत ताप होता. ओकाऱ्या अजून कमी झाल्या नव्हत्या. आणि गेले तीन दिवस ताप फारच चढला होता.

प्रोफेसर डीननीं घसा साफ करून म्हटलें, " आजाऱ्याची स्थिति फार कठीण आहे. तिचे डोहाळे भयंकर कडक आहेत. मूल काढून टाकलं नाहीं तर चोवीस तासांच्या आंत बाई दगावेल." सगळ्यांच्याकडे एकवार दृष्टिक्षेप टाकून ते म्हणाले, त्यांच्या घरच्या मंडळींना हें समजावून सांगायला कोण तयार आहे ? "

तेथें जमलेले सगळे लोक इतर प्रांतांतून आले होते. आणि त्यांचीं बोलण्याची लकब थोडी वेगळी होती. सिआओ-शेनला पीकिंगची भाषा सफाईनें बोलतां. येत होती म्हणून अखेर ही कामगिरी तिच्यावरच सोपवण्यांत आली.

वॉर्डांत शिरतांच तिला हॉलमध्यें एक ओढलेल्या चेहऱ्याचा मनुष्य

उभा असलेला दिसला " तुम्हीच मिस्टर यांग कां ?" तिनें त्याला विचारलें.

" होय, " त्यानें सौजन्यपूर्वक उत्तर केलें.

" हें पहा, तुमच्या पत्नी फार आजारी आहेत. तुम्हांला समजलं असेलच म्हणा. आमच्यांतल्या निष्णात डॉक्टरांचं म्हणणं असं आहे कीं बाईंना वांचवायचं असेल तर गर्भ काढला पाहिजे. "

दोन्ही हातांनीं तोंड झांकून घेत शोकावेगानें तो म्हणाला, " छेः छेः ! "

" तुमच्या पत्नी तुम्हाला हव्या आहेत नं ? "

" देवासाक्ष, मला ती हवी आहे. पण माझ्या आईवडिलांना तुम्ही म्हणतां तें मान्य होणार नाहीं. एकुलता एक मुलगा आहे मी त्यांचा. वरींच वर्षें बायकोला दिवसच राहात नव्हते. नातू व्हावा म्हणून माझ्या आईनें खूप नवस केले. "

सहानुभूतीच्या सुरानें ती म्हणाली, " मीं सांगितलं म्हणजे त्यांना पटेल कदाचित्. "

" पहा सांगून, पण माझी खात्री आहे कीं ते केव्हांहि परवानगी देणार नाहींत. " त्या तरुणानें म्हटलें.

त्याला तिथेंच सोडून ती रोग्याच्या खोलींत गेली.

जवळ जवळ मृतवत् झालेली एक स्त्री कॉटवर पडलेली होती. दोन वृद्ध स्त्रिया खोलींत दिसल्या. एक बसली होती. दुसरी उभीच होती. उभी असलेली रोगी बाईची आई होती. दुसरी सासू होती. आईकडे वळून सिआओ-शेन म्हणाली, " तुमची मुलगी अतिशय वाईट परिस्थितींत आहे. आणि तिच्या पोटांतील मूल हाच तिचा खरा आजार आहे. तिला वांचवायचं असेल तर मूल काढून टाकायला पाहिजे. "

ताडकन् सासू खुर्चीवरून उठून उभी राहिली. तरातरा सिआओ-शेनच्या दिशेनें चालत आली आणि तोंड वेडें वांकडें करून ओरडली, " नाहीं नाहीं. माझ्या नातवाला मी मारूं देणार नाहीं. आज इतकीं वर्षं मी त्याच्या यण्याची वाट पाहत आहे तें काय उगीच ? "

प्रसंग बाका होता. सासू आईकडे डोळे फाडून पहात होती. अखेरीस सिआओ-शेन म्हणाली, " मुलाला वांचवायचं कीं आईला वांचवायचं हा

प्रश्नच नाहीं इथं. खरी गोष्ट अशी आहे कीं गर्भ काढून टाकला नाहीं तर दोघंहि दगावतील. आई आणि मूल, दोघंहि. ''

हाताची जुडी करून सासू म्हणाली, '' माझी सून आहे ती. तिच्या बाबतींत मी कुण्णाचं ऐकायला तयार नाहीं. माझ्या मुलाशीं तिचं लग्न झालंय. ती आतां आमची आहे. मी तिला घरीं नेईन अन् माझ्या पसंतीच्या डॉक्टरांना नेऊन दाखवीन ''

सासू इतकी निर्दय कशी होऊं शकते हें सिआओ-शेनला समजना. वरिष्ठांना सांगण्यासाठीं रागानें ती खोलीबाहेर पडली. मग तिच्या मनांत एक कल्पना आली. सासूचा हट्ट होता सुनेला घेऊन जाण्याचा. आणि घरांतल्या माणसांच्या परवानगीशिवाय ऑपरेशन तर शक्य नव्हतें, तिनें नवऱ्याला सांगितलें, '' मी माझ्या आजोबांना बोलावून घेतें आणि त्यांना ही केस घेतां कां म्हणून विचारतें. आजोबा वाँग कुंग प्रसिद्ध वैद्य आहेत. कदाचित् तुम्ही त्यांचं नांव ऐकलं असेल. ''

'' हा काय प्रश्न झाला ? सगळ्यांना ते माहित आहेत, '' थोडा विचार करून बाईचा नवरा संचित मुद्रेनं म्हणाला, '' पण त्यांची फी फार जबर असेल. आम्हांला ती कशी परवडेल ? ''

'' त्याची चिंता मी करीन. तुमच्यासाठीं मी फी कमी करायला सांगेन त्यांना. ''

तिनें आजोबांना फोन केला. परक्यांच्या हाताखालीं शिक्षण घऊनही तिनें अजून आपणाला मान द्यावा हें पाहून त्यांना आनंद वाटला.

तब्बल दोन आठवडे केसचें पुढें काय झालें तें समजून घेण्यासाठीं ती वाट पहात राहिली. या अवधींत तिनें फोन केला नाहीं. मनांत भीति कीं, वाईटच ऐकायला मिळेल. पण अखेरीस तिला रहावलें नाहीं. तिनें आजोबांना फोन करून विचारलेंच, '' आजोबा '' ती बोलूं लागली, '' तुम्हांला आठजण करून देतेय हं, आजपासून एक महिन्यानें मी डॉक्टर होईन. मी डॉक्टर झालेली पाह्यला तुम्ही येणार कीं नाहीं ? काय ? येणार नं ? ''

'' आतां पुन्हां तोंच प्रश्न विचारून मला भंडावून सोडूं नकोस. मी

शांग–आनला धाडून देईन.” नंतर त्यांनीं विषय बदलून म्हटलें, अग तुझी ती वाई ! तिच्या ओकाऱ्या थांबल्या बरं का ! ”

“ खरंच आजोबा ? तें कसं काय ? ”

“ तूंच जाऊन भेटून ये ना तिला. ”

“ मूल अजून शाबूत आहे तिच्या पोटांत ? ”

“ अलबत. ”

“ आजोबा, अगदीं अघटित केलंत तुम्हीं ! ” तिनें आश्चर्यचकित होऊन म्हटलें, “ काय केलंत तुम्हीं ? सांगा मला. ”

“ चिनी वैद्यकांतला तो एक गुप्त उपाय आहे. पण तूं पुन्हां घरीं येशील तेव्हां तुला सांगेन. ”

टेलिफोन बंद करून ती धांवतच प्रोफेसर डीनकडे गेली. तिनें त्यांना सांगितलें तेव्हां ते हंसले आणि तिच्या खांद्यावर थोपटल्यासारखें करून म्हणाले, “ ज्यांना वस्तुस्थिती माहीत नाहीं त्यांना वाटतं चिनी वैद्यक म्हणजे कांहींतरी जंतर मंतर, जादूटोणा, चमत्कारिक काढे आणि मुरगळणें पिरगळणें आहे. पण ही समजूत फार चुकीची आहे. ही केस मी अमेरिकेंतल्या आमच्या संस्थेपुढें मांडीन. तुझे आजोबा खरोखरीच फार मोठे वैद्य आहेत.”

❦

शस्त्रक्रिया हा विषय सिआओ–शेनला फार आवडत असे. आतां शिक्षण संपत येण्याच्या वेताला तिला ऑपरेशनच्या मदतनिसांत दाखल करून घेण्यांत आलें. आपलें नांव बोर्डवर झळकलेलें पाहून प्रथम तिला खरेंच वाटलें नाहीं.

महत्त्वाचें ऑपरेशन होतें तें. सिझेरिअन ऑपरेशनची केस होती. ताबडतोब तिनें जाऊन आपलें पुस्तक उघडून पाहिलें आणि चित्रांच्या साहाय्यानें हत्यारांची नामावली धोकायला सुरुवात केली. तरी पूर्ण समाधान न झाल्यामुळें ती ऑपरेशन हॉलची देखरेख ठेवणारी मिस् व्हाइटसाइड होती तिच्याकडे गेली. मिस् व्हाइटसाइड चाळीशी ओलांडलेली उंच, हाडकुळी बाई होती. उमेदवार डॉक्टरांनीं येऊन भंडावून

सोडावें हें तिला मुळींच खपत नसे.

" ऑपरेशन सकाळीं नऊ वाजतां आहे, " कठोर मुद्रेनें तिनें म्हटलें.

" मला ठाऊक आहे पण मला भीति वाटतेय. आपल्या प्रोफेसरांना हत्यारं किती झटपट द्यावीं लागतात तें तुम्हांला माहीतच आहे. असं आधीं तुम्हांला येऊन भेटणं बरोबर नाहीं हें मलाहि समजतंय्. पण हत्यारं निवडण्याच्या कामांत मीं तुम्हांला मदत करूं द्या म्हटलं तर तुम्ही नाहीं म्हणणार नाहीं असं मला वाटतं. "

तिची ती कळकळ पाहून मिस् व्हाइटसाइडचा करडेपणा कमी झाला. त्या म्हणाल्या, " बरं तर, आत्तांच सुरुवात करूं.— "

कांचेचें मोठें कपाट तिनें उघडलें. सिआओ–शेन त्यांतून एक एक हत्यार त्याचें नांव सांगून बाहेर काढूं लागली. आणि मिस् व्हाइटसाइड एका कागदावर टिपून घेऊं लागली.

" ४० हॉलस्टेडस्, २५ केलीज्, १० ॲलिसीस, " सर्व झाल्यावर मिस् व्हाइटसाइड स्मित करून म्हणाली, " सगळीं पाठ आहेत कीं हत्यारं, छान होईल तुझं काम. "

" आभारी आहें तुमची. एकदां चुकीचं हत्यार दिलं म्हणून एकाला तेंच हत्यार प्रोफेसरांनीं फेंकून मारलेलं मी पाहिलं आहे. तसं जर कांहीं माझ्या बाबतींत झालं तर लाजेनं मला मेल्याहून मेल्यासारखं वाटेल. "

" तुझ्या बाबतींत तें अशक्य आहे, मिस् वाँग. "

ऑपरेशनची वेळ आली तेव्हां तिला आपले नेहमींचे कपडे सगळे काढून स्वच्छ स्नान करून यायला सांगण्यांत आलें. नंतर तिला एक टोपी, एक तोंडावरून बांधायचें फडकें, कॅनव्हासचे बूट आणि पांढरा झगा हीं देण्यांत आलीं. त्यानंतर मग तिला ऑपरेशन हॉलला लागूनच असलेल्या खोलींत नेण्यांत आलें. त्या खोलींत प्रोफेसर आणि इतर डॉक्टर हात धुवून स्वच्छ करीत उभे होते.

गर्भारशीला गाडीवर घालून आणलें. गुंगी देणारी मिस् होप आपल्या आयुधांसहित येऊन टेबलाच्या उशाशीं उभी राहिली. रोग्याचें तोंड झांकून तनें गुंगीच्या औषधाचे थेंब त्यावर टाकायला सुरवात केली. रोग्याचा

श्वास प्रथम कष्टानें होऊं लागला. नंतर थोडयाच वेळांत ती शांत झोपीं गेली. एक–दोघांनीं तिच्या पोटाला जंतुध्न औषध लावलं. नंतर तिचें सबंध शरीर जंतुरहित कपडयांनीं झाकून टाकलें. प्रोफेसर टेबलाच्या डाव्या बाजूला उभे राहिले. त्यांच्या पाठीमागें इतर डॉक्टर, मदतनीस आणि टाके घालणारी नर्स ही मंडळी उभी राहिली. प्रोफेसरांनीं व्यवस्थितपणें पोटाचा छेद घ्यायला आरंभ केला. हत्यारांसाठीं हात झटाझट पुढें येऊं लागले आणि सिआओ–शेन भराभर हत्यारें देऊं लागली.

गर्भाची पिशवी उघडण्यांत आली. आणि तींतून एक लहानसें केसाळ डोकें बाहेर दिसूं लागलें. क्रमाक्रमानें खांदे, शरीर, पाय बाहेर आले. अखेरीस संपूर्ण मूल बाहेर आलें.. प्रोफेसर डीन बरींच वर्षें चीनमध्यें वास्तव्य करून असल्यामुळें चिनी लोकांचा दृष्टिकोन त्यांना चांगला समजत होता. त्यांनीं लगेंच मुलाला उलटें करून पाहिलें. ते म्हणाले, "भले शाबास. मुलगा आहे. जनरल शांगना वारस मिळाला तर–"

आपल्या हाताखालच्या माणसाकडे वळून ते म्हणाले, "घेऊन जा याला. अन् हालचाल चालूं करा." त्या डॉक्टरानें त्या अर्भकाला प्रथम ऊन पाण्यांत बुचकळून काढलें. नंतर गारपाण्यांत. घशांत बोट घालून घसा मोकळा केला. बालकानें चेहरा वांकडा केला. तोंड उघडलें आणि एकदम मोठयानें टाहो फोडला.

"भावी सेनापति रडताहेत." बाईच्या पोटाला टाके घालतां घालतां प्रोफेसर डीन स्वतःशींच हंसून म्हणाले.

सिआओ–शेननें अभिमानानें त्यांच्याकडे पाहिलें. ती मनांत म्हणाली, "वैद्यक शास्त्रांत शस्त्रक्रियेचा वाटा किती महत्त्वाचा आहे ! मला ऑपरेशन करण्याची संधि मिळेल तेव्हांच मी खरी डॉक्टर झालें असं मला वाटेल. सर्जन झाल्याशिवाय मला समाधान वाटणार नाहीं."

● ●

– अखेर तिच्या परीक्षेनंतरचा पदवीदान समारंभाचा दिवस उजाडला एकदांचा ! तेवीस भावी डॉक्टरांच्या दृष्टीनें त्या दिवसाचें फार महत्त्व होतें. बाकीचे त्यांच्या बरोबरचे तीन चतुर्थांश विद्यार्थी वाटेंत कुठें ना कुठें तरी

गळून गेले होते.

प्रेक्षागारांत अगदीं पुढच्या रांगेंतल्या खुर्चींवर ती अस्वस्थ मनानें बसली होती. डॉ. हू पिन यांनीं काय भाषण केलें त्याकडे तिचें लक्ष गेलें नाहीं. कारण तिला एकाकी वाटत होतें. तिची एक वर्गमैत्रीण तिच्या बरोबर पास झाली होती. तिची आई सकाळींच तिथें आली होती. आणि तिनें सकाळपासून तिचें असें कांहीं कौतुक चालवलें होतें कीं सुमार नाहीं. मुलीची केशरचना केली. तिचे कपडे पाहिले. मुलीच्या विषयीं तिला इतका अभिमान वाटत होता कीं त्या दिवशीं रात्रीं मोठ्या मेजवानीसाठीं सारा गोतावळा तिनें बोलावून घेतला होता. पण सिआओ-शेनचें कौतुक करायला कोणी आलें नव्हतें. तिची एकहि आत्या तिथें हजर नव्हती.

व्यासपीठावर जाऊन पदवी घेणाऱ्यांत ती तिसरी होती. पदवी घेऊन ती पुन्हां खुर्चीवर येऊन बसली, तरी एकलेपणाची जाणीव तिच्या मनांत इतकी तीव्र होती कीं, आपण खरोखरीच आतां डॉक्टर झालों आहों हें तिला पटेचना.

नंतर डॉक्टर कॉक्रेन बोलूं लागले. जणूं काय ते फार लांबून कुठून तरी बोलत असल्यासारखें तिला वाटलें. गंभीरपणानें ते म्हणत होते, "प्रत्येक वर्षीं मरहूम डॉ. टॉमस बेनहॅम यांच्या मृत्युपत्रांतील नियमांनुसार द्यावयाच्या बक्षिसासाठीं विद्यार्थ्यांची निवड करण्याची येथील अधिकारी वर्गाची वहिवाट आहे. निवड करतांना अभ्यासांतील प्रगति, पेशाला साजशी वृत्ति आणि सर्वसाधारण व्यक्तिमत्त्व या गोष्टींचा विचार केला जातो. यावर्षीं हें बक्षिस डॉ. सिआओं-शेन वॉंग, यांना देण्यांत अधिकारीवर्गाला अत्यंत आनंद होत आहे."

कानठळ्या बसवून सोडणाऱ्या टाळ्यांच्या गजरांत यांत्रिकपणानें उठून एका हातानें आपला झगा आणि दुसऱ्या हातानें चौकोनी टोपी सांवरून धरीत ती व्यासपीठावर गेली. अत्यंत विनम्रपणानें अभिवादन करून ती हलकेंच म्हणाली, "आभारी आहें मी, प्रोफेसर."

या दुसऱ्या खेपेला मात्र परत खालीं उतरून येतांना टाळ्यांवर टाळ्या देत असलेल्या प्रेक्षकांच्या उत्तेजनाला उद्देशून कृतज्ञता व्यक्त करण्यासाठीं,

तिनें त्यांच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला. या वेळेस तिला त्यांचें दर्शन घडलें. ती बसली होती त्या खुर्चीच्या मागें दोनच रांगा टाकून तिचे आजोबा बसले होते.

धांवत पळत त्यांच्याकडे जावें असें तिला फार फार वाटलें. पण यावेळीं दुरूनच स्मित करणें भाग होतें.

वाँग-कुंग मनाचे मोठे पिळदार होते. पण अनेकवार धडपड करूनहि नातीच्या मताविरूद्ध वागण्यांत त्यांना कधींच यश आलें नव्हतें.

समारंभ संपल्यावर, डोक्यावरची शिप्तरवजा टोपी आणि पायांतले उंच टांचेचे बूट ह्याच्यांत स्वत:ला कसें तरी सांवरीत ती एका हातांत पदवीचा कागद आणि दुसऱ्या हातांत बक्षीसाचें पाकीट धरून आपल्या आजोबांच्याकडे अडखळत, धडपडत गेली.

" कित्ती कित्ती आनंद वाटला म्हणून सांगूं, आजोबा ! शेवटीं तुम्ही आलांतच ! चला, आमच्या प्रोफेसरांची अन् तुमची ओळख करून द्यायला हवी मला ! " ती म्हणाली.

" छट् ? " ते म्हणाले, " त्या परक्या प्रोफेसराला मी नाहीं भेटणार."

" आजोबा. " ती स्तंभित होऊन म्हणाली, " असं कसं हो करतां तुम्ही ? "

यावर खालच्या मानेनें ते म्हणाले, " बरं तुझ्या मनासारखं होऊं दे. तुझ्या लहरीप्रमाणें मला नाचायला लावण्याची तुझी शामत आहे खरी."

हंसणाऱ्या, खिदळणाऱ्या जनसंमर्दातून तिनें त्यांना प्रोफेसर डीन यांच्याकडे नेलें आणि दोघांची ओळख करून दिली. प्रोफेसरांनीं हंसून हस्तांदोलन करीत म्हटलें, " आनंद झाला तुम्हांला पाहून, डॉक्टर ! आमचा एक रोगी उलटयांनीं दगावणार होता. त्याला तुम्ही जीवदान दिलेंत. बरेच दिवस आम्ही तुमची कीर्ति ऐकून आहों. "

डॉ. वाँगना आश्चर्य वाटलें. पाश्चात्य डॉक्टर इतका साधा आणि स्नेहशील असूं शकतो याचा त्यांना कमालीचा विस्मय वाटला. परस्परांवर स्तुतिसुमनें उधळीत ते दूर झाले.

नंतर सिआओ-शेन त्यांना म्हणाली, " आजोबा आज रात्रीं मेजवानीचा

बेत आहे. मला दोन पास मिळाले आहेत. तुम्ही आणि – आणि काय आज माझे पाहुणे बरं का – ''

निदान आजच्या दिवशीं तरी तिला दुखवण्याची त्यांची इच्छा नव्हती. पण कायचे नांव ऐकतां क्षणींच त्यांचा चेहरा बदलला. त्यांच्या कपाळावरच्या शिरा ताठरल्या. त्यांना राग आला होता. पण त्यांनीं मोठ्या कष्टानें ओठ घट्ट दाबून धरले. आवंढा गिळल्यासारखें केलें आणि वरवर हंसून ते म्हणाले, ''पोरी तुला ठाऊक आहे नं कीं मला बाहेरचं जेवण सोसत नाहीं. जेवणाचा आग्रह नको करूं मला. त्याऐवजीं तुझं सगळं इस्पितळ मला पाहून येऊं दे. आतां आलोंच आहे इथें तर पाहून जाईन.''

''बरं तर''– ती म्हणाली, ''आपण मुकाटयानें इथून बाहेर पडूं. हें कपडे आधीं बदलतें आणि माझा नेहमींचा गणवेष घालतें. पहा नं, ही चौकोनी टोपी अन् हा झगा किती त्रासदायक आहेत. थांबा.''

आपल्या वसतिगृहांत गेल्यावर भेटायला येणाऱ्या पुरुष मंडळीसाठीं जो दिवाणखाना होता तिथें त्यांना बसवून ती म्हणाली, ''तुम्ही इथंच थांबा हं. मी आत्तां आलेंच पांच मिनिटांत.''

खोलींत कपडे बदलतांना बाहेरून नोकराचा आवाज तिला ऐकूं आला. ''डॉ. वाँग, फोनवर बोलावलंय्.''

धडधडत्या छातीनें तिनें दाराच्या फटींतून ओरडून म्हटलें, ''आलेंच, एक मिनिट.''

टेलिफोन तोंडाला लावून ती हलकेंच म्हणाली, ''हॅलो !''

कायचा आवाज तिच्या कानांवर आला. ''हॅलो ! अभिनंदन ! तूं आपल्या बरोबरच्या सर्व विद्यार्थ्यांना मागें टाकलंस. हें वृत्त घरांच्या छपरावरून ओरडून सांगावं असं वाटतंय् मला ! कसं तुला जमतं, देव जाणे ! पण मला तुझं कौतुक वाटतं.''

''आभारी आहे मी तुमची, काय ?'' मंजुळ आवाजांत ती म्हणाली, ''मला मिळालेल्या बक्षिसापेक्षां तुम्हांला आनंद वाटला याच्यांत मला फार समाधान आहे. पण माझं ऐकतां कां थोडं ? माझे आजोबा अवचित आले आहेत. आणि आत्तां ते माझ्याबरोबरच आहेत. त्यांना इस्पितळ पाह्यचं

आहे. मला त्यांना हिंडून दाखवणं भाग आहे. पण जेवणाच्या अगोदरच ते जाणार आहेत. तुम्हांला मात्र आपलं ठरल्याप्रमाणें जेवायला आलं पाहिजे बरं कां –"

पांढरा शुभ्र गणवेष चढवून जेव्हां ती हॉलमध्यें आली तेव्हां आजोबांनीं तिच्याकडे रोखून पाहिलें. "पोरी आश्चर्य आहे! हा त्या लोकांचा विचित्र पोषाखसुद्धां तुला खुलून दिसतो. पांढरा रंग म्हणजे सुतकांत वापरण्याचा. हाच रोज घालतेस कां ?"

"होय आजोबा. काम करतांना, जेवतांना अन् झोपतांना देखील हाच –"

बरोबरीनें नात आणि आजोबा वॉर्डविार्डांतून हिंडूं लागलीं H. III वार्डात तीं शिरलीं. तिनें त्यांना एका खाटेजवळ नेलें; मच्छरदाणीचे पडदे बाजूला करून, एक रोड झालेला रोगी तिनें त्यांना दाखवला. रोगी कृश झालेला होता, तरी पोटीशी आलेल्या स्त्रीप्रमाणें त्याचें पोट तुंब झालें होतें.

"आजोबा, याला तपासून काय रोग आहे तें सांगाल कां मला ?" ती म्हणाली. त्यांनीं एक खुर्ची खाटेजवळ ओढून घेतली. तीवर बसून त्यांनीं रोग्याच्या उजव्या हाताचें मनगट आपल्या हातांत धरलें. त्याची नाडी पाह्यला त्यांनीं सुरवात केली. उजव्या हातानें डाव्या हाताची आणि डाव्या हातानें उजव्या हाताची नाडी तपासली. नाडीचे ठोके शांतपणानें मोजले. प्रत्येक नाडी प्रथम हलक्या हातानें, नंतर थोडा दाब देऊन, तिसऱ्या खेपेस आणखी थोडा दाब देऊन पुनः पुनः तपासून पाहिली. डाव्या हाताच्या नाडीच्या एका भागांत त्यांना विकृति जाणवली. तपासून झाल्यावर त्यांनीं वर मान करून पाहात म्हटलें. "त्याचें यकृत बिलकूल काम देत नाहीं. मर्यादेबाहेर मद्यपान केलें आहे यानें तरुणपणीं."

"आजोबा, कसं हो समजलं तुम्हांला ? प्रयोग शाळेंत अनेक कसोट्या वापरून आम्हीहि नेमकं हेंच निदान केलं आहे. पण तुम्हांला फक्त नाडीला बोट लावून समजलं."

नंतर दुसऱ्या एका खाटेजवळ ते गेले. इथेंहि तोच प्रकार, त्यांनीं ताबड-तोब निदान केलें. एकदम अचूक. वॉर्डावॉर्डांतून हेंच घडत गेलें. सिआओ-शेन

चकित झाली. हातांत स्टेथॉस्कोप नाहीं, दुसरें कसलेंहि साधन नाहीं, असें असून आजोबा रोगाचें निदान बरोबर करतात, हें पाहून तिला अतिशय नवल वाटलें.

अखेरीस ती नम्रभावानें म्हणाली, "आजोबा, मला तुमचा फार अभिमान वाटतो."

"मलाही तुझा अभिमान वाटतो, पोरी." वृद्ध डॉक्टरांनीं प्रत्युत्तर केलें.

७ ७

पदवीदानाच्या दुसऱ्या दिवशीं तिला वरच्या जागेवर नेमण्यांत आलें. प्रसूति आणि स्त्रीरोग चिकित्सा ह्या विभागाची रेसिडेण्ट फिझिशन म्हणून तिची नेमणूक झाली. मध्यें सुटी नव्हती आणि तिचा पोषाखही जुनाच होता. म्हणजे पांढरा शुभ्र गणवेष आणि कॅनव्हासचे बूट. पण आतां तिच्या हाताखालीं शेवटच्या वर्षांचे विद्यार्थी कामाला मिळणार होते. तसें तिचे काम हलकें होतें. आणि ओळीनें पांच दिवस काम झाल्यावर सहाव्या दिवशीं तिला रात्रीची सुटी असे. त्या दिवशीं घरीं तरी जावें किंवा कायबरोबर हिंडावें. कांहींहि करायला ती मोकळी होती.

पावसाळ्यानंतरचे निरभ्र दिवस होते. पितरांचें देऊळ आणि मध्यवर्ति उद्यान दोन्हीं ठिकाणीं फुलांच्या रंगांनीं इंद्रधनुष्यांवर कडी केली होती. एके दिवशीं संध्याकाळीं जेवण उरकल्यावर काय आठच्या सुमारास इस्पितळांत आला. त्याची वाट पहात ती तेथें उभी होती. इस्पितळाच्या लांबच लांब पायऱ्या उतरून येणाऱ्या तिचा रेशमी वस्त्रानें लपेटून घेतलेला वेली-सारखा देह हलतांना पाहून त्याला ती रोजच्यापेक्षां जास्तच सुंदर आणि मोहक भासली. नुसतेंच सौंदर्य नाहीं तर बुद्धिमत्ता आणि उच्च ध्येयवाद ह्या दोन गुणांनीं तिच्या आकर्षकपणांत भर टाकली होती. आपल्या या अपार भाग्याची त्याला पूर्वी पुसटती कल्पनाहि आली नव्हती. आपल्यासाठीं ती मनाला हुरहुर लावून घेईल याची त्याला पूर्वी शंका देखील कधीं आली नव्हती.

तीं दोघें मध्यवर्ती उद्यानांतून रमत गमत हिंडूं लागलीं. फिरतां फिरतां वाटेंत एका संगमरवरी दगडावर तीं बसलीं. जमिनीवर चांदणें ओघळलें

होतें. वेली वाऱ्याच्या लहरींवर नाचत, डुलत होत्या. सिआओ–शेन थोडी त्याच्या जवळ सरकली. चुकून तिच्या केसांचा कायच्या गालाला स्पर्श झाला. त्या स्पर्शानें कायचें हृदय उचंबळून आलें. त्याचें सर्वांग थरारलें. दबकत, दबकत हळूंच त्यानें आपला डावा हात तिच्या खांद्यावर ठेवला. तिनें आपलें तोंड त्याच्याकडे वळवलें. ओठांवर ओठ टेकले. प्रथम बुजरेपणानें. नंतर आवेगानें. चांदण्याच्या प्रकाशांत त्यांनीं एकमेकाला न्याहाळून पाहिलें. सिआओ–शेन त्याला घट्ट बिलगली. एकमेकाला घट्ट धरून तीं बराच वेळ त्या चांदण्यारात्रीं तिथें बसून राहिलीं. स्वच्छ चांदणें, पक्ष्यांचें कूजन आणि अलगुजाचा मधुर स्वर त्यांच्या निःशब्द प्रेमाला साथ देत होते.

● ७

सिआओ–शेन लवकर उठली. खाणें झटपट उरकून घेऊन ती आपल्या अत्यंत आवडत्या कामाला लागली. नर्सरीमधील अर्भकें तपासून पाहण्याचें काम तिला भारी आवडे. हिरव्या साबणानें तिनें आपले हात स्वच्छ धुतले. गणवेष चढविला आणि नर्सरीचें कांचेचें दार ढकललें. पाळण्या पाळण्यांतून बालकांना तपाशीत ती निघाली. चौदाव्या पाळण्यांतलें मूल रडत होतें.

" हिला कांहीं तरी होतंय– " तिनें नर्सला उद्देशून म्हटलें.

" कांहीं होत नाहीं तिला. रडकीच आहे ती. दूध पाजलं तरी रडणं थांबत नाहीं. " नर्सनं तुच्छतेच्या सुरानें म्हटलें.

यावर सिआओ–शेन म्हणाली, " तसं म्हणण्यांत अर्थ नाहीं. पोटांत गेल्यावरहि मूल रडूं लागलं तर ते आजारीच असलं पाहिजे. "

ओरडणाऱ्या मुलाला तिनें हलकेंच उचलून घेतलें. पोरीचे हातपाय लोंबकळूं लागले आणि तिच्या हातापायाला स्पर्श होतांच ती किंचाळूं लागली. " मला वाटलंच ! मुलीचं खरोखरीच कांहीं तरी दुखतंय्. तिच्या हातापायांना कांहींतरी झालंय. एक्स रे काढून घ्यायला हवा. " तिनें हुकमी आवाजानें म्हटलें, आणि एक्सरे काढण्यासाठीं कागद लिहून दिला.

सकाळच्या फेरीच्या वेळीं तिनें प्रोफेसर डीन यांना नर्सरीजवळ थांबवून घेतलें आणि त्यांना एक्सरेचे फोटो दाखविले. त्यांनीं कष्टी मुद्रा करून मान हलवली आणि म्हटलें, " बिचारीला मुडदूस रोग आहे. जन्मतःच आहे.

तिचीं हाडं इतकीं ठिसूळ आहेत कीं, नुसता हात लावला तरी त्यांचा भुगा होईल. बरं आईची काय माहिती आहे ? ”

तिनें पटकन् उत्तर केलें, “ ही मुलगी त्या कुटुंबांतील नववी आहे. आई एकेचाळीस वर्षांची असून सहाव्या खेपेपासून तिला क्षारांच्या अभावामुळें मद्वस्थीचा रोग जडला आहे. मुलीचा बाप गरीब असून रिक्षा ओढण्याचा धंदा करतो. कुटुंबाला चांगलें अन्न देणें त्याला शक्य नाहीं. गर्भार असतांना आईला वा़ताचे झटके येत असत. आपल्याला ह्या पोरीला स्प्लिंटनीं बांधून ठेवली पाहिजे. जीवनसत्व अन् दूध भरपूर प्रमाणांत द्यायला हवं.”

कर्तव्याचा एक भाग म्हणून ती आईला समजावून सांगायला गेली. निर्विकार मुद्रेनें त्या बाईनें सगळें शांतपणानें ऐकून घेतलें आणि म्हटलें, “ अशी जर ही पोरटी तापदायक असेल तर मला ती नकोच. ”

सिआओ-शेन स्तंभित होऊन म्हणाली, “ असं बोलवतं तरी कसं तुम्हांला ? ” जुनें वस्त्र फेंकून द्यावें इतक्या सहजपणानें आई मुलीला सोडायला राजी होते हें पाहून तिला अतिशय वाईट वाटलें.

त्या बाईनें संथपणानें उत्तर केलें, “ आई असतां तुम्ही म्हणजे कळलं असतं. आठ पोरटीं घरीं आहेंत माझ्या असलीं. पहिलं पोरटं जन्माला आलं त्या दिवसापासून एक क्षणभर कांहीं विसावा मिळाला नाहीं मला. दरवर्षींचा पाळणा. त्यामुळं माझं सत्त्वच खलास झालं आहे. या पोरीचा अजून मला फारसा लळा लागला नाहीं म्हणून म्हणतें कोणालाहि देऊन टाका तिला. ”

सिआओ-शेनच्या मनांत विचार आला कीं, आपल्यालाहि मुलें झालीं पाहिजेत. जन्मभर आपण वाँग म्हणूनच राहावें या आजोबांच्या इच्छेला मान तुकवायची नाहीं. मग त्यांना कांहीं वाटो.

आपल्या नातीनें वैद्यकांत केलेली प्रगति पाहून वाँग कुंग अतिशय आनंदांत होते, पण तिच्या या प्रेमप्रकरणामुळें ते दिवसेंदिवस अधिकाधिक कष्टी होत होते. मोठा अवघड प्रश्न होता हा. काय करावें हें त्यांना कळत नव्हतें. अडचणीच्या वेळीं तें ज्याच्यावर विसंबून रहात त्या शांग-आनला त्यांनीं बोलावून घेतलें.

वसंतऋतूंतल्या सरी थांबल्या होत्या. तिन्ही चौकांतून फुलें डंवरलीं होतीं. जेवण झाल्यावर शांग-आननें मालकांची आवडती वेताची खुर्ची बाहेर आणून पुष्करिणीच्या शेजारीं ठेवली. तीवर आरामांत पडून डॉक्टरसाहेब घोट घोट चहा पिऊं लागले.

दुसऱ्यांदा शांग-आन चहा घेऊन बाहेर आला तेव्हां त्यांनीं त्याला खुर्ची घेऊन येऊन तीवर आपल्या शेजारीं वसवून घेतलें. मालकांशीं बोलतांना नेहमीं उभें रहाण्याची संवय जडलेला शांग-आन त्या स्टुलावर वसला खरा पण त्याला तें बसणें फार अवघड वाटत होतें. खुर्चीच्या अगदीं टोंकाला टेकून तो वसला.

वाँग-कुंगनीं घसा साफ करून म्हटलें, "माझ्याबरोबर रहायला मागल्या अंगणांतून ह्या पुढल्या अंगणांत आल्यापासून माझी नात म्हणजे माझ्या मनावर एक मोठं ओझंच झालेलं आहे हें तुलाहि दिसतंय. मुलीला वाढवणं हें पुरुषाचं काम नाहीं हें मी जाणून आहें. आणि म्हणून अनेक वेळां माझ्या मनांत येतं कीं तिची आजी असती तर फार बरं झालं असतं."

शांग-आननें आपले तुळतुळीत डोकें हलवून संमति दिली आणि तो स्टुलावर चुळबुळला.

"पण धनी," तो म्हणाला, "तुम्ही बाईसाहेबांचं एवढं देखील कमी पडूं दिलं नाहीं. त्या कांहीं सामान्य मुलीसारख्या नाहींत. त्यांचं आपण कौतुक करायला हवं. त्यांचा कधीं त्रास झाला आहे आपल्याला, किंवा होईल असं मला वाटत नाहीं."

वाँग-कुंगनीं भुंवया वर चढवून म्हटलें, "अभ्यासांत तिनें चांगली प्रगति दाखविली आहे, हें अगदीं खरं आहे. तिच्यासारख्या शिकलेल्या मुली आपल्या देशांत फार थोड्या सांपडतील. आणि म्हणूनच मला वाटतं, तिनं आपलं सारं आयुष्य या पेशाला वाहून द्यावं."

नोकर मालकांना म्हणाला, "क्षमा करा मला. पण मी बोलण्याचं धाडस करतों. बाईसाहेब डॉक्टर झाल्या तरी स्त्रीच आहेत. मुलगी योग्य वयाची झाली कीं तिचं लग्न करायलाच हवं."

"पण म्हणून तिनें एका वेड्याची निवड करायला नको होती कांहीं."

वाँग-कुंग म्हणाले.

शांग-आननें आपली थोटीं वोटें टकलावरून फिरवलीं. त्याला कपाळावर... आठ्या दिसूं लागल्या. वेडयाच्या इस्पितळांतल्या मनोविकार... म्हातारीनें त्याला सांगितलें होतेंच. आत्तां त्याला (मनकुंच्या मनाला... कसल्या इंगळ्या लागून राहिल्या होत्या तें समजलें. एकाएकीं त्याचे डोळे लकाकूं लागले. तो ताडकन् उठून म्हणाला, "धनी, मला एक सुचवायचंय्. बाईसाहेबांना आणखी पुढें शिकायला अमेरिकेला कां धाडीत नाहीं ? म्हणजे त्यांना या माणसाचा विसर पडेल. त्याच्यापासून त्या दूर गेल्या म्हणजे त्यांना चांगला विचार करतां येईल. दुसऱ्या कोणाची त्यांनीं पुढें निवड केली तर ठीकच झालं. लग्नच करायचं नाहीं म्हणाल्या तर मग आपल्या इच्छेप्रमाणेंच होईल."

वाँग कुंगची मुद्रा प्रसन्न दिसली. क्षणभर विचार करून ते म्हणाले, "चांगली कल्पना आहे तुझी. तिला अमेरिकेलाच धाडून देतों."

वाँग कुंगनीं जेव्हां तिला आपला बेत सांगितला तेव्हां ती धाय मोकलून रडली. आपल्याला दूर कां पाठवीत आहेत हें तिला समजून चुकलें. या खेपेस मात्र आजोबांनीं तिच्यावर मात केली होती. पण त्यांचा बेत इतका बिनतोड होता कीं तिला स्पष्ट नकारहि देतां येईना. कारण डॉक्टरी विद्येचा तिला जास्त अनुभव मिळणें अमेरिकेंत शक्य होतें. पण हें कायला कसें सांगणार ?

तिला इस्पितळांतल्या जागेचा राजीनामा देऊन परदेशगमनाची तयारी करायला लागणें अवश्य होतें. तिनें कायला पत्र लिहून ही दुःखदायक बातमी निवेदन केली आणि अमुक दिवशीं, अमूक वेळेला मध्यवर्ती उद्यानांत, पुष्करिणीच्या शेजारीं आपल्याला भेटण्याविषयीं आर्जवून लिहिलें.

तिच्याहि आधीं तो तिथें हजर होता. उद्यानाच्या मध्यभागीं संगमरवरी फरशीच्या कडेशीं तो बसलेला तिला आढळला. तिला पाहतांच तो उठून तिच्याकडे धावत आला. दोघांनीं परस्परांना कडकडून आलिंगन दिलें. दोघांपैकीं कोणीही एक शब्द बोललें नाहीं. गवताचीं पातीं जशीं वाऱ्याच्या लहरीनें थरथरावींत तशीं थरथरत तीं दोघें उभीं राहिलीं.

सिआओ-शेननें स्वत:ला सांवरलें. तिनें कायला हाताला धरून पायरी-जवळ नेलें. दोघेंहि एकमेकाला बिलगून बसून राहिली. कांप-या आवाजानें ती म्हणाली, "तुम्ही जवळ असलांत म्हणजे स्वर्गांत असल्यासारखें वाटतें."

त्याला बोलतां आलें नाहीं. त्यानें तिच्याकडे पाहिलें. त्याच्या नेत्रांत स्निग्धमधुर प्रेमाची भावना तरळत होती. त्याची ती भावनेची गाढता पाहून तिचें हृदय हेलावलें. तिच्या मनांत आलें कीं, इतक्या उत्कटपणानें एखाद्या-कडून प्रेम करून घेणें फार भाग्याचें आहे !

आणि एकदम त्यांना जाणवलें कीं त्यांची अखेरची भेट होती. कायनें तिला आपल्या हृदयाशीं आवळून धरलें. तिनें मुळींच प्रतिकार केला नाहीं. तिच्या डोळ्यांतून अश्रु ओघळूं लागले. ती स्फुंदूं लागली. तिनें रडूं थांबवण्याचा प्रयत्न केला नाहीं. कायपासून आपल्याला दूर जावें लागतें आहे ह्यापेक्षां वेगळ्या अशा एका गूढ कारणासाठीं आपण रडतों आहों तें तिला जाणवत होतें पण कां तें तिला उमगेना.

काय स्वत:च दु:खी कष्टी असल्यामुळें तिचें सांत्वन करूं शकला नाहीं. पुन: पुन: तो म्हणूं लागला, "आपण पुन्हां भेटूं. खात्रीनें आपली पुन्हां भेट होईल."

पण तिला एक अक्षर बोलतां येईना. कदाचित् जीवनाचे प्रवाहच आपली कायमची ताटातूट करतील आणि जणूं तसेंच व्हायचें होतें म्हणूनच कीं काय एकदम शहर युद्धाच्या धुमश्चक्रींत सांपडलें. ७ जुलैला सकाळीं जपान्यांनीं एकाएकीं हल्ला चढविला. डोळे विस्फारलेला शांग-आन धापा टाकीत ही बातमी घेऊन धांवत आला. आजोबांना सांगण्यासाठीं ती धांवली.

तिनें आर्जवून म्हटलें, "आतां कदाचित् माझी इथें गरज लागेल. मला राहूं द्या ना इथेंच."

परंतु लढाईच्या संभाव्यतेची कुणकुण यापूर्वीच त्यांच्या कानांवर आली होती. आतां युद्धाला प्रत्यक्ष तोंड लागल्यावर तर लांब सुरक्षित ठिकाणीं तिला धाडून देणें त्यांना अधिक जरूरीचें वाटूं लागलें. ही सुंदर आणि बुद्धिमान नात हाच काय तो त्यांचा ठेवा उरला होता.

त्यांनीं स्पष्टपणानें नकार देऊन म्हटलें, "तुला गेलेंच पाहिजे. मी तुला इथें राहूं देणार नाहीं."

● ● ●

भाग तिसरा

तिसऱ्या प्रहरीं साडेतीनच्या सुमाराला ॲन् आरबर (मिशिगन) स्टेशनांत गाडी शिरली. सिमाओ-शेन प्लॅटफॉर्मवर उतरली. अमेरिकेमधील एका अनोळखी शहरांत आपण एकटें आहोंत ही कल्पना मनांत येऊन तिला बेचैन वाटलें आणि ती गोंधळून गेली. एक तरुण चिनी पुढें झाला, आणि सभ्यपणानें तिला विचारूं लागला, "आपणच डॉ. वाँग काय ?"

"हो, मीच सिआओ-शेन वाँग," तिनें उत्तर केलें.

"माझं नांव शेन. ॲन आरबरमधील चिनी विद्यार्थ्यांचा मीं प्रतिनिधि आहे. आम्हा सर्वांतर्फे तुमचं स्वागत करायला मी आलों आहें," त्यानें म्हटलें.

त्यानें तिच्या सुटकेसेस मोटारीपर्यंत न्यायला तिला मदत केली. दोन्ही बाजूला दुकानें असलेल्या एका ऐसपैस रस्त्यानें त्यांची मोटार जाऊं लागली.

"मिशिगन युनिव्हर्सिटी कुठें आहे ?" तिनें विचारलें.

"युनिव्हर्सिटींतूनच आपण चाललों आहों."

"पण नांवाची पाटी कुठें दिसली नाहीं ती ?"

तो हंसून म्हणाला, "तुम्हांला चीनमधल्या विश्वविद्यालयांची संवय आहे. तिथें युनिव्हर्सिटीच्या आवाराभोंवतीं उंच उंच भिंती असतात. फाटकावर नांवाची मोठी पाटी असते. पण ही अमेरिका आहे. इथं नव्या कल्पनांची तुम्हांला संवय करून घ्यावी लागेल. इथल्या विश्वविद्यालयाच्या इमारती शहराच्या निरनिराळ्या भागांतून पांगलेल्या असतात."

दुसरें दिवशीं सकाळीं ती आपलें नांव नोंदवून घ्यायला युनिव्हर्सिटीच्या इस्पितळांत गेली. त्या भव्य आवारांत या इमारतींतून त्या इमारतीकडे पायीं

रखडत जातांना तिला आजोबांच्या खुर्चींची आठवण झाल्यावांचून राहिली नाहीं. निदान रिक्षा तरी हवी होती. मेडिकल कॉलेजच्या डीनची तिनें गांठ घेतली. त्यांच्याशीं विचार विनिमय करून, कोणता कोर्स घ्यायचा तें निश्चित करून, ते विषय शिकवण्याची सोय असलेल्या निरनिराळ्या इमारतींत ती रस्त्यानें पत्ता विचारीत हिंडून आली. संध्याकाळीं ती पार थकून गेली.

तीन आठवड्यांच्या अभ्यासानंतर सिआओ-शेन कंटाळून गेली. तिनें पुन्हां डीनची भेट घेतली. त्या प्रेमळ वृद्ध गृहस्थाशीं बोलतांना तिला बिलकुल संकोच वाटत नसे. ती त्यांना म्हणाली, " डॉ. इंग्लंड, ह्या दोन तीन आठवड्यांत मी खूप निरीक्षण करून पाहिलं पण त्यांत शिकण्यासारखं नवीन असं मला कांहींच आढळून आलं नाहीं. मला पूर्वीचा अनुभव खूप आहे. चीन देशांत डॉक्टर थोडे अन् रोगी फार अशी परिस्थिती असल्यामुळें मी शिकत होतें तेव्हां देखील मला ऑपरेशनच्या वेळीं मदतीला जाऊं देत असत. मला इथें थोडेंच दिवस रहायचं आहे. आणि त्या वेळेचा मला जास्तींत जास्त उपयोग करून घ्यायला नको कां ? "

डोके खाजवीत त्यांनीं म्हटलें, " तुझं म्हणणं खरं आहे. डिग्रीनंतरचा अभ्यास करण्याची तुला संधि मिळाली पाहिजे. "

यानंतर मेडिकल कॉलेजमध्यें तिचें नांव दाखल करण्यांत आलें. रोजची लेक्चर्स चालूं झालीं. लॅबोरिटरींत तिला काम देण्यांत आलें. दिवस भराभर जाऊं लागले.

● ●

– शुक्रवारीं परदेशचें टपाल येई. म्हणून तो दिवस फार महत्त्वाचा. आज तर ती उत्सुकतेनें धांवतच आपल्या वसतिगृहाकडे गेली. उत्सुकतेनें कां तर मागच्या शुक्रवारीं एकहि पत्र न आल्यानें ती त्यावेळीं निराश झाली होती. डेस्कावर तिच्या नांवाच्या निळ्या तांबड्या कडा असलेल्या पाकिटांचा नुसता खच पडलेला तिला दिसला. तिनें खिडकी उघडून टाकली आणि पत्रांवरून ओझरती नजर टाकली. एक पत्र आजोबांचें होतें. दोन कायचीं. आणि एक तिच्या जुन्या वर्गमैत्रिणीनें धाडलें होतें. कायनें धाडलेलें पहिलें पत्र वाचतांना तिचे हात थरथरत होते.

" प्रिय सिआओ-शेन,

तुझीं पत्रें म्हणजे क्षुधिताला अन्न, अन् तृषिताला पाणीच होय. तूं म्हणतेस माझ्यावांचून तुला करमत नाहीं. देवाला ठाऊक, माझी काय अवस्था होत असेल ती ! आईचं पत्र आलें होतें. ती सुचौला माझ्या मावशीकडे असून तिचें बरें चाललंय.

मागच्या सप्टेंबर महिन्यांत मी पिकिंग सोडलें, तेव्हांपासून शांघायमध्यें आहे. एका सेनेचें अधिपत्य माझ्याकडे आलें आहे. शाळा कॉलेजांतील पांच हजार विद्यार्थ्यांचें तें सैन्य आहे. "

दुसरें पत्र एक आठवड्यानंतर धाडलें असून त्यांत त्यानें म्हटलें होतें कीं, आतां, तो भूमिगत सेनेचा पुढारी बनला होता. शांघाय येथील बॉम्बवर्षाव, प्रेतांचा होणारा खच, लोकांचे होणारे हाल यांचीं त्यानें पत्रांतून केलेलीं वर्णनें तिला वाचवेनात. पत्रांत म्हटलें नव्हतें तरी त्याच्या जीवाला केवढा धोका आहे, हें तिला समजून आलें. त्या दिवसापासून त्याच्या सुरक्षितपणाविषयीं तिच्या मनांत भीति ठाण मांडून राहिली.

नंतर एकदां कायच्या एका पत्रांतून तिला त्याच्या आईच्या मृत्यूची दुःखद वार्ता समजली. जपाननें सुचौवर टाकलेल्या बॉंबला ती बळी पडलेली होती.

आणि त्याच टपालांतून आजोबांचें पत्र आलें होतें. त्या पत्रांत शांग-आनच्या मृत्यूची बातमी होती. शांग-आन झटका येऊन एकाएकीं निवर्तला होता. पत्र उघडून वाचण्याच्या वेळीं ती प्रयोग शाळेंत होती. शेंकडों उंदीर, गिनी पिग, पिंजऱ्यांत ठेवलेले ससे आणि झोंपाळ्यावर झोंके घेणारीं माकडें यांच्या सहवासांत ती एकटीच तेथें उभी होती. दुर्दैवाच्या त्या दुहेरी फटक्यामुळें ती असहाय्य होऊन हमसाहमशीं रडली.

जून महिन्यांत एका शुक्रवारीं ती खोलींत आली तेव्हां पत्रांचा ढीग टेबलावर पडलेला तिला दिसला. झटकन् तिनें तीं पत्रें चाळून पाहिलीं. तीन पत्रें आजोबांनीं विमानमार्गें धाडलेलीं होतीं. पण कायचें त्यांत पत्र नव्हतें.

कालानुक्रमानें तिनें तीं पत्रें ओळीनें लावलीं. पहिलें पत्र ती वाचूं लागली –

" पोरी, कांहींहि झालें तरी या उन्हाळ्याच्या सुट्टींत चीनला परत

येऊं नकोस. अमेरिकेंत आणखी एक वर्ष काढ. इथें लढाईचा मामला फार भयंकर आहे. आणि शत्रु सैन्यानें व्याप्त केलेलें पिकिंग तुला राहायला योग्य नाहीं. तूं इकडे येऊं नकोस म्हणून मी सांगतों याचें दुसरें एक कारण आहे. आणि तें म्हणजे कायच्या संबंधींचें – आणि इथेंच पत्र तुटलें होतें. घाईघाईनें तिनें दुसरें पत्र फोडून पाहिलें. पहिल्या पत्रापेक्षां या पत्रांतील भाषा जरा जास्त कडक होती. यांत तिला अमेरिकेंत राहण्याचा हुकूम होता. आर्जव नव्हतें. मात्र कायविषयीं अवाक्षरही नव्हतें.

रडकुंडीस येऊन तिनें तिसरें पत्र उघडलें. त्यांत लिहिलें होतें –

" हें पत्र वाचतांना मन घट्ट कर. तुला एक फार वाईट बातमी मी सांगणार आहें. ती ऐकून तुला धक्काच बसेल याची मला जाणीव आहे. पण आपल्या आयुष्यांत उमज न पडणाऱ्या ज्या अनक गोष्टी असतात त्यांचाच तो भाग आहे असें समज.

" एप्रिलच्या २३ तारखेला काय वारला. दोन आठवड्यापूर्वीच्या व गेल्या आठवड्यांतल्या पत्रांत मीं तुला हें सांगण्याचें ठरवलें होतें. पण तुझ्याबरील निःसीम मायेनें मला दोन्ही वेळेस धीर झाला नाहीं. तुला हें ऐकून फार दुःख होईल, याची मला खात्री आहे.

तुला माहीतच असेल कीं काय भूमिगत सैन्यांतील एक बडा हपीसर होता. त्यामुळें जपानी लोक त्याला केव्हां ना केव्हांतरी हुडकून काढणार आणि कैद करणार हें उघड होतें. त्यालाहि याची जाणीव होतीच. पण जीव धोक्यांत घालण्यास तो राजी होता. तो पकडला गेला आणि त्याच्यावर प्रश्नांचा भडिमार करण्यांत आला. अर्थात् त्यानें आपल्या भूमिगत सहकाऱ्यांची माहिती देण्याचें सपशेल नाकारलें. चार आठवड्यापूर्वी त्याला गोळी घालून ठार मारण्यांत आलें.

त्याच्या मृत्यूनंतर मला त्याच्या चारित्र्याची कल्पना आली याचें मला फार वाईट वाटतें. तुमच्या स्नेहाकडे मीं रोष दृष्टीनें पाहिलें याचा मला आतां पूर्ण पश्चात्ताप होतो आहे. मला क्षमा कर, पोरी. "

ती बिछान्यावर धाडकन् पडली. पडल्या पडल्या शून्यदृष्टीनें ती आढ्याकडे पाहूं लागली. हलकें हलकें वाचलेले शब्द एकामागून एक तिच्या

डोक्यांत घोळूं लागले.

"काय गेला–काय गेला," ती मोठ्यानें आक्रोश करूं लागली.

● ●

– जूनच्या मध्याला सिआओ-शेननें मिशिगन युनिव्हर्सिटीची पदवी पदरांत पाडून घेतली. रंगीत झगे घालून पदवी घेण्याला आलेल्या शेंकडों विद्यार्थ्यांत ती एकटीच चिनी विद्यार्थिनी होती, त्यामुळें अभिनंदनाच्या टाळ्या तिला जरा जास्तच मिळाल्या.

आजोबांनीं तिला पदवी घेतल्यावर न्यूयॉर्कला जाण्याची सूचना केली होती. तिथें त्यांच्या एका नातेवाईकाची आन-लीएन नांवाची नात रहात होती. तिच्याकडे जायला त्यांनीं सिआओ-शेनला सांगितलें होतें. मिशिगन विश्व-विद्यालयांत तिला प्रवेश मिळण्याची सर्व व्यवस्था तिच्यामार्फतच झालेली होती. मूळ शिकागो येथें रहाणाऱ्या पण पांच वर्षांपूर्वी न्यूयॉर्क येथें येऊन राहिलेल्या यॉंगतेह् नांवाच्या एका रेस्टॉरॉं मालकाशीं आन–लिएनचा विवाह झाला होता.

जड हृदयानें तिनें गाडींतून उतरून ग्रॅंडसेंट्रल स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर पाऊल टाकलें. आन-लिएन, यॉंगतेह् आणि त्यांची छोटी कन्या डॉली तिचें स्वागत करण्यासाठीं स्टेशनवर आलीं होतीं. दोन्ही स्त्रियांनीं पूर्वीच आपले फोटो एकमेकींना धाडले असल्यानें, गर्दींतून वाट काढीत सिआओ-शेन त्यांच्याजवळ येऊन पोंचण्यापूर्वींच त्यांनीं एकमेकींना ओळखलें. मान हलवून त्यांनीं परस्परांना अभिवादन केलें. पण त्या स्वागताचा आनंद मानण्याच्या मन:स्थितींत सिआओ-शेन नव्हती. त्या कुटुंबाजवळ गेल्यावर मात्र तिला जरा हलकें वाटलें आणि थोडयाच वेळांत डॉलीला तिनें आपल्या हातानें उचलून घेतली.

यॉंगतेह्नें मोटार वेगळ्या रस्त्यानें घेऊन सिआओ-शेनला न्यूयॉर्कचें पहिलें दर्शन मुद्दाम घडवलें. रॉकेफेलर सेंटर, झगझगाटांत न्हाऊन निघालेला ब्रॉडवे, अनेक ठिकाणें त्यानें तिला दाखवलीं. पण डॉलीशीं खेळण्यांत गर्क झालेल्या सिआओ-शेनचें तिकडे फारसें लक्ष गेलें नाहीं. अखेरीस बरीच लांब चक्कर मारून जेव्हां गाडी मॉट स्ट्रीटवर आली तेव्हां यांगतेह् म्हणाला, "आपण

आतां चायनाटाउनमधें शिरतों आहोंत." सिआओ-शेन उत्सुकतेनें खिडकी बाहेर डोकावून पाहूं लागली. चिनी पद्धतीचीं खाद्य पेयें, त्यांचीं जाहिरात करणारीं निऑनच्या विद्युतदीपांचा झगझगाट केलेलीं रेस्टोरां, तिनें पाहिलीं तेव्हां आपण आपल्या मायदेशांत आलों आहों असें वाटून हायसें झालें. वेअर स्ट्रीटवर गाडी वळली आणि एका तांबडचा दगडी इमारतीसमोर येऊन थांबली. तिसऱ्या मजल्यावरील पांच खोल्यांच्या ब्लॉकमध्यें यॉंग कुटुंब रहात होतें. खोल्या ऐसपैस होत्या. त्यांतील फर्निचर आधुनिक होतें आणि खोल्या छान सजविलेल्या होत्या.

त्या दिवशीं संध्याकाळीं यॉंगतेह्‌नें सर्वांना चिनी पद्धतीच्या मेजवानी-साठीं आपल्या रेस्टोरांमध्यें नेलें. तेथील व्यवस्था पाहून सिआओ-शेनला पिकिंगमधील आपल्या आजोवांच्या घराची आठवण झाली.

घरीं परत येण्याच्या वेळीं आन-लिएन सिआओ-शेनला म्हणाली, "डॉली अन् तूं एकाच खोलींत झोपाल·कां ?" हें ऐकून सिआओ-शेनला फारच समाधान वाटलें. डॉलीला न्हाऊं माखूं घालून ती बिछान्यावर झोंपवूं लागली तेव्हां डॉलीनें आपले चिमुकले हात वर करून तिला म्हटलें, "मावशी ग, आज रात्रीं तूं माझ्याजवळ झोपणार आहेस ?"

"होय, माझ्या राजा !"

"मग रोज इथेंच झोप कीं," डोळे मिटून घेतां घेतां डॉली, हलकेंच कुजबुजली.

सेव्हन्थ ॲव्हेन्यू लोकल बर्थ स्ट्रीट स्टेशनवर उभी राहिली. उताऱ्यांच्या घोळक्यांतून सिआओ-शेन बाहेर पडली. गार वारा सुटला होता. प्लॅटफॉर्म वरून चालत जातांना अंगांतला कोट तिनें घट्ट लपेटून घेतला. जवळजवळ तीन महिने ती त्या नातेवाईकांकडे पाहुणी म्हणून राहिली होती. आणि त्या अवधींत तिला दिवसेंदिवस जास्तच अवघड वाटूं लागलें होतें. आन-लिएननें आणि तिच्या नवऱ्यानें तिची वारंवार समजूत घालण्याचा प्रयत्न केला होता, तिच्या राहण्यामुळें त्यांना फार आनंद वाटत होता. शिवाय डॉलीला चांगली सोबत मिळाली त्यापुढें अन्नखर्चाची काय मातब्बरी आहे ? असेंही तीं नवरा-बायको म्हणालीं. तरी पण आपण दुसऱ्यावर अवलंबून आहोंत हें तिच्या

डोक्यांतून गेलें नाहीं. आपल्या मनावरचें ओझें दूर करण्याच्या हेतूनें तिनें उन्हाळ्याच्या सुटींत वेट्रेस मुली ज्यावेळीं रजेवर निघून जात त्यावेळीं स्वतः यांगतेहच्या रेस्टोरांमध्यें काम करण्याचा हट्ट धरला. मात्र सुट्टी संपल्यावर काम करीत राहून पर्यायानें एका बाईला बेकार बनविण्याचें तिनें सपशेल नाकारलें.

तिला डॉक्टरकीचा धंदा करावयाचा होता. पण तो परवान्याशिवाय करतां येत नव्हता. निरनिराळ्या इस्पितळांतून चाललेलें काम दुरून पाहायचें यापेक्षां जास्त तिला कांहींच करतां येत नव्हतें. आणि नुसतें हेंच करीत राहून तिच्या ज्ञानांत भर ती काय पडणार ? ”

● ●

१६८ व्या रस्त्यावर असलेल्या मेडिकल सेंटरवर रोज ती जमिनी-खालच्या रेल्वेनें जाऊं लागली. या ठिकाणीं अखेरीस तिला लॅबोरेटरींत काम करण्याची संधि मिळाली होती. डॉ. किंग हें प्रसूति आणि स्त्रीरोग चिकित्सा या विभागाचे प्रमुख होते. त्यांनीं तिचें कौशल्य झटकन् पारखून घेतलें. तिच्या कामाकडे ते आस्थेवाईकपणानें लक्ष पुरवूं लागले. लवकरच तिला ऑपरेशनच्या वेळीं मदतीसाठीं बोलावण्यांत येऊं लागलें. आणि फावल्यावेळीं, लॅबोरेटरींत काम करणाऱ्या तज्ज्ञांना अडचणीच्या प्रसंगीं मदत करण्याची तिला संधि मिळूं लागली.

एके दिवशीं एका अडलेल्या संशोधनांत तिनें शास्त्रीय दृष्टि वापरून तो प्रश्न सोडवून दाखवला, आणि संशोधन योग्य मार्गावर आणून सोडलें हें जेव्हां डॉ. किंग यांनीं स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलें तेव्हां ते तिला म्हणाले, “ डॉक्टर, तुमची आम्हांला फार मोठी मदत होते आहे. तुमचे हे उपकार कसे फेडावेत याची मला बरेच दिवस चिंता लागून राहिली होती. पण सुदैवानें तो प्रश्न आतां लवकरच सुटेल असें दिसतंय ! कांहीं आठवड्यांपूर्वीं, औषधें बनविणाऱ्या एका मोठ्या कंपनीचे लोक माझ्याकडे आले आहेत. त्यांच्या कामांत येणाऱ्या कांहीं अडचणी दूर करण्याकरितां त्यांना आमची मदत पाहिजे आहे. त्या मंडळींच्या प्रामाणिकपणाविषयीं मी खातरी करून घेतली आहे. आणि त्यांनीं एक फेलोशिप स्थापन करावी

अशी मी त्यांना आग्रहाची शिफारस करणार आहे. आणि तें काम तुमच्या मागदर्शनाखालीं व्हावें अशी मी त्यांना शिफारस केली आहे. अर्थात या कामाबद्दल तुम्हांला योग्य तो मुशाहिरा मिळेलच. ''

'' आभारी आहे मी तुमची, '' ती अर्धस्फुट आवाजांत म्हणाली, '' ही गोष्ट माझ्या दृष्टीनें किती महत्त्वाची आहे याची तुम्हांला कल्पना येणार नाहीं. ''

डॉ. किंग म्हणाले, '' तुम्हांला कल्पना नसेल इतकी मला तुमची माहिती आहे. तुमच्या संबंधीं सगळी माहिती मिळविल्याशिवाय हें महत्त्वाचं काम तुमच्या अंगावर मी टाकीन असं समजूं नका. ''

संध्याकाळीं प्रसन्न हृदयानें ती घरीं परत गेली. अनेक महिन्यांचे ओझें उतरल्यासारखें तिला वाटलें. भावी रम्य काळाचीं सुखस्वप्नें पाहातच तिनें घरांत पाऊल ठेवलें.

एके दिवशीं हॉस्पिटलच्या कँटीनमध्यें तिची एका चिनी माणसाशीं गांठ पडली. उंचापुरा, आणि देखणा होता तो. त्यानेंच आपली ओळख करून देऊन म्हटलें, '' माझें नांव पीटर लाय. मला तुम्हांला भेटायचेंच होतें. इथल्या फिजिऑलजी विभागांत मी असिस्टंट प्रोफेसर आहे.''

'' तुमची ओळख झाली. आनंद झाला '' तिनें पुढें म्हटलें, '' मी इथल्या प्रसूति आणि स्त्रीरोग विभागांत फक्त निरीक्षण करण्यासाठीं येत असतें.''

जेवण उरकल्यावर त्यानें तिला त्या दिवशीं संध्याकाळीं आपल्या प्रयोग-शाळेला भेट देण्याची विनंति केली. तिनें आमंत्रण ताबडतोब स्वीकारलें. तिथें गेल्यावर पांढऱ्या शुभ्र पोषाख चढविलेल्या चौदा स्त्रिया त्याच्या हाताखालीं काम करीत असलेल्या पाहून ती चकितच झाली. त्यानें त्यांच्याशीं तिची ओळख करून दिली आणि नंतर आपले कांहीं प्रयोग तिला दाखवण्यास सुरवात केली.

एक कुत्रा होता. त्याचे मूत्रपिंड काढून टाकण्यांत आलें होतें. पण प्लॅस्टिकनें बनविलेल्या एका कृत्रिम साधनानें तो जगला होता. इतकेंच नव्हे तर त्याची प्रकृति ठणठणीत होती. शरीराच्या बाहेरून त्याचें रक्त शुद्ध

करण्याची क्रिया बिनबोभाट पार पडत होती.

दुसऱ्या एका प्रयोगांत हृदयाचें काम अशाच एका यंत्राच्या साहाय्यानें करून घेतलें जात होतें. तिसऱ्यांत तर हृदयाच्या जागीं हें यंत्रच बसविण्यांत आलें होतें.

आपल्या एका देशबांधवानें असले महत्वाचे शोध लावावे याचा तिला फार अभिमान वाटला. प्रयोग शाळेला दिलेल्या भेटीमुळें रोजच्या कंटाळवाण्या कामाचा एक दिवस तिचा मोठा मजेंत गेला.

परततांना पीटर म्हणाला, " रोज तुम्ही अशाच आम्हांला भटायला आलांत तर आनंद वाटेल. डॉ. किंग यांच्या प्रयोगशाळेंत तुमचं काम फारच छान चाललं असल्याचं मीं ऐकलें आहे. आमच्या इथल्या कामांत तुमची आम्हाला चांगलीच मदत होईल याची मला खात्री वाटते. "

यानंतर रोज दुपारीं तीं एकत्रच जेवूं लागलीं. अनेक वेळां त्यानें तिला घरापर्यंत सोबत केली. आणि याँगतेहच्या रेस्टोरांत जाऊन जवणहि केलें. नाताळच्या सुट्टींत सॅनफ्रॅन्सिस्कोला घरीं न जातां तो न्यूयॉर्कमधेंच राहिला, हें पाहून तिला वाटलें तिच्यावरील प्रेमामुळेंच तो राहिला असावा.

सुट्टींत आठवडाभर तीं परस्परांना अनेकदां भेटलीं आणि नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशीं त्यानें तिला हॉटेल न्यूयॉर्करमध्यें जेवणासाठीं आणि नृत्यासाठींहि नेलें. शेवटचें नृत्य चालूं असतांना त्यानें तिच्याजवळ लग्नाची मागणी व्यक्त केली.

क्षणभर काय बोलावें हें तिला कळेना पण थोड्या वेळानें निश्चयानें तिनें म्हटलें, " पीटर, या क्षणीं तुम्हांला कांहींच उत्तर मला देतां येणार नाहीं. परस्परांची माहिती आपल्याला अजून फारशी झाली नाहीं. विचार करायला मला थोडा वेळ द्या – "

नवीन वर्षाच्या दुसऱ्या दिवशीं घसा दुखूं लागल्याची डॉलीनें कुरकुर केली. तीन दिवस तिला बारीक ताप आला. या नंतर आजाराचीं चिन्हें मावळलीं. पण तिला अशक्तपणा जाणवूं लागला. भूक लागेनाशी झाली. कातडी फिक्कट दिसूं लागली आणि तिचें आनंदी हास्य बंद पडलें.

एके दिवशीं सकाळीं डॉली जागी झाली ती कण्हतच. चेहरा गोबरा

दिसत होता. पापण्या सुजल्या होत्या. सिआओ-शेनचा हात धरण्याचा प्रयत्न करीत ती विव्हळून म्हणाली, " मावशी ग, डोकं फार दुखतंय्. "

पोरीच्या प्रकृतींत झालेला हा अचानक बदल पाहून ती घाबरली. कारण ही मूत्रपिंडाच्या विकाराचीं चिन्हें होतीं. असें होईल अशी थोडीशी तिला शंका आली होती. पण आत्तांपर्यंत स्पष्ट चिन्हें दिसलीं नव्हतीं. आन-लिएन कडे ती धांवतच गेली. आन-लिएन रात्रीं नाटकाला जाऊन आल्यामुळें अजून उठली नव्हती. दारावर टिचक्या मारूनहि कांहींच उत्तर येईना तेव्हां सिआओ-शेन सरळ तिच्या खोलींत घुसली आणि तिच्या अंगावरचें पांघरूण दूर करून तिला उठवीत म्हणाली, " आन-लिएन ऊठ, ऊठ. डॉली फार आजारी आहे. "

आन-लिएननें पलंगावरून उडी मारली आणि शून्य दृष्टीनें तिच्याकडे पहात म्हणाली, " म्हणतेस काय ? काल संध्याकाळीं तर चांगली होती ती. "

सिआओ-शेन म्हणाली, " छेः ! परवा तिचा घसा दुखत होता तेव्हांपासून तिला बरं नाहीं. तूं कामांत असल्यामुळें तिचा आजार तुझ्या लक्षांत आला नाहीं. मी जाऊन येतें तोंवर तिच्याकडे लक्ष दे. "

डॉलीच्या लघवीचा नमुना घेऊन ती मेडिकल सेंटरवर गेली. लघवींत रक्त आणि पू बऱ्याच प्रमाणांत दिसून आल्यावर तिच्या छातींत धस्स झालेः लगेंच ती चायनाटाउनकडे परत आली. आन-लिएन मुलीला मांडीवर घेऊन बसलेलीच होती. तिचे डोळे चिंतातुर दिसत होते.

मुलीला विछान्यावर ठेवल्यावर सिआओ-शेननें सगळीं सूत्रें आपल्या हातांत घेतलीं. ती म्हणाली, " आन-लिएन मी काय सांगते तें नीट ऐक. डॉलीला मूत्रपिंड दाहाचा विकार झाला आहे. हा रोग फार भयंकर असतो. त्यामुळें तिला इस्पितळामधें ताबडतोब न्यायला पाहिजे. "

एका तासाच्या अवधींत टेलिफोनवरून तिनें डॉलीला मेडिकल सेंटरमध्यें दाखल करून घेण्याची आणि त्या रोगाची तज्ञ माणसें तिच्या दिमतीला मिळतील अशी व्यवस्था करून टाकली.

डॉली इस्पितळांत होती तोपर्यंत सिआओ-शेन रात्रीच्या जेवणासाठीं चायनाटाउनला परत जात नसे. त्याऐवजीं ती आजाऱ्याच्या खोलींत वाचीत

बसून राही. अन् डॉली झोंपी जाईपर्यंत तिच्याशीं खेळत राही.

पीटरला ही व्यवस्था फार आवडली. कारण प्रयोगशाळेंतील काम आटोपल्यावर संध्याकाळीं तिला भेटायला मिळूं लागलें. जेवण दोघेंहि एकत्रच घेऊं लागलीं.

पीटरच्या मागणीचा तिनें शांतपणानें विचार करून पाहिला. पण इतर बऱ्याच गोष्टींविषयीं त्यांच्यांत बोलणें निघालेंच नव्हतें. एप्रिलच्या मध्याला एके दिवशीं असेंच त्यांचें जेवण चाललें असतांना त्यानें पुन्हां लग्नाचा विषय काढला. तिनें म्हटलें, " एका व्यवसायांत पडलेल्या स्त्रीला लग्नाचा विचार करणं तितकंसं सोपं नाहीं, नाहीं कां ? गृहिणीची जबाबदारी उचलायची आणि त्याबरोबर व्यवसाय संभाळायचा हें फार जड जाईल मला. पण दोन्ही बाबतींत यश मिळविण्यासाठीं जो काय त्याग करावा लागेल तो करण्याची माझी तयारी आहे. "

" वेडी ", पीटर मधेंच म्हणाला, " स्त्रीचं कार्यक्षेत्र म्हणज घर. लग्न झाल्यावर तूं डॉक्टरचं काम सोडावं असंच मला वाटतं. "

एकाएकीं तिची अन्नावरची वासना उडाली. तिनें ताटली दूर केली हें पाहून पीटर म्हणाला, " काय झालं ग ? भूक नाहीं ? डॉलीला बरं वाटत नाहीं कां ? मला वाटतं, दुसऱ्यांच्या पोराबाळांची तूं निष्कारण इतकी काळजी करतेस. "

गंभीरपणानें तिनें म्हटलें, " होय, पीटर. मला तिची फारच काळजी वाटते. आजच मी तिला तुमच्याविषयीं सांगितलं. मला वाटतं, तुम्ही येऊन एकदां तिला भेटा. बरं वाटेल तिला. "

" छे: ! " पीटर आंबट तोंड करून म्हणाला, " मला फार काम आहे. आणि दुसरं म्हणजे मला मुलांचा फारसा लळा नाहीं. "

एकच वाक्य, पण त्या वाक्यानें तिच्या मनांतली त्याच्याविषयींची प्रेमाची भावना पार चिरडून टाकली. अश्रू आंवरून ती उठली आणि त्याला अभिवादन करून गाडी पकडायला धांवत गेली.

जूनच्या मध्याला डॉलीची प्रकृति जास्तच चिंताजनक वाटूं लागली. एके दिवशीं संध्याकाळीं निराश होऊन तिनें पत्र पाठवून आजोबांचा सल्ला

विचारला. पत्रांत तिनें लिहिलें होतें –

"प्रिय आजोबा,

न्यूयॉर्क येथील मेडिकल सेंटरच्या सर्व तज्ज्ञांनीं हात टेकले आहेत. मूत्र पिंडदाहावर रामबाण असें एकहि औषध नाहीं असें त्या सर्वांचें एकमत आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी याच रोगाची एक बाई तुम्ही वांचवली होती. पाश्चात्य डॉक्टरांनीं तिची आशा सोडली होती. डॉलीकरतां तुम्ही मला सल्ला द्याल कां ? कृपा करून हवाई टपालानें उत्तर धाडा."

पण युद्धकालांत टपाल वेळेवर मिळेल याची खात्री नव्हती. आगीच्या भक्ष्यस्थानीं तरी तें पडे किंवा पीकिंग शहरांत पोंचण्यापूर्वीच शत्रूच्या हातीं पडे. दिवसांमागून दिवस लोटले पण वाँग कुंगचें उत्तर आलें नाहीं.

एके दिवशीं सकाळीं ती प्रयोग शाळेंत दाखल झाली. त्याचवेळीं डॉ. किंग यांना तिसऱ्या प्रहरीं त्यांच्या खाजगी ऑफिसांत भेटून जाण्याविषयींची चिठ्ठी तिच्या हातांत पडली. फेलोशिपसंबंधीं हें बोलावणें असावें याबद्दल तिला खात्री होती. पण दुपारीं तिला डॉलीच्या वॉर्डांतून निरोप आला. पोरीला सकाळपासून वांत्या होत होत्या. त्या आवरण्यासाठीं केलेले सर्व उपाय निष्फळ ठरले होते. कदाचित् ती अंतकाळची सुरवात असावी. ती तेथें दाखल झाल्यावर थोडयाच वेळांत वांत्या एकदम थांबल्या आणि पोरीनें डोळे उघडे करून,पाहिलें. आन-लिएन आणि यॉंगतेह् जेवून परत येईपर्यंत ती डॉलीच्या उशाशीं वाचीत बसून राहिली. आईबाप लवकरच परतले. मुलगी शांत झोंपीं गेलेली पाहून त्यांना हायसें वाटलें. त्यांनीं सिआओ–शेनला घरीं जाऊन झोंपण्याची फार गळ घातली. तिनें पाहिलें कीं आजाऱ्याची काळजी घेण्याची सगळी व्यवस्था झाली आहे, आणि आपल्यालाहि गेल्या कांहीं आठवडयांत कामाचा खूप ताण पडला आहे. तेव्हां आपल्या प्रकृतीच्या स्वास्थ्यासाठीं तरी त्यांचें म्हणणें लक्षांत घेणें इष्ट आहे. चायनाटाउनला ती परत आली.

दुसऱ्या दिवशीं जाग आल्यावर यॉंगतेह् किंवा आन-लिएन दोघांपैकीं कोणीहि परत आलें नाहीं हें पाहून ती घाबरली. झटपट स्नान करून तिनें कपडे केले आणि खाण्याचा विचारहि मनांत न आणतां ती गाडी

पकडायला बाहेर पडली.

मुलांच्या इस्पितळाच्या प्रवेशद्वाराशींच डॉ. हॉपकिन्स तिला भेटले. त्यांनीं सांगितलें, " मी तुमचीच वाट पहात होतों. तुमची छोटी डॉली सुटली. कांहींहि करणें आम्हाला शक्य झालें नाहीं. "

दैवदुर्विलास हा कीं डॉलीच्या प्रेतयात्रेच्या दुसऱ्या दिवशींच वॉंग कुंगचें पत्र तिला मिळालें. त्यांनीं लिहिलें होतें, " पोरीच्या आजाराचें वाचून फार वाईट वाटलें. जर तिला विकार जडला असेल तर वाळलेल्या किडनीचा उपयोग करावा. आणि नाय चिंगची उपाययोजना तुझ्या लक्षांत असेलच. डोकें दुखणाऱ्या रोग्याला मेंदूचा भाग खायला घालावा, अजीर्ण असेल तर पोटाचा भाग द्यावा. रक्तशुद्धीसाठीं यकृत द्यावें, खूप मोठ्या प्रमाणांत तिला ताबडतोब वाळलेली किडनी खायला घाल. तुझ्या पत्रावरून असें दिसतें कीं वेळ फार थोडा आहे.... "

डॉ. किंग यांना आदल्या दिवशींच्या निरोपानुसार भेटायला जात असतांना हा चिनी वैद्यकांतला वरवर साधा दिसणारा उपचार तिच्या डोक्यांत घोळत होता. आपल्या आदल्या दिवशींच्या गैरहजेरीबद्दल तिनें प्रयोगशाळेंतून फोनवरून त्यांची क्षमा मागितली तेव्हां ते म्हणाले, " समजलं मला. बरं पण आत्तां यायला वेळ आहे कां ? "

तेथें पोंचल्यावर डॉ. किंग तिला खूपच आनंदांत असलेले दिसून आलें. त्यांनीं तिला म्हटलें, " त्या संशोधनाच्या फेलोशिपची सगळी व्यवस्था जमली एकदांची. तुम्हांला काम करायचें आहे म्हणून म्हटलें कीं तुम्हांला याबाबत कांहीं सुचवायचें आहे कां ? "

एकाएकीं तिचे डोळे चुरचुरूं लागले आणि गालांवरून अश्रू ओघळूं लागले. " हें काय ? " डॉ. किंग चकित होऊन म्हणाले, " रडायला काय झालं ? हें घडून यावं अशीच तुमची इच्छा होती. होय ना ? "

तिनें आपले डोळे कोरडे केले. मन आंवरलें आणि म्हटलें, " डॉक्टर, तुम्हांला माहीतच आहे कीं माझी छोटी भाची नेफ्राईटिसनें दगावली. याच मेडिकल सेंटरमध्यें आम्हीं तिला आणून ठेवली, पण तिच्या त्या रोगावर द्यायला औषधच मिळालं नाहीं. "

स्निग्ध दृष्टीनें तिच्याकडे पाहून ते म्हणाले, " ठाऊक आहे मला. "

ती बोलूं लागली, " या रोगाचा प्रसार सगळीकडे आहे. माझं बोलणं कदाचित् धाडसाचं वाटेल. पण ही फेलोशिप किडनीच्या रोगासंबंधीं संशोधन करण्यासाठीं ठेवावी, असं सुचवावंसं वाटतं मला. तें काम हातीं ध्यायला मला आनंद वाटेल. "

त्यानंतर तिनें किडनीच्या रोगावर तोंमयंत प्रसिद्ध झालेलें यच्यावत् वाङ्मय वाचून काढलें. तिच्या आजोबांच्या नाय चिंगमधून ज्या सूचना तिला केल्या होत्या त्यांच्याशीं सहमत असणारें वरेंच वाङमय तिला पाश्चात्यांच्या पुस्तकांतूनहि सांपडूं लागलं. संशोधनाची शास्त्रीय पद्धत म्हणजे ह्या रोगांत माणसाच्या मूत्रपिंडाची जी स्थिति होते तशीच प्रयोगाच्या प्राण्यांच्या मूत्रपिंडांची घडवून आणायची. त्यानें तिला बरेंच उत्तेजन वाटलें. बरेंच दिवस तिनें या बाबतींत औषधांच्या साहाय्यानें प्रयोग करून पाहिलें. अखेरीस सर्जरीच्या साहाय्यानें किडनीवर खूप ताण पाडायचा आणि ताण पडल्यामुळें किडनी दूषित करून सोडायची हा मार्ग कायम केला. लवकरच किडनीच्या रोगानें दूषित झालेले उंदीर शेंकडयांनीं तिच्या जवळ जमले. डॉलीच्याप्रमाणेंच त्यांच्या लघवींतून रक्त आणि पू जाऊं लागला. डॉलीप्रमाणेंच रक्तदाब त्यांच्यांतहि दिसून येऊं लागला. नंतर खाटीकखान्यांतून जनावरांच्या ताज्या किडनी आणवून त्यांच्यावरचें आवरण काढून टाकून तिनें उरलेल्या किडनीचा भाग मंदाग्नीवर वाळवून घेतला. त्याची पूड करून तिनें ती पूड निरनिराळ्या द्रवांत विरघळवून त्यांतला हवा तो अंश काढून घेतला.

महिने न् महिने उंदरांना ते अर्क दिले गेले. पण उंदीर बरें होण्याऐवजीं जास्तच खराब होऊं लागले, आणि त्यांतले बरचसे तर मेले.

संध्याकाळीं ती आपल्या खोलींत एकटी बसून राही. प्रॅक्टिस करण्यासाठीं सरकारी परवाना मिळावा म्हणून ज्या परीक्षा तिला द्याव्या लागणार होत्या त्यांचा अभ्यास ती तेथें करीत असे.

● ●

मॅनहॅटन भागांत मध्यवर्ती जागेंत असलेल्या एका जुन्या, वापरांत

नसलेल्या थिएटरमध्यें त्यांच्या परीक्षा होणार होत्या. दरवाजाजवळ जातांच तिनें आपलें ओळखपत्र आणि फोटो हीं दोन्ही दारावर दाखवलीं. लगेंच तिला आंत सोडण्यांत आलें. पूर्वी स्टेज म्हणून वापरण्यांत येत असलेल्या जागेवर आपण उभें असल्याचें तिला आढळून आलें. लहान लहान डेस्कें आणि खुर्च्यांच्या लांबच लांब ओळी तिथें मांडलेल्या होत्या.

मुख्य परीक्षक ध्वनिक्षेपकांतून सांगूं लागले, "कृपा करून इकडे लक्ष द्या. दंतवैद्यकाचा परवाना घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीं पांढरे कागद ठेवलेल्या डेस्कांवर बसावें. जनरल प्रॅक्टिस करूं इच्छिणाऱ्यांच्या डेस्कांवर गुलाबी कागद आहेत. त्यांनीं तिथें बसावें. ऑस्टिओपॅथीवाल्यांनीं पिवळा कागद ठेवलेल्या डेस्कांवर बसावे –"

गर्दी इतस्ततः पांगूं लागली. दहा मिनिटांनीं गुलाबी कागद ठवलेली आपली जागा सिआओ–शेनला सांपडली. 'सगळेच कांहीं जनरल प्रॅक्टिस करूं इच्छिणारे नसतील असें मला वाटलंच होतं' तिच्या मनांत आलें.

पहिला प्रश्न, सातवी शीर कुठें उगम पावते ? तिचा जाण्याचा मार्ग कोणता ? आणि ती कुठें कुठें जाते यासंबंधींचा होता. दुसरा प्रश्न कवटीच्या खालील बाजू संबंधींचा होता. 'यांत कांहींच अवघड नाहीं' असें स्वतःशींच म्हणत ती प्रश्नामागून प्रश्न सोडवीत गेली.

पहिल्या दिवशींची परीक्षा फक्त अनॅटमी आणि शरीररचनेची होती. दुसऱ्या दिवशीं बायोकेमिस्ट्री आणि पॅथॉलॉजीची होती. तिसऱ्या दिवशींचे विषय आरोग्य, मटीरीया मेडिका आणि जंतुशास्त्र हे होते. तिसऱ्या दिवसाची तिला मुळींच काळजी वाटली नाहीं. कारण त्या विषयांची तिला खात्री होती. शेवटचा प्रश्न येईपर्यंत सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. शेवटचा प्रश्न मात्र वाचतांच आपल्याला यासंबंधीं कांहींच माहिती नसल्याचें तिला आढळून आलें. तिचें कपाळ घामानें थबथबून निघालें. तिला काय लिहावें तेंच सुचेना. चक्कर आल्यासारखें वाटून तिनें डेस्कवर डोकें टेकलें.

देखरेख करणारा एक अधिकारी जवळ येऊन तिला म्हणाला, "बरं वाटत नाहीं कां ?"

"नाहीं. तसं कांहीं नाहीं. शेवटचा प्रश्न येत नाहीं म्हणून जरा –" ती म्हणाली.

एकवार हंसून तो हलकेच म्हणाला, "एकच प्रश्न येत नसेल तर स्वत:ला भाग्यवान् समजा तुम्ही."

थिएटरच्या दरवाजांतून अखेरच्या दिवशीं बाहेर पडतांना एका देखण्या चिनी तरुणानें तिला हटकलें. डोक्यावरल्या टोपीला हात लावून तो सभ्यपणानें म्हणाला, "क्षमा करा. पण मी आपली स्वत:ची ओळख करून देतों आपल्याला. माझें नांव हर्बर्ट लिन्. मी इंजिनिअरिंगच्या परीक्षांना बसलों आहे. तुम्हांलाही मी येथें प्रत्येक दिवशीं येतांना पाहिलं आहे. मला वाटतं इथें आपण दोघंच चिनी आहोंत. तुमचा काय विषय आहे ?"

क्षणभर दचकल्यासारखी होऊन ती घुटमळली, नंतर तिनें उत्तर केलें, "मी सिआओ–शेन वाँग. मी डॉक्टरीच्या परीक्षेला बसलें आहे."

"अस्सं ? गंमतच आहे. मलाहि डॉक्टर होण्याची इच्छा होती. पण माणसाचं रक्त पाहतांच कसंसं होऊं लागलं तेव्हां तो नाद सोडून द्यावा लागला मला."

दोघेंहिजण बोलत, गप्पा छाटीत आणि हंसत थोडा वेळ तिथेंच रमलीं. परीक्षेचे गेले तीन दिवस कसे गेले हें त्यांनीं एकमेकांना सांगितलें. थोड्या वेळानें तो म्हणाला, "परीक्षा संपल्याचा आनंद व्यक्त करायला पाहिजे, नाहीं कां ? चला आपण दोघंहि चायनाटाउनमध्यें जेवण करूं या."

परीक्षेनंतर दोघांनाहि मोकळीक होती. दिवस जाऊं लागले तसें दोघेंहि अनेक वेळां एकत्र जेवूं लागलीं. हर्बर्ट तिच्याआधीं एकच वर्ष युनायटेड स्टेट्समधें आल्याचें तिला कळलें. सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी त्यानें मॅसच्यूसेट्स् इन्स्टिटचूट ऑफ टेक्नॉलजी तर्फे संपादन केली होती. हार्वर्डला दोन वर्षं त्यानें शिक्षक म्हणून घालवलीं होतीं. आणि आतां न्यूयॉर्कमधें खाजगी प्रॅक्टिस सुरूं करण्याचा त्याचा विचार होता. पण अनेक संस्थांनीं त्याला आपल्याकडे नोकरीला बोलावलें होतें.

तिनेंही आपली माहिती त्याला सांगितली. आपल्या प्रयोगांची आणि आजोबांची सगळी हकीकत तिनें त्याला सांगून टाकली. "त्यांच्या पत्रांतून

ते सारखे इकडच्या लोकांविषयीं मला विचारीत असतात. अमेरिकन लोक कसे आहेत, कसे बोलतात, काय खातात, कसें वागतात त्यांना सगळं जाणून घेण्याची इच्छा दिसते. मला वाटतं, ह्या जगांतली जीवनयात्रा संपण्यापूर्वी एकदां इकडे येऊन जाण्याची त्यांना इच्छा झाली आहे.'' त्यावर हर्बर्ट म्हणाला, '' येऊं दे कीं. लढाई आत्तां लवकरच संपेल. मग त्यांना इकडे यायला काय हरकत आहे ? आणि शिवाय मलाहि त्यांना भेटावं असं वाटूं लागलं आहे.'' शेवटचें अर्थपूर्ण वाक्य त्यानें मुद्दामच जोडून दिलें.

एके दिवशीं खोलीवर परत आल्यावर टपाल पेटींत एक सरकारी लखोटा तिला आढळून आला. आलबनीचा शिक्का त्यावर होता. तिनें तें पत्र फोडून वाचलें –

'' न्यूयॉर्कच्या मेडिकल बोर्डाला आपल्याला हें कळविण्यास आनंद वाटतों कीं, आपण आपली परीक्षा समाधानकारक रीतीनें उत्तीर्ण झालां आहांत. यापुढें न्यूयॉर्क स्टेटमध्यें प्रॅक्टिस करायला आपण लायक ठरला आहांत. त्याबद्दल आपल्याला परवाना मिळेल. ''

धडधडत्या छातीनें ती आरामखुर्चीवर गळून पडली. आजोबांचा विचार लगेच तिच्या मनांत आला. '' ते इथें येण्यापूर्वी मी आपल्या प्रॅक्टिसचा कदाचित् चांगला जम बसवीन. स्वत:च्या कमाईच्या जोरावर मी त्यांच्या इतक्या वर्षांच्या उपकाराचें ऋण फेडण्याचा प्रयत्न करीन. ''

विजयदिनाच्या दिवशीं संध्याकाळीं आनंदोत्सवाच्या गडबडींतच सिआओ–शेननें आजोबांना पत्र लिहून टाकलें. त्यांत तिनें लिहिलें, '' तुम्हांला आतां चीन सोडायला हरकत नाहीं. आतां तुम्ही तिथला व्याप आवरून द्या आणि न्यूयॉर्कला येऊन राहा. ''

युद्ध संपल्यामुळें हवाई टपालाची वहातूक जलद होऊं लागली होती. थोडयाच दिवसांत तिला त्यांचें उत्तर आलें. वाचून तिला अत्यानंद झाला. तिचे आजोबा येणार होते.

हा वेळपर्यंत हर्बर्टची तिला चांगलीच माहिती झाली होती. कायप्रमाणेंच त्याचेहि जीवनासंबंधींचें विचार तिला आवडत असत. त्याला मुलांचा भारी लळा होता. रस्त्यांत मुलें दिसलीं कीं त्यांच्याशीं खेळण्याची त्याला फार

आवड होती. लग्न झाल्यावरही विवाहित स्त्रीनें आपला व्यवसाय चालूं ठेवावा असेंच त्याचें मत असल्याचें तिला आढळून आलें होतें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्या संशोधन कार्याविषयीं त्याला फार आस्था वाटत असे. नेहमीं तो तिच्या प्रयोगशाळेंत जाई आणि तेथून तो तिला जेवायला घेऊन जाई. पीटरचा आणि त्याचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न असलेला पाहून तिला समाधान वाटलें. हर्बर्टला पाहतांच तिला कायचें स्मरण होई. फरक इतकांच कीं कायवरचें तिचें प्रेम अंशतः दयेंतून उत्पन्न झालेलें होतें. हर्बर्टबद्दल मात्र तिला पहिल्या भेटीपासूनच प्रेम आणि कौतुक वाटूं लागलें होतें. आणि कदाचित् आजोबांच्या अंगचे कांहीं गुण त्याच्या अंगांत तिला दिसून आलें असतील.

❀ ❀

– वाँग कुंगना तो प्रवास फार कष्टाचा वाटला, सॅनफ्रॅन्सिस्कोला बोट येऊन लागेपर्यंतचा बहुतेक सगळा वेळ त्यांनीं कॅबिनमध्येंच घालवला. आणि अमेरिकेंत उतरल्यावर त्या अपरिचित खंडांत या टोकापासून त्या टोकापर्यंत गाडीनें प्रवास करतांना देखील ते एकटेंच आपल्या डब्यांत बसून राहिले.

त्यांची तार येऊन पोहोंचल्यावर, सिआओ–शेननें डॉ. किंग यांना विचारून आजोबांच्या दिमतीसाठीं म्हणून थोडचा दिवसांची रजा मागून ठेवली. शिकागोहून येणाऱ्या गाडीच्या वेळीं ती ग्रँड सेंट्रल स्टेशनवर येऊन हजर झाली. तिन्हीसांजेची वेळ होती. गाडींतल्या उतारूंची गर्दी तिच्या-समोरून जाऊं लागली. गर्दी विरळ झाली तरी तिचे आजोबा कुठेंच दिसेनात. फाटकांतून बाहेर पडणाऱ्या कंडक्टरला ती म्हणाली, "माफ करा. पण एक वृद्ध चिनी गृहस्थ गाडींत आपल्याला दिसले कां ?"

"हो. दिसले कीं. कंपार्टमेंटमध्यें होते एका. अजून उतरून आले नाहींत ?"

"नाहीं. म्हणून मला जरा काळजी वाटूं लागली आहे."

कंडक्टर तिला उत्साह वाटेल अशा आवाजांत म्हणाला, "अच्छा ! चला पाहूं या –"

दोघेहि फाटकांतून आंत गेलीं. नंतर त्यांना एक दृश्य दिसलें. एक उंचेला तरुण चढावरून येत होता. त्याचा एक हात दोन मोठ्या सुटकेसेस धरण्यांत गुंतला होता आणि दुसऱ्या हातानें तो वाँग कुंगना चालतांना आधार देत होता.

"आजोबा," म्हणून आनंदानें आरोळी ठोकून, हातानें खुणा करीत ती उतारावरून धांवत गेली. वाँग कुंगची अशक्तता पार कुठल्या कुठें पळून गेली. त्या तरुणाचा हात त्यांनीं सोडून दिला आणि नातीकडे धांव घेतली.

"माझी पोर. अरे माझ्या राजा--" ते म्हणूं लागले, "तुला एकदां नीट डोळे भरून पाहूं दे बरं. तूं म्हटलंस म्हणून, नाहींतर दुसऱ्या कुणाच्याहि आग्रहाला मान तुकवून मी हा भयंकर प्रवास केला नसता. पण तूं म्हटल्यावर प्रश्नच मिटला. तूं मला हाताच्या बोटावर नाचवशील म्हणून शांग-आनला मी नेहमीं सांगत होतों."

त्या तरुणाचे आभार मानून तिनें एका हमालाला बोलाविलें. रस्त्यावर आल्यावर वाँग-कुंग तेथील दिव्यांचा झगझगाट, मोटारी आणि लोकांची झुंबड पाहून आश्चर्यानें थक्क होऊन उभेच राहिले. ते हलकेच पुटपुटले, "अखेर माझ्या म्हाताऱ्या डोळ्यांना हें विस्मयजनक शहर पाह्यला मिळालें म्हणायचें. तूं पत्रांतून कळवलें होतेंस म्हणा. पण शेकडों पत्रांतून वाचणें आणि एकदां डोळ्यांनीं पहाणें यांत फार, फार अंतर आहे."

"पण तुम्ही सगळें अमेरिका खंड पालथें घालून आला आहांत. अमेरिकेचा बहुतेक सगळा भाग तुम्ही पाहिला आहे कीं--" ती म्हणाली.

"बाळ, खरं आहे तुझं म्हणणं. मला दिसून आलं आहे कीं माणसं इथून तिथून सगळीं सारखींच, मग तीं कोणत्या कां देशांतलीं असेनात. शिकागो-पासून इथवर माझी वास्तपुस्त करणारा तो तरुण मनुष्यच पहा ना," ते सांगूं लागले, "दयाळूपणाच्या बाबतींत पक्का बुद्धधर्मीय देखील त्याच्यावर ताण करूं शकणार नाहीं. कॅलिफोर्नियांत पाऊल ठेवल्यापासून मला हें दिसलं. अमेरिकन लोक मला फार आवडले." असें म्हणून त्यांनीं मान डोलावली.

"आणि मलाहि पण," तिनें म्हटलें, "पण आतां आपल्याला चायनाटाउन आधीं गांठलें पाहिजे. आन-लिएननें आपल्याला त्यांच्याकडे जेवायचें आमंत्रण देऊन ठेवलें आहे."

"चायनाटाउन ?" उत्साहानें ते म्हणाले, "चल-चल, लवकर जाऊं या तर मग."

"छान, तर मग आपण जमिनीखालच्या गाडीनें जाऊं या."

त्या गाडींत खूप गर्दी होती. लोखंडी दांड्याला कसें घट्ट धरून उभें राहायचें तें तिनें त्यांना दाखविलें. गाडीनें चालूं होतांना एकदम जोराचा हिसका मारला. त्या सरशीं वाँग-कुंगची हॅट उडून गेली आणि त्यांनीं घाबरून डोळे मिटून घेतले. थरथरत त्यांनीं सिआओ-शेनचा हात पकडून म्हटलें, "या निर्दय सांपळ्यांतून मला बाहेर घेऊन चल. माझं कंबरडंच मोडलं. मी आतां कांहीं जिवंत रहात नाहीं."

एका तरूण माणसाच्या ध्यानांत हा प्रकार येऊन तो जागचा उठला आणि त्यानें आपली जागा त्यांना देऊं केली. वाँग-कुंगनीं, "आभारी आहें, तरुण माणसा," म्हणून म्हटलें आणि मस्तक लववून त्यानें दिलेल्या जागेवर ते बसले. सिआओ-शेनला आश्चर्यच वाटलें. कारण चीनमध्यें मोठ्या माणसांनीं लहान माणसांपुढें मस्तक लवविण्याची पद्धत नाहीं.

वरचा पट्टा घट्ट धरून ती आतां आजोबांच्या समोर उभी राहिली. त्यांनीं तिचा रिकामा हात धरून कुरकुरत म्हटलें, "इथून मला बाहेर घेऊन चल. या गाडीच्या वेगानें माझीं आंतडीं सगळीं घुसळून निघालीं आहेत." आणि म्हणून पुढचें स्टेशन आल्यावर तिनें सूटकेसेस हातांत उचलून घेतल्या, त्यांना वर आणलें आणि एका टॅक्सीला खूण केली.

आंत चढून बसतांना त्यांनीं तिला म्हटलें. "त्या बाबाला सांग, म्हणावं जरा धीरानें गाडी चालूं दे. माझं जीर्ण शरीर आतां घुसळून घ्यायला तयार नाहीं."

मॉंटस्ट्रीटवर गाडी आली तेव्हां सिआओ-शेन म्हणाली, "आजोबा, हें चायनाटाउन इथून सुरूं झालें."

त्यांनीं दीर्घ श्वास आंत ओढून घेतला. अन्नाचा आणि तांदुळाच्या दारूचा

अनुक्रम ... वर्ग ...
विभाग ... 2-6-८.८. ... पुस्तक ...

संमिश्र सुगंध त्यांच्या नाकपुड्यांत शिरला. "इथंच उतरू या आपण" ते म्हणूं लागले, "या जलद वाहनांतून हिसके खात जाण्यापेक्षां उरलेला रस्ता आपण चालतच जाऊं या."

रेस्टॉरांच्या आणि खाद्य पदार्थांच्या दुकानांच्या खिडक्यांसमोरून जातांना त्यांच्या तोंडाला पाणी सूटूं लागलें. एका अशाच सुंदर खाद्यपेयांनीं सजवलेल्या खिडकीकडे नजर जातांच त्यांनीं तिचा हात घट्ट पकडला आणि म्हटलें, " इथें जेवलों तर मला चांगली हुषारी वाटेल. "

"पण आजोबा," ती म्हणाली, "याँगतेह् त्याच्या रेस्टॉरांमध्यें आपल्याला चांगली मेजवानी देणार आहे."

" अरे हो ! विसरलोंच कीं."

आन-लिएनच्या ब्लॉकवर जाण्यासाठीं तीन जिने त्यांना चढावे लागले. तिसऱ्या जिन्याच्या जवळ ते आले असतां वाँग कुंग एकदम थांबले कठड्याला धरून धापा टाकीत ते म्हणाले, इथले लोक घरांवर घरें बांधून कां राहतात ? छे: ! यांत काय शहाणपणा आहे मला कळत नाहीं. "

सिआओ-शेननें उत्तर केलें, " थोडक्याशा जागेंत फार लोकांना इथें रहावं लागतं. जागेला फार महत्व आहे इथं. मग एकच मार्ग उरतो. तो म्हणजे वर जाण्याचा. "

" असेल. असेल, " त्यांनीं कंटाळून म्हटलें आणि जिन्यावर पाऊल ठेवलें.

रेस्टॉरांमध्यें गेल्यावर त्यांना आढळून आलें की ही मेजवानी संस्मरणीय करण्याच्या इराद्यानें याँगतेह्नें खूप परिश्रम घेतले होते. एका लांबलचक टेबलाशीं सन्माननीय पाहुण्यांसाठीं म्हणजे त्यांच्यासाठीं, खास खुर्ची अगदीं खास चिनी पद्धतीनें सजवून ठेवली होती. अरूंद तोंडाच्या सुरयांतून तांदुळाची दारू भरून ठेवली होती. शिवाय हस्तिदंती हातकाड्या – मोठा थाट उडवून दिली होती. चिनी पद्धतीचीं पक्वान्नें वाढण्यासाठीं चार नोकर टेबलाभोंवतीं घिरट्या घालीत होते.

बहुतेक सर्व पाहुणे गेल्यावर, वाँग कुंग याँगतेह् जवळ एका कोपऱ्यांत बसले. मधल्या अवधींत टेबलाजवळ येऊन बसलेले सर्व लोक अमेरिकनच

आहेत हें पाहून ते यॉंगतेह्‌ला म्हणाले, " या अमेरिकन लोकांनासुद्धां आपलं अन्न आवडतं वाटतं ? "

" तर– ! आपल्या पदार्थांची रुची त्यांना आवडूं लागली आहे. " यॉंगतेहनें उत्तर केलें.

वॉंग कुंग म्हणाले, " आवडायलाच पाहिजे. आपली पाककला हजारों वर्षांपूर्वीपासून प्रगत होत आली आहे. "

खरें बोलायचें तर कांहीं महिने ते यॉंगतेह्‌च्या घरीं मुक्काम ठेवून होते. तरी जेवणासाठीं त्याच्या रेस्टॉरांमध्यें पुढें क्वचितच् जाऊं लागले. त्या ऐवजीं अगदीं अस्सल चिनीं खाद्यपेयें मिळण्याची सोय असलेल्या दुसऱ्याच हॉटेलांतून जाऊं लागले. एका मोठ्या परक्या शहराच्या मध्यभागीं चीनची छोटी प्रतिकृति भासत असलेल्या चायनाटाउनमध्यें वास करण्याची नवलाई हळूं हळूं मावळत गेली आणि आपल्या मायदेशाची त्यांना तीव्रतेनें आठवण होऊं लागली.

वसंत ऋतूंत एके दिवशीं सकाळीं, मखमली टोपी, लांबच लांब झगा, आणि रेशमी सपाता घालून ते रमत गमत रस्त्यानें चालले होते. दुपार होत आली. त्यावेळीं भटकत भटकत ते पेल स्ट्रीटवर असलेल्या आपल्या आवडत्या रेस्टोराँजवळ येऊन पोंचले.

खिडकीजवळच्या कोपऱ्यांतल्या स्टुलावर बसून चीनला परत जाण्याविषयीं सिआओ-शेनचें मन वळवून पहावें कीं नाहीं याचा ते स्वत:शींच, विचार करूं लागले. त्यांना वाटलें कीं तेंच योग्य होईल. आपल्या स्वत:च्या देशाला आपल्या वैद्यकीय ज्ञानाची किती गरज आहे हें तिला समजून आलें तर तिला इथं राहण्यांत मुळींच आनंद वाटणार नाहीं. "

त्यांच्यासमोर बसलेल्या माणसानें त्यांच्या विचारतंद्रीचा भंग केला. उठतांना त्यानें डोकें खाजविण्यासाठीं डोक्यावरची टोपी काढली तेव्हां टोपीच्या आंतून एक लांबच लांब शेंडी बाहेर पडली. ते पहातांच वॉंग कुंग त्याच्याजवळ जाऊन म्हणाले, " जुन्या चीनचे तुम्ही खरेखुरे प्रतिनिधि आहांत. शेंडी कशी राहिली तुमची अजून ? क्रांतीनंतरच्या काळांत आम्हां सर्वांना त्या कापून टाकणं भाग पडलं. " म्हातारा हंसून म्हणाला, " मित्रा,

चिनी मनुष्य कुठेंहि गेला तरी चिनीच राहतो. चाळीस वर्षं झालीं असतील, मी इथेंच अमेरिकेंत वास्तव्य करून आहें. चायनाटाउन सोडून बाहेर कुठेंहि गेलों नाहीं. आणि मरेपर्यंत शेंडी ठेवण्याचा माझा विचार आहे."

त्याच्या डोक्याकडे बारकाईनें पाहून वाँग कुंग म्हणाले, " थांबा. तुमच्या डोक्याला खवडे पडलेले दिसत आहेत."

"होय" त्या गृहस्थानें म्हटलें, " खूप वर्षं झालीं त्याला. अमेरिकन, चिनी, सर्व उपाय करून पाहिले. माँटस्ट्रीटवरच्या प्रसिद्ध डॉ. शूनाहि भेटून आलों. पण त्यांचाहि इलाज चालला नाहीं. म्हणून डोक्यावरची टोपी मी अशी घट्ट घालून हिंडतों."

" मीहि वैद्य आहे, " वाँग कुंग म्हणाले, " बसा खालीं. मी पाहतों काय झालंय् तें." थोडचा वेळानें त्यांनीं वेटरला हांक मारून शाई आणि ब्रश आणून द्यायला सांगितलें."

" मी औषध लिहून देतों. कोपऱ्यावरच्या औषधी दुकानांत जाऊन तें तयार करून घ्या आणि लिहिलं आहे त्या बरहुकुम चोळून लावीत चला."

नंतर त्यांनीं एका कागदावर औषधांचीं नांवें लिहून दिलीं. आणि रोज रात्रीं टाळूला चांगली चोळून लावण्याविषयीं बजावून ठेवलें.

इंडियन स्विकनर्डची मुळी	२ औंस
लिमोनाईट	$\frac{१}{१०}$ औंस
टालकम	$\frac{१}{१०}$ औंस
कॅलोमेल	$\frac{१}{३०}$ औंस
तिळाचें तेल	४ औंस

त्या वृद्ध गृहस्थानें त्यांचे खूप आभार मानले आणि सूचनेप्रमाणें वागेन असें आश्वासन त्यांना देऊन तो निघून गेला.

पण हा प्रकार तेथें असलेल्या अनेकांनीं पाहिला होता. थोडयाच वेळांत त्या हॉटेलमध्यें असलेल्या सर्वांना समजलें कीं रोज या ठिकाणीं नीटनेटके कपडे घालून येणारे देखणे वृद्ध गृहस्थ फार मोठे चिनी वैद्य आहेत. अनेक लोकांनीं आपल्या दुखण्यांचा पाढा त्यांच्यापुढें वाचून दाखवला. धंदा चालविण्याची ही बात्पूरती संधि मिळालेली पाहून त्यांना आनंद झाला.

त्यांनीं त्या रोग्यांना तपासण्यास आणि सल्ला देण्यास सुरवात केली.

● ❷

तिन्हीसांजा होऊन गेल्यावर घरीं परत येत असतां, गेल्या कित्येक महिन्यांत उपभोगायला मिळाला नव्हता एवढा आनंद, एवढें समाधान त्यांना वाटलें. जिन्यापाशीं आल्यावर त्यांनीं कठड्याच्या खांबाला धरून नेहमींच्या त्यांच्या संवयीप्रमाणें स्वतःशींच म्हटलें, "माझी नात आणि मी – आम्हीं दोघांनीं मिळून आमच्या दोन्ही पद्धतींच्या वैद्यकाच्या साहाय्यानें जर आमच्या देश–बांधवांची सेवा केली तर केवढं समाधान आणि आनंद लाभेल ! "

● ❷

– सिआओ-शेन त्या दिवशीं नेहमीपेक्षां जरा लवकरच प्रयोगशाळेंत आली. आपल्या उंदीर मंडळींना भेट देण्यासाठीं तिनें लिफ्टवर पाय ठेवला तेव्हां पुरते सात देखील वाजले नव्हते. उंदरांपैकीं एक विभाग अलिकडे कांहीं विचित्रच वागूं लागला होता. ह्या गटांतल्या उंदरांना तिनें आपल्या सगळ्यांत अलिकडल्या किडनी एक्स्ट्रॅक्टचे इंजेक्शन दिलें होतें. प्रत्येक उंदराच्या गळ्यांत K. E. 469 अशा अक्षरांची चिठ्ठी बांधून ठेवली होती. कपडे बदलण्याच्या भानगडींत वेळ न घालवतां ती त्या विभागाकडे धांवतच गेली.

तिथें तिला जो चमत्कार दिसून आला तो पाहून तिनें आश्चर्यानें आपले हात उंच केले. 469 विभागांतले उंदीर धांवत होते. पिंजऱ्यांत खालीं वर चढउतर करीत होते. आणि एकमेकांच्या अंगावर उत्साहानें उड्या मारीत होते. या उलट दुसऱ्या पिंजऱ्यांतून कोंडलेले उंदीर किडनीच्या विकारानें शांतपणानें पडून होते. झटकन् तिनें प्रयोगशाळेचे कपडे परिधान केले आणि K. E. 469 विभागांतले उंदीर तपासून पाह्यला सुरवात केली. दोन तासांच्या परीक्षेनंतर तिला स्पष्ट कळून आलें कीं, किडनीचें सत्त्व दिलेल्या त्या उंदरांच्या लघवींतून रक्त आणि पू अजिबात नाहींसा झाला होता.

लगेंच तिला डॉ. किंगची आठवण झाली. फोनवरून तिनें त्यांना सांगितलें.

"अगदीं निर्णयात्मक उत्तर सांपडलं आहे. "

ते ताबडतोब तेथें आले आणि तिचे कागद बारकाईनें तपासून पाहूं लागले. सरते शेवटीं ते म्हणाले, "तुमचीं अनुमानं तर पटण्याजोगीं दिसताहेत तुमचा हा शेवटचा प्रयोग कदाचित् योगायोगानें यशस्वी झाला असेल असाही संभव आहे. तेव्हां ह्या प्रयोगाची यशस्विता जाहीर करण्याच्या आधीं तुम्ही हाच प्रयोग जास्त कांटेकोरपणानें पुन्हां करून पहावा हें बरें."

डॉ. किंगनीं बाहेरून दार लावून घेतलें असेल नसेल तोंच तिनें आजोबांना फोनवर बोलवून घेतलें. ती अधीर होऊन त्यांना सांगूं लागली, "आजोबा, उंदरांचा मूत्रपिण्डदाह बरा करील असें औषध मला सांपडलं आहे."

वाँग-कुंगनीं शांतपणानें अगदीं गंभीर स्वरांत उत्तर केलें, "पोरी, मला आनंद आहे. पण एक लक्षांत ठेव कीं. योजना माणसाच्या हातांत असते. आणि त्या योजनेची सिद्धि देवाच्या हातीं असतें. उंदरांची गोष्ट वेगळी. माणसांची वेगळी. प्रयत्न करीत रहा आणि उंदरांवर केलेला प्रयोग माणसांनाहि तितक्याच यशस्वी रीतीनें लावतां येईल हें सिद्ध करून दाखव. महत्त्वाची गोष्ट विसरूं नकोस कीं, सात मजली गोपुर बांधून दाखवण्यापेक्षां एका माणसाला वांचविणें हें अधिक मोठें पुण्यकृत्य आहे."

"मला ठाऊक आहे," दबलेल्या आवाजांत तिनें उत्तर केलें.

नंतर तिनें हर्बर्टला फोनवरून सांगितलें. त्यालाहि ही आनंदाची बातमी सांगायलाच हवी होती.

"मला तुम्हाला कांहींतरी सांगायचं आहे," ती म्हणाली, "आज रात्रीं मला जेवायला न्याल ?"

संध्याकाळीं त्यांची भेट झाली. तेव्हां तो म्हणाला, "कामामुळें आपल्याला भेटायचं जमत नाहीं, नाहीं ?"

"खरं आहे," ती उत्कटतेनें म्हणाली, "आणि यापुढें तर आणखी अवघड होणार आहे. मला तुम्हाला सांगायचं आहे तें हेंच कीं किडनीच्या सत्त्वाचा माझा प्रयोग यशस्वी होईल असं वाटूं लागलं आहे. आतां मला तोच प्रयोग जास्त कांटेकोरपणें करून पाहायचा आहे. संशयाला जरा सुद्धां जागा राहतां उपयोगाची नाहीं. आणि तसं झाल्यावर मग पुढें माणसांवर प्रयोग करून पहावा लागेल."

तिच्या कामाचें महत्त्व त्यालाहि समजलें होतें. पण त्याचें अभिनंदन मधेंच थोपवून धरीत ती म्हणाली, " पण हर्बर्ट, कधीं कधीं मनांत येतं कीं या सगळ्या धडपडीचा कांहीं तादृश उपयोग आहे कां ? मागच्या वर्षीं अभ्यास करून परीक्षा पास झालें पण अजून दवाखाना उघडला नाहीं कीं प्रॅक्टिस चालूं केली नाहीं. आजोबा इथें आल्याला दिवस, महिने लोटले पण त्यांच्या बरोबर घालवायला मला वेळच मिळाला नाहीं. आणि त्यांनीं तसं स्पष्ट म्हटलें नाहीं पण मी चीनला त्यांच्या-बरोबर परत जावं असं त्यांना वाटतं आहे, हें माझ्या लक्षांत आलंय."

" पण तूं जाणार नाहींसना चीनला ?" तो लगबगीनें म्हणाला.

" नाहीं कसं म्हणूं, हर्बर्ट ! " ती म्हणाली, " आपल्या लोकांना वैद्यकीय साहाय्याची किती गरज आहे ठाऊक नाहीं ! इथें डॉक्टर वाटेल तितके आहेत आणि आपल्या देशांत फार, फार थोडे आहेत. "

नंतर त्याच्याकडे निरखून पाहून ती म्हणाली, " हर्बर्ट, मला नेहमीं वाटतं कीं आपण– म्हणजे तुझ्या माझ्यासारखी माणसं इथें राहतों हें अगदीं चुकीचं आहे. डॉक्टरी शिक्षणाचा लाभ फार थोड्या चिनी तरुणांना घेतां येतो. इंजिनिअरिंगचीहि तीच तऱ्हा आहे. आपण मायदेशीं जावं आणि आपल्या ज्ञानाचा आपल्या देशबांधवांना लाभ मिळूं द्यावा असें नाहीं तुम्हांला वाटत ? "

" नाहीं. सिआओ-शेन, चीनला परत जाण्याची मला इतकी ओढ नाहीं. माझें सर्व नातेवाईक इथेंच अमेरिकेंत आहेत. आम्ही इथें सुखांत आहों. इथें आम्हांला कशाचीहि भीति नाहीं. आमच्यावर कुणी जुलूम करीत नाहीं. प्रजासत्ताक राज्यांत आम्ही मजेनें रहात आहोंत आणि शिवाय माझ्यासारख्या माणसांची आज चीनला गरज आहे, असेंहि मला वाटत नाहीं. "

त्या दिवशीं रात्रीं त्यांनीं एकमेकांचा निरोप घेतला तेव्हां दोघांचींहि मनें भारावल्यासारखीं आणि अस्वस्थ झालीं होतीं.

• •

– पुढील प्रयोगांनीं निःसंशय दाखवून दिलें कीं ४६९ किडनी सत्त्व

मूत्रपिंडदाह झालेल्या उंदरांवर पूर्ण गुणकारी आहे. या पुढील टप्पा फार दीर्घ कालावधीचा आणि तापदायक होता. तो म्हणजे माणसांवर प्रयोग करून पाहण्याचा. हें संशोधन अमेरिकेंत राहून करायला पाहिजे होतें. त्यामुळें चीनला परतण्यापूर्वी आणखी कित्येक महिने आपल्याला इथेंच रहावें लागेल असें सिआओ-शेननें आपल्या आजोबांना सांगितलें. आश्चर्याची गोष्ट अशी कीं त्यांनीं तात्काळ तिला रुकार दिला. एवढेंच नव्हें तर प्रयोगाची यशस्विता पूर्णपणें सिद्ध झालेली पाहिल्याशिवाय जाणें म्हणजे पाप आहे, असें ते म्हणाले.

एकदां राह्यचं नक्की ठरलं म्हणजे मग प्रॅक्टीसही करायला पाहिजे असें सिआओ–शेनच्या मनानें घेतलें. अखेरीस मलबेरी स्ट्रीटवरच्या एका इमारतींत पहिल्या मजल्यावर एका छोटेखानी खोलींत दवाखाना सुरूं करायचें ठरलें. दवाखाना उघडण्याचा दिवस उगवला. पीकिंग येथील वाँग–कुंगच्या दवाखान्यापुढें तो कांहींच नव्हता, आणि म्हणूनच त्यांना तो दाखवायला ती लाजत होती. पण त्यांनीं आग्रहच धरला तेव्हां सगळें फर्नीचर येऊन ठीकठाक बसवल्यावर ती त्यांना तिथें घेऊन गेली.

पुन्हां त्यांनीं तिला आश्चर्याचा धक्का दिला. ते म्हणाले, "छान ! तूं प्रॅक्टिस करायला लागलीस हें पाहून मला तुझा अभिमान वाटूं लागला आहे."

अधीऱ्या मनानें ती आपल्या दवाखान्यांत पहिल्या दिवशीं येऊन दाखल झाली. आज रोगी येतील असें तिला वाटलें नव्हतें. तिच्या कांहीं डॉक्टर मित्रांनीं तिला सांगितलें होतें कीं पहिला रोगी येण्याच्यापूर्वी महिनेच्या महिने त्यांना वाट पहावी लागली होती. तेव्हां पांच रोगी बाहेरच्या खोलींत बसून राहिलेले दिसतांच आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना तिचा.

पहिल्या रोग्याला तिनें विचारलें, "तुम्हांला कुणी सांगितलं मीं दवाखाना उघडल्याचं ? कां तुम्हांला कुणी धाडलंय माझ्याकडे ?"

"छेः छेः !" पहिला रोगी उत्तरला, "वर्तमानपत्रांत आम्हीं वाचलं –"

"वर्तमानपत्रांत ?"

"होय. चायनाटाउनच्या वृत्तपत्रांत."

." पण मीं कधीं जाहिरात – " बोलतां बोलतां ती मध्येंच थबकली. तिच्या लक्षांत आलें.

" आजोबा, लबाड कुठचे ! " ती मनांतच पुटपुटली, " चायनाटाउन-मध्यें तुम्हीं बऱ्याच ओळखी करून ठेवलेल्या दिसतात. वर्तमानपत्रवाल्यांशीं देखील ! तुमच्यावांचून माझं कसं निभावलं असतं, कोण जाणें ! "

• •

– ऐन उन्हाळ्यांतल्या एके दिवशीं संध्याकाळीं बाहेरच्या खोलींत सूर्याचे किरण विजेच्या छोट्या पंख्यावर पडले होते. शेवटचा रोगी निघून गेला होता. आणि सिआओ–शेन दवाखाना बंद करण्याच्या विचारांत होती.

महिनेच्या महिने तिनें संशोधनांत घालविले होते. पण K. E. 469 चा तिनें उंदरावर केलेला प्रयोग माणसांच्या बाबतींत तंतोतंत लागू करतां येत नाहीं हें तिला स्पष्ट कळून चुकलें होतें. प्रयोग बंद ठेवण्याचें तिनें ठरविलें होतें. निदान तूर्त तरी. पुढेंमागें चीनला गेल्यावर तो पुन्हां हातीं घेण्याचा तिचा विचार होता. आजोबांनीं आणि तिनें येत्या वसंतऋतूंत चीनला परत जावें असें ठरवलें होतें.

गेल्या कित्येक आठवड्यांत हर्बर्ट तिला भेटला नव्हता. मागें चीनला परत जाण्यासंबंधीं त्याचें बोलणें झालें होतें, त्यावेळेपासून त्यांची गांठ पडली नव्हती. आपल्याबद्दल त्याला आतां कांहीं वाटत नाहीं, अशी तिची जवळ जवळ खात्री झाली, आणि तिला फार वाईट वाटलें.

ऑफिसच्या खोलीला कुलूप लावून ती बाहेरच्या खोलींत गेली आणि दिवे बंद करणार इतक्यांत तिच्या कानांवर शब्द आला, " आणखी एकच रोगी उरला आहे, डॉक्टर ? "

अनपेक्षित ओळखीचा आवाज कानांवर पडतांच ती दचकून पाहूं लागली. हर्बर्ट तिथें उभा असलेला तिला दिसला. अखेरचा रोगी निघून गेल्यापासून तो तिथेंच वाट पहात बसून राहिला होता. तिनें स्वत:ला सावरून घेतलें व म्हटलें, " तर मग या असे आंत –"

आंत गेल्यावर अंगांतला कोट काढून ती पांढरा कोट घेण्यासाठीं पुढें झाली. पण हर्बर्टनें तिला अडवलें. अर्धवट हंसत, अर्धवट आर्जवी स्वरांत

त्यानें म्हटलें, "डॉक्टर मी खरंच आजारी आहें. अन् मला तुमची मदत पण हवी आहे, पण मला तुमच्या थर्मामीटरची किंवा स्टेथास्कोपची जरूरी नाहीं." बोलतां बोलतां तो पुढें झाला, आणि तिचे थरथरणारे हात आपल्या हातांत घेऊन म्हणाला, " माझ्या रोगाला औषध तूंच आहेस.– "

ती मटकन् खुर्चीवर बसली. तिचे डोळे पाणावले.

तो पुढें म्हणाला, " मी काय सांगतों तें नीट लक्ष देऊन ऐकून घे. चीनला परतण्यासंबंधीं तूं बोललीस तेव्हां मी तुझ्याशीं उद्धटपणानें वागलों, त्यावद्दल क्षमा कर मला. त्याबाबतींत तुझ्या भावना किती खोल रुजलेल्या आहेत हें त्यावेळीं मला उमगून आलं नाहीं. आठवडेच्या आठवडे मी विचारांत घालवले– मला एकटं, अगदीं एकाकी वाटूं लागलं आहे. मला तूं हवी आहेस. तूं माझा स्वीकार करायला अजून तयार असशील तर तुझ्याबरोबर मलाहि चीनला यायचं आहे. "

अश्रू आवरणें तिला आतां अशक्य झालें. हलकेंच ती म्हणाली, " मलाहि पण एकटं एकटं वाटत होतं पण कसंहि असलं तरी, तुझ्या इच्छेविरुद्ध तूं कांहीं करावंस असं मला वाटत नाहीं."

तो हलकेच कुजबुजला, " पण मला आतां खरोखरच चीनला जावंसं वाटतं आहे. " त्यानें आपली खुर्ची तिच्या खुर्चीजवळ ओढून म्हटलें, "दोन आठवड्यांपूर्वी तुझे आजोबा प्रथम मला भेटायला आले. त्या दिवसांपासून आम्ही रोज एकमेकांना भेटत आलों आहों. रोज आम्ही एकत्र जेवीत आलों. त्यांनीं मला तुझ्याविषयीं खूप सांगितलं – त्याचप्रमाणें तुझ्या वैद्यकीय ज्ञानाची आपल्या मायभूमीला किती जरूरी आहे, हें त्यांनींच मला दाखवून दिलं. कदाचित् माझ्या ज्ञानाचीहि तशीच गरज असेल असं त्यांचं म्हणणं पडलं. तें ऐकून माझे डोळे उघडले. तुझी ना नसेल तर तुझ्याबरोबर चीनला परतण्याची माझी तयारी आहे. "

एक अक्षर न बोलतां ती त्याच्या वाट पाहणाऱ्या बाहूंच्या कवेंत घुसली आणि त्यांचे ओठांवर ओठ टेकले.

● ●

चीनला परत जाण्यापूर्वी हर्बर्टला आणि सिआओ–शेनला दोघांनाहि

आपल्या धंद्याची निरवानिरव करायला हवी होती. अनेक अडचणी आल्या. मित्रां–नातेवाइकांकडे जाणें येणें हें होतेंच. जेवायचीं आमंत्रणें काय थोडीं होतीं ? रोज रात्रीं चालूंच होतीं. आज तिच्या धंद्यांतील स्नेह्यांच्या सहवासांत, तर उद्यां हर्बर्टच्या मित्रपरिवारांत –

पीकिंगला गेल्याबरोबर लग्न करायचें असें त्या दोघांनीं वाँग कुंगना सांगून टाकलें. त्यांनींहि त्यांचें म्हणणें सहानुभूतीपूर्वक ऐकून, त्याप्रमाणें तयारी करण्याविषयीं आपल्या थोरल्या मुलीला केबल धाडली.

मे महिन्यांत एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं सिआओ–शेन आपलें सामानसुमान बांधण्यांत गर्क होती. दवाखाना तर तिनें केव्हांच बंद केला होता. त्यांतील फर्नीचरहि विकून टाकलें होतें. पंख्यानें वारा घेत एका उघड्या खिडकीशी आजोबा बसले होते. बांधाबांधीकडे पहात होते.

पुस्तकांचा ढिगारा घेऊन हर्बर्ट खोलींत शिरला. त्यानेंहि आपल्या धंद्याची आवराआवर पूर्ण केली होती. आज तिला सामान बांधतांना मदत करायला म्हणून तो आला होता.

दरवाजावर कुणीतरी टक्‌टक् केलें. सिआओ–शेननें जाऊन दार उघडलें. स्पेशल डिलिव्हरीचें पत्र घेऊन पोस्टमन दारांशीं उभा होता. तिच्या नांवानें आलेला तो लांबट लखोटा वैद्यकांतील शास्त्रीय संशोधनाला उत्तेजन देणाऱ्या अमेरिकन सोसायटीकडून आला होता. पत्र फोडून ती वाचूं लागली.

" प्रिय डॉ. वाँग यांस,

आमच्या समितीच्या शहात्तराव्या वार्षिक सभेस हजर राहण्यास आपणाला आमंत्रण देण्यांत आम्हांला आनंद होत आहे. सभा २१ मे १९४८ रोजीं ठीक दुपारीं २–३० वाजतां वॉलडॉर्फ अॅस्टोरिया हॉटेल, न्यूयॉर्क, येथें भरणार आहे.

विशेष अभिनंदनीय कामगिरी केल्याबद्दल यंदा ज्यांचा सन्मान केला जाणार आहे त्यांपैकीं एक म्हणून पारितोषिक समितीनें आपली निवड केली आहे.

या महत्त्वाच्या प्रसंगीं आपण उपस्थित राहण्याचें कराल अशी आशा बाळगतों.

आपला,
एम्. पी. केनेडी, एम्. डी.
चिटणीस. ''

पत्र वाचून संपवतांना तिचा हात थरथर कांपत होता. तिचा चेहरा लाल झाला होता.

'' काय झालं ?'' हर्बर्टनें विचारलें. तिच्या तोंडून अक्षर बाहेर उमटेना. तिनें मुकाटयानें तें पत्र त्याच्या हातांत दिलें.

त्यानें तें वाचून ' शाब्बास ' म्हणून मोठयानें आरोळी ठोकली.

वाँग कुंग संतापानें ओरडले, '' काय, आहे काय त्या पत्रांत ? मोठया माणसांच्या भावनांची कांहींच कदर नाहीं कां तुम्हांला ? ''

'' चुकलं हं माझं, आजोबा ! '' सिआओ-शेन म्हणाली, '' मी विसरूनच गेलें गडबडींत. एका महत्त्वाच्या वैद्यकीय समितीला माझ्या संशोधनाची महती पटली आहे. कसलं तरी बक्षीस किंवा मानपत्र मला ते देणार आहेत. ''

एक रुंद हास्य करून वाँग कुंग आपले पांढरे शुभ्र मस्तक डोलवून म्हणाले, '' हे अमेरिकन लोक फार उदार आणि न्यायप्रिय आहेत. जात पंथ न पाहतां लायक व्यक्तीचीं स्तुतिस्तोत्रें गातात. आपण चिनी लोकांनीं याबाबतींत त्यांचा कित्ता घेतला पाहिजे. ''

● ●

समितीच्या सभेच्या दिवशीं याँगतेह् आणि आन-लिएन दुपारीं एक नंतर लवकरच आली आणि ती पांच जणांची तुकडी नंतर वॉलडॉर्फ अॅस्टोरियाकडे जायला निघाली. याँगतेह् गर्दीतून शक्य तितक्या सावकाश गाडी नेत होता. पण वाँग कुंग काल्पनिक फुट ब्रेक दाबीतच होते, आणि मधूनच सुळकांडी मारून जाणाऱ्या टॅक्सी ड्रायव्हरांच्या अंगावर ओरडत होते.

हॉटेलच्या प्रवेशद्वाराशीं याँग-तेह्नें गाडी नोकराच्या स्वाधीन केली आणि ते सभागृहांत शिरले. सिआओ-शेनला मात्र बक्षिस घेणाऱ्या किंवा भाषण

करणाऱ्या लोकांसाठीं राखून ठेवलेल्या एका खोलींकडे लगेच जावें लागलें.

बोर्डावर लावलेली सूचना वाचतांच हर्बर्टला समजून आलें कीं बक्षिस-समारंभ दुसऱ्या एका खोलींत व्हावयाचा आहे. खोलींत माणसांची खूप गर्दी होती. तरी पुढच्या रांगेंत दोन जागा रिकाम्या होत्या. यॉंगतेह्‌नें सुचविल्यावरून वॉंग-कुंगना घेऊन तो त्या जागेकडे गेला.

सन्माननीय लोक आधींच प्लॅटफॉर्मवर येऊन बसले होते. बसतां बसतां वॉंग कुंगनें त्यांचे चेहरे न्याहाळून पाहिले. सिआओ-शेन तेथें होती. तिला पाहतांच त्यांचें हृदय आनंदोर्मीनें हेलावून गेलें.

अध्यक्षांनीं उठून दोन वक्त्यांचीं ओळख करून दिली. त्या व्यक्तींनीं तांत्रिक बाबींनीं खचून भरलेले आपले लांबलचक निबंध वाचून दाखवले. वॉंग-कुंगना त्यांच्या बोलण्यांतलें एक अक्षर समजलें नाहीं. दुसऱ्याच्या भाषणाच्या अखेरीस तर त्यांचे थकलेले डोळे मिटूं लागले होते.

हर्बर्टनें त्यांना, खांदा हलवून म्हटलें, "आजोबा, महत्त्वाचा भाग आला हं. आतां बक्षिसं देणार आहेत."

ताबडतोब सावध होऊन ते ताठ झाले. आपला पाईप त्यांनीं जमिनीवर ठेवून दिला आणि आपल्या नातीकडे ते प्रेमळपणानें पाहूं लागले.

अध्यक्षांनीं बोलण्यास सुरवात केली, "दरवर्षीं पारितोषिक समिति आपल्या सभासदांच्या बहुमतानें बक्षीसासाठीं योग्य असलेल्या माणसांची निवड करते. संशोधनाच्या कोणत्याहि क्षेत्रांत विशेष गौरवास्पद अशी कामगिरी करून दाखवणाऱ्या व्यक्तीची ह्या मानासाठीं निवड होत असते. ह्या वर्षीं फक्त दोन उमेदवारांचीं नांवें समितीनें सुचवलीं आहेत. त्यांची ओळख वर्णानुक्रमानें करून देण्यांत येत आहे.

"पहिले गृहस्थ म्हणजे बॉल्टिमोअर प्रेस्बिटरियन हॉस्पिस्टलमधील डॉ. बेंजामिन् स्वॉर्टझ्," डोक्याला टक्कल असलेले एक पोक्त गृहस्थ पुढें आले.

"डॉ. बेंजामिन स्वार्टझ, आपण गरोदरावस्थेंतील रक्तदोषासंबंधीं केलेल्या महत्त्वाच्या संशोधनाबद्दल ही समिति आपल्याला हें बक्षिस आनंदानें नजर करीत आहे."

डॉ. स्वार्टझ् यांनीं बक्षिसाचा लांबट लखोटा होतांत घेतला आणि

उत्तरादाखल कृतज्ञतापूर्वक चार शब्द उच्चारले.

टाळ्यांचा गजर थांबतांच अध्यक्षांनीं दूरध्वनि यंत्रांतून सांगितलें, "सोसायटीचे सन्माननीय सभासद हो, समितीच्या इतिहासांत आजवर कधींहि न घडलेली गोष्ट म्हणजे यंदा एकाऐवजी दोघांना पारितोषिकाचा बक्षीस देण्याचा योग येत आहे. मी आपलें अध्यक्षस्थान [illegible] सुप्रसिद्ध डॉ. विलबर युजीन किंग यांना देत आहे. बक्षिसाला पात्र ठरलेल्या व्यक्तीची ते ओळख करून देतील."

डॉ. किंग दूरध्वनि यंत्रासमोर आले. स्त्रियांच्या रोगाविषयींच्या ज्ञाना-बद्दल आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेले डॉक्टर मजकूर टाळ्यांचा गजर थांबेपर्यंत रुबाबांत उभे राहिले. नंतर ते बोलू लागले.

"माझ्या उमेदवारानें आजवर अनेक संशोधनात्मक लेख लिहून प्रसिद्ध केले आहेत. त्यामुळें तिची ओळख करून देण्याची खरोखरी गरज नाहीं. किडनीच्या रोगाविषयीं तिनें केलेल्या महत्वपूर्ण संशोधनाची सर्वांना चांगलीच माहिती आहे. उंदरांवर केलेले हे प्रयोग माणसांच्या बाबतींत यशस्वीपणें लागू करण्यापूर्वी बरेंच प्रश्न सोडवावे लागतील असें नंतरच्या प्रयोगांवरून आढळून आलें आहे. ह्या गोष्टीकडे लक्ष वेधण्याचें काम आजचें बक्षिस मिळविणाऱ्या मुलीनेंच प्रथम केलें आहे. आणि मला सांगायला आनंद वाटतो कीं, हें महत्वाचें संशोधन तिच्या मायदेशांत – म्हणजे चीनमध्यें गेल्यावर – तिला चालूं ठेवतां येईल अशी आर्थिक व्यवस्था करण्यांत आली आहे. आणि तिला हें बक्षीस देतांना मला आनंद होत आहे."

सिआओ–शेन बक्षिस घेण्यासाठीं पुढें आली, तेव्हां तिच्या मनांत विचारांचा गोंधळ माजून गेला होता. डॉ. किंग यांच्या हातून तिनें बक्षिस घेतलें. तिनें त्यांना मस्तक नम्र करून अभिवादन केलें. त्यासरशीं टाळ्यांचा जंगी कडकडाट झाला. तिनें प्रेक्षकांकडे वळून पाहिलें. टाळ्यांचा आवाज शांत झाल्यावर ती बोलूं लागली.

"डॉ. किंग आणि समितीचे सभासद हो, माझ्या अल्पस्वल्प संशोधना-बद्दल तुम्ही अमेरिकेच्या उदार लोकांनीं केलेला माझा हा सन्मान खरोखरीच फार मोठा आहे. या ठिकाणीं मी डॉ. किंग यांचें फार मोठें ऋण जाहीर

रीतीनें मान्य करते." त्यांच्याकडे वळून पाहून ती पुढें म्हणाली, "डॉ. किंग, तुम्ही माझ्यासाठीं आजवर जें केलेंत त्याबद्दल, मी तुमची फार फार आभारी आहे. मी जें कांहीं संशोधन केलें आहे तें तुमच्यामुळेंच शक्य झालेलें आहे."

जमावानें आणखी एकवार टाळ्यांचा गजर केला. तो थांबल्यावर ती पुढें म्हणाली, "आणखी थोडें आपल्याला सांगावयाचें आहे. पुष्कळ वेळां असें दिसून येतें कीं अनेक व्यक्तींच्या त्यागांतून एखाद्या व्यक्तीला यश मिळत असतें. जेव्हां एखाद्या क्षेत्रांत यश मिळालेलें दिसून येतें तेव्हां ज्यांना त्या यशाचें श्रेय खरोखर द्यायला पाहिजे ते बहुतेक दिवंगत झालेले असतात. पण या बाबतींत दैवानें माझ्यावर खैर केली आहे. जिनें माझ्यासाठीं अपार स्वार्थत्याग केला ती व्यक्ति आज आपल्यामध्यें इथें आहे. ती व्यक्ति म्हणजे पीकिंग येथील डॉ. वाँग कुंग. लहानपणापासून त्यांनीं मला संभाळलें, वाढवलें आणि माझ्या शिक्षणासाठीं जें जें कांहीं लागेल तें तें पुरवलें. इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या चिनी वैद्यकाच्या अनुभवाचाहि मला लाभ करून दिला. किडनीच्या संशोधनाचा माझा सारा प्रयत्न त्यांच्याच सूचनेवर मुळांत आधारलेला आहे.

सभ्य स्त्री पुरुष हो, माझ्या आजोबांची मी आपणांला ओळख करून देतें."

लोकांनीं टाळ्यांचा प्रचंड गजर केला. हर्बर्टनें हलकेंच हाताला धरून वाँग कुंगना प्लॅटफॉर्मवर नेलें. हातांत हात अडकवून दोन्हीहि चिनी डॉक्टर, नवीन आणि जुने, हंसतमुखानें प्रेक्षकांकडे पहात उभे राहिले. अश्रुजड नेत्रांनीं आणि कृतज्ञतेनें भरावलेल्या हृदयानें वाँग-कुंगनीं मोठ्या अभिमानानें आपल्या नातीकडे पाहिलें आणि टाळ्यांचा गजर करणाऱ्या अमेरिकन प्रेक्षकांना अभिवादन केलें.

RRMRBK-0205276